सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | रविवार, दि. २० सप्टेंबर २०२६ | वर्ष - ४ थे | अंक १५६ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com




## चौदा फुटाच्या वर झोपड्यांचे बांधकाम, स्वत: तोडा नाहीतर मनपाचा हातोडा; 1 ऑक्टोबर पासून महापालिकेची थेट कारवाई

**मुंबई :** येत्या १ ऑक्टोबर ते ३१ डिसेंबर २०२६ या कालावधीत बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाकडून झोपडपट्टी परिसरातील अनधिकृत बांधकामांविरोधात विशेष मोहीम आयोजित करण्यात येत आहे. या अंतर्गत, १४ फूट आणि त्यापेक्षा अधिक उंचीच्या झोपड्यांवर कारवाई करण्यात येईल. तत्पूर्वी, झोपडपट्टी क्षेत्रातील अनधिकृत बांधकामे तिथे वास्तव्यास असलेल्या संबंधित रहिवाश्यांनी स्वतःहून तात्काळ तोडावीत अन्यथा कठोर कारवाई करण्यात येईल, असे आवाहन मुंबई महानगरपालिका प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

मुंबई महानगरपालिका आयुक्त अश्विनी भिडे यांच्या निर्देशांनुसार, अतिरिक्त आयुक्त (शहर) प्राजक्ता वर्मा - लवंगारे यांच्या मार्गदर्शनात, सह आयुक्त (दक्षता) देवेंदर सिंग यांच्या नेतृत्वात अनधिकृत बांधकामांविरोधात कारवाई केली जात आहे. याच अनुषंगाने, झोपडपट्टी परिसरातील अनधिकृत बांधकामांचे निष्कासन करण्यासाठी या मोहिमेचे आयोजन करण्यात येत आहे.





मुंबई शहर आणि उपनगरात एकूण २ लाख २३ हजार १५० झोपड्या आहेत. त्यापैकी ३९ हजार १११ झोपड्या १४ फूट आणि त्यापेक्षा अधिक उंचीच्या असल्याचे निर्दशनास आले आहे. यापैकी ३ हजार ३४८ झोपड्या शहर विभाग, ४ हजार ५३६ झोपड्या पश्चिम उपनगरे आणि ३१ हजार २२७ झोपड्या पूर्व उपनगरांत स्थित आहेत. दरम्यान, ४ हजार ५८४ झोपड्यांवर यापूर्वी निष्कासनाची कारवाई करण्यात आली आहे. ६११ झोपड्यांना नोटीस बजावण्यात आल्या आहेत. उर्वरित झोपड्यांत वास्तव्यास असलेल्या रहिवाश्यांनी संबंधित बांधकामे स्वतःहून तात्काळ निष्कासित करावीत अन्यथा त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात येईल, असे महानगरपालिका प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात येत आहे.

दरम्यान, मुंबईत अनधिकृत बांधकामांविरोधात महानगरपालिकेच्या विविध प्रशासकीय विभागांकडून (वॉर्ड) सातत्याने कारवाई सुरू आहे. दिनांक २४ ऑगस्ट ते १५ सप्टेंबर २०२६ या कालावधीत एकूण १२८ अनधिकृत बांधकामांवर निष्कासनाची कारवाई करण्यात आली. तर, १४० अनधिकृत बांधकामांविरोधात कारवाई नियोजित आहे. तथापि, नागरिकांनी अनधिकृत बांधकामे करू नयेत तसेच अशाप्रकारचे बांधकाम केले असल्यास ते स्वतःहून तात्काळ हटवावेत. अन्यथा, त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात येईल, असे प्रशासनाकडून कळविण्यात येत आहे.

## शेतकऱ्यांसाठी मोठी अपडेट ! तिसरी कर्जमाफी यादी कधी जाहीर होणार ?

**मुंबई :** राज्यातील शेतकऱ्यांसाठी महत्त्वाची अपडेट समोर आली आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना 2026 अंतर्गत तिसऱ्या यादीतील लाभार्थी शेतकऱ्यांच्या कर्जखात्यांची पडताळणी अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर तिसरी लाभार्थी यादी जाहीर होण्याची शक्यता आहे.

कर्जमाफी योजनेअंतर्गत यापूर्वी दोन याद्या प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. आता तिसऱ्या यादीतील शेतकऱ्यांच्या कर्जखात्यांची पडताळणी सुरू असून, प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पात्र लाभार्थ्यांच्या बँक खात्यात कर्जमाफीची रक्कम जमा केली जाणार आहे. मिळालेल्या माहितीनुसार, तिसरी यादी पुढील आठवड्यात जाहीर होण्याची शक्यता असून, या टप्प्यात राज्यातील जवळपास 5 लाख शेतकऱ्यांना सुमारे 4 हजार कोटी रुपयांच्या कर्जमाफीचा लाभ मिळू शकतो.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना 2 जून 2026 रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजूर करण्यात आली. त्यानंतर कर्जमाफीची प्रक्रिया टप्प्याटप्प्याने राबवण्यात आली. यापूर्वी प्रसिद्ध झालेल्या दोन याद्यांमधून सुमारे 6 लाख शेतकऱ्यांना 5 हजार कोटी रुपयांचा लाभ देण्यात आल्याची माहिती आहे. पात्र शेतकऱ्यांना आधार प्रमाणीकरणाची प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर कर्जमाफीचा लाभ मिळणार आहे. पडताळणी पूर्ण झालेल्या लाभार्थ्यांची कर्जमाफीची रक्कम थेट संबंधित बँक खात्यांमध्ये जमा केली जाणार आहे. माहितीतील तफावत किंवा तक्रारींच्या निवारणासाठी जिल्हास्तरावर विशेष यंत्रणाही कार्यरत आहे.

कर्जमुक्ती आणि एकवेळ समझोता योजनेच्या अंमलबजावणीसाठी 30 जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, 12 राष्ट्रीयकृत बँका आणि इतर खासगी बँका, अशा एकूण 53 बँकांनी तब्बल 32 लाख कर्जखात्यांची माहिती महाआयटीच्या पोर्टलवर अपलोड केली आहे. योजनेच्या निकषांनुसार पात्र ठरलेल्या थकबाकीदार शेतकऱ्यांपैकी 16 लाख 96 हजार शेतकऱ्यांची पहिली यादी 25 जुलै रोजी प्रसिद्ध करण्यात आली होती. ऑगस्टअखेरपर्यंत 12 लाख 10 हजार कर्जखात्यांचे आधार प्रमाणीकरण पूर्ण झाल्याची माहिती आहे.

## बांभोरी पुलावरून विवाहितेची गिरणा नदीत उडी, विवाहितेचा 15 तासांनंतरही शोध नाही

**जळगाव :** जळगाव शहरालगत असलेल्या बांभोरी पुलावरून गिरणा नदीपात्रात उडी घेतलेल्या विवाहितेचा अद्याप ठावठिकाणा लागलेला नाही. जयश्री चौधरी असे या महिलेचे नाव असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. सुमारे 70 ते 80 फूट उंच पुलावरून महिलेने नदीत उडी घेतल्याची माहिती मिळताच बचाव पथक आणि स्थानिक नागरिकांनी शोधमोहीम सुरू केली.

घटनेची माहिती मिळाल्यानंतर नदीपात्रात तातडीने शोध घेण्यास सुरुवात करण्यात आली. रात्री उशिरापर्यंत नदी आणि पुलाच्या परिसरात शोध घेण्यात आला. मात्र, अंधार तसेच नदीपात्रातील परिस्थितीमुळे रात्री शोधकार्य थांबवण्यात आले. त्यानंतर सकाळी 8 वाजल्यापासून पुन्हा शोधमोहीम सुरू करण्यात आली. परिसरातील अनुभवी पोहणाऱ्यांचीही मदत घेण्यात येत असून नदीपात्रातील विविध भाग तपासले जात आहेत.

महिलेचा शोध घेऊन जवळपास 15 तासांचा कालावधी उलटला असला तरी अद्याप तिचा ठावठिकाणा लागलेला नाही. नदीतील पाण्याचा प्रवाह आणि नैसर्गिक अडथळ्यांमुळे बचाव पथकाला शोधकार्यात अडचणी येत आहेत. महिलेने हे टोकाचे पाऊल नेमके कोणत्या कारणामुळे उचलले, याची माहिती अद्याप स्पष्ट झालेली नाही. या घटनेमागील कारणाचा तपासही केला जात आहे.सकाळपासून पुन्हा सुरु करण्यात आलेल्या शोधमोहीमेत पोहणाऱ्यांकडून नदीपात्रातील वेगवेगळ्या भागांचा शोध घेतला जात आहे. जयश्री चौधरी यांचा शोध लागेपर्यंत बचावकार्य सुरू ठेवण्यात येणार असल्याची माहिती आहे. या घटनेमुळे बांभोरी पूल आणि परिसरात खळबळ उडाली असून, महिलेचा शोध लागण्याची प्रतीक्षा कुटुंबीय आणि नागरिकांकडून केली जात आहे.

## अवघ्या महिनाभरापूर्वी विवाह ! अभियंता तरुणाची रेल्वेसमोर आत्महत्या

**जळगाव :** अवघ्या महिनाभरापूर्वी विवाह झालेल्या २८ वर्षीय अभियंत्याने रेल्वेसमोर झोकून देत आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना जळगाव शहरात बजरंग बोगद्याजवळ घडली आहे. गौरव हरिश्चंद्र देशमुख (रा. गणेश कॉलनी) असे मृत तरुणाचे नाव आहे. गौरवने हे टोकाचे पाऊल का उचलले, याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.या प्रकरणी लोहमार्ग पोलिसांनी अकस्मात मृत्यू अशी नोंद केली आहे.

### बजरंग बोगद्याजवळ पोहोचला अन्...

गौरव देशमुख व्यवसायाने अभियंता होता. त्यासोबतच तो बांधकाम मक्तेदारीचे कामही करत होता. नेहमीप्रमाणे तो दिवसभर कामावर होता. त्यानंतर रात्रीच्या सुमारास तो बजरंग बोगद्याच्या परिसरात पोहोचला. रात्री सुमारे 11 वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. घटनेची माहिती मिळताच लोहमार्ग पोलिस चौकीचे पोलीस हेडकॉन्स्टेबल किरण बारी आणि गणेश राजपूत घटनास्थळी दाखल झाले. गौरवला तातडीने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात नेण्यात आले; मात्र डॉक्टरांनी तपासणीनंतर त्याला मृत घोषित केले.

### तुटलेल्या मोबाईलमुळे पटली ओळख

घटनास्थळी पोलिसांना गौरवचा तुटलेला मोबाईल सापडला. सुरुवातीला मृत तरुणाची ओळख पटवणे पोलिसांसमोर आव्हान होते. पोलिसांनी मोबाईलमधील सिमकार्ड दुसऱ्या मोबाइलमध्ये टाकून त्यातील संपर्क क्रमांकांच्या आधारे संबंधित व्यक्तींशी संपर्क साधला. त्यानंतर मृत तरुणाची ओळख गौरव देशमुख अशी पटली.

### 16 ऑगस्टला झाला होता विवाह

गौरवचा विवाह 16 ऑगस्ट रोजी झाला होता. लग्नाला अवघा महिनाभर होत असतानाच ही दुर्दैवी घटना घडल्याने देशमुख कुटुंबावर मोठा आघात झाला आहे. कुटुंबीयांच्या माहितीनुसार, घटनेच्या आदल्या दिवशी गौरवने पत्नी आणि कुटुंबीयांसोबत बसून लग्नाचा अल्बमही पाहिला होता. गुरुवारी रात्री तो गणेश मंडळाच्या ठिकाणीही गेला होता. तेथे मित्र आणि परिसरातील तरुणांसोबत तो नाचला. त्यानंतर काही वेळातच तो बजरंग बोगद्याच्या दिशेने गेला आणि ही घटना घडली.

### अचानक काय घडले ?

काही तासांपूर्वीपर्यंत कुटुंबीय आणि मित्रांसोबत सामान्यपणे वावरणाऱ्या गौरवने अचानक हे पाऊल का उचलले, हा प्रश्न सध्या अनुत्तरित आहे. गौरव हा देशमुख कुटुंबातील एकुलता एक मुलगा होता. त्याचे वडील हरिश्चंद्र देशमुख हे देखील अभियंता असून, वडील आणि गौरव दोघेही बांधकाम क्षेत्रात कार्यरत होते. घरची परिस्थिती चांगली असतानाही या घटनेमागील नेमके कारण अद्याप समोर आलेले नाही. या प्रकरणी लोहमार्ग पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. गौरवच्या मोबाईलमधील माहिती तसेच घटनेपूर्वीच्या काही तासांतील त्याच्या हालचालींचा तपास केला जात आहे.

## 20 टनी क्षमतेच्या वजन काट्याचे नगराध्यक्ष, उपनगराध्यक्षांच्या हस्ते उद्घाटन

**राहाता (वार्ताहर) :** नगरपरिषदेच्या घनकचरा प्रकल्पाच्या ठिकाणी 'नगरोत्थान योजने' अंतर्गत नव्याने उभारण्यात आलेल्या २० टनी क्षमतेच्या वजन काट्याचे शनिवारी अधिकृतरीत्या लोकनियुक्त नगराध्यक्ष डॉ. स्वाधीन गाडेकर, उपनगराध्यक्ष डॉ. विजयराव सदाफळ तसेच नगरसेवक यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.या नव्या सुविधेमुळे नगरपरिषदेच्या कचरा वाहतुकीतील वेळेची आणि इंधनाची मोठी बचत होणार असून, शहराच्या स्वच्छतेच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.



यापूर्वी राहाता नगरपरिषदेकडे स्वतःचा वजन काटा उपलब्ध नव्हता. त्यामुळे घनकचरा वाहून नेणाऱ्या गाड्यांना वजन करण्यासाठी शहराबाहेर जावे लागत असे. यामुळे गाड्यांना ये-जा करण्यासाठी अतिरिक्त वेळ तर लागायचाच, शिवाय इंधनावरील खर्चही मोठ्या प्रमाणावर वाढत होता. नगरपरिषदेवर पडणारा हा आर्थिक भार कमी करण्यासाठी या नव्या वजन काट्याची उभारणी करण्यात आली आहे.

या वजन काट्याची क्षमता २० टन इतकी आहे.या वजन काट्याच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत. त्यामुळे येणाऱ्या-जाणाऱ्या गाड्या आणि त्यांचे वजन यावर सीसीटीव्हीच्या माध्यमातून पारदर्शक नियंत्रण राहणार आहे.शहराबाहेर जाण्याचा फेरा वाचल्यामुळे नगरपरिषदेच्या इंधन आणि वाहतूक खर्चात मोठी कपात होणार आहे.

राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात आली आहे. या उद्घाटन प्रसंगी राहाता नगरपरिषदेचे गटनेते मुन्ना शाह , माजी नगराध्यक्ष कैलासबापू सदाफळ,नगरसेवक अजय आग्रे,राहुल सदाफळ , दशरथ तुपे, नितीन गाडेकर , प्रवीण बोरकर, मयूर पाळंदे , प्रवीण रुणवाल, प्रदीप बनकर ,विजय गिधाड ,वीरभद्र देवालय ट्रस्टचे अध्यक्ष जबाजी मेचे, उपाध्यक्ष विजय सदाफळ, रावसाहेब धुमसे, संजय भाकरे ,जालू गिधाड, नगरपरिषदेचे कर्मचारी रविंद्र बोठे ,राहुल खलीपे आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

या महिन्यात १ तारखेपासून राहाता नगरपरिषदेने शहरातील स्वच्छतेच्या नियोजनात आणि कर्मचाऱ्यांच्या कार्यपद्धतीत काही सकारात्मक बदल केले आहेत. या बदलांचे चांगले परिणाम आता दिसू लागले असून, शहरातून घनकचऱ्याचे संकलन अत्यंत प्रभावीपणे केले जात आहे. ना. डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या संकल्पनेतील 'स्वच्छ आणि सुंदर राहाता शहर' निर्माण करण्याच्या दृष्टीने हे एक महत्त्वपूर्ण पाऊल असल्याचे मत नगराध्यक्ष डॉ. स्वाधीन गाडेकर यांनी व्यक्त केले.

## कुंभमेळ्यासाठी नाशिकमध्ये 5 हजार AI कॅमेऱ्यांचे जाळे, साधुग्राम, घाट आणि पार्किंगवर विशेष नजर

**नाशिक :** 2027 मध्ये होणाऱ्या नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने सुरक्षा आणि गर्दी नियंत्रणासाठी मोठी तयारी सुरू केली आहे. कुंभमेळ्याच्या काळात नाशिकमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आधारित अत्याधुनिक सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे जाळे उभारण्यात येणार आहे. यासाठी नियोजित कॅमेऱ्यांच्या संख्येत आणखी एक हजारांची वाढ करण्यात आली असून, आता नाशिक-त्र्यंबकेश्वर परिसरात एकूण 5 हजार सीसीटीव्ही कॅमेरे कार्यरत करण्याचे नियोजन आहे.

### साधुग्राम, घाट आणि पार्किंगवर विशेष लक्ष

नाशिक शहरात यापूर्वी तीन हजार, तर त्र्यंबकेश्वरमध्ये एक हजार अशा एकूण चार हजार सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे नियोजन करण्यात आले होते. मात्र, पोलीस प्रशासनाच्या सूचनेनंतर प्रकल्पाचा विस्तार करण्यात आला आहे. नवीन आराखड्यात साधुग्राम, नव्याने विकसित होणारे घाट आणि वाहनतळे यांचाही समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे आणखी एक हजार कॅमेरे बसवण्यात येणार आहेत. यातील सुमारे 350 कॅमेरे तपोवनातील साधुग्राममध्ये, 250 कॅमेरे शहरातील विविध वाहनतळांवर, तर गोदावरी नदीकाठावरील नव्या घाटांवर सुमारे 400 कॅमेरे बसवले जाणार आहेत.

### 12 कोटी भाविकांच्या गर्दीचे आव्हान

प्रयागराजनंतर 2027 मध्ये नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे होणाऱ्या कुंभमेळ्यात सुमारे 12 कोटी भाविक सहभागी होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. गोदावरी नदीकाठावरील दाट लोकवस्तीच्या परिसरात कुंभमेळा होत असल्याने गर्दीचे व्यवस्थापन प्रशासनासाठी मोठे आव्हान ठरणार आहे. यासाठी सीसीटीव्ही कॅमेऱ्यांसोबतच ड्रोनद्वारे देखरेख आणि एकात्मिक सुरक्षा यंत्रणेचा वापर केला जाणार आहे. AI तंत्रज्ञानावर आधारित कॅमेऱ्यांमुळे गर्दीच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यास आणि संभाव्य परिस्थितीचे व्यवस्थापन करण्यास मदत होणार आहे.

## नाशिकमध्ये 'या' ठिकाणी भूकंपाचे धक्के, नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

**नाशिक :** जिल्ह्यातील सुरगाणा तालुक्यात शुक्रवारी सायंकाळी भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले. डांगराळे, शिंदे, रोकडपाडा आणि आसपासच्या परिसरातील नागरिकांना हे धक्के जाणवल्याची माहिती तहसीलदार रामजी राठोड यांनी दिली. अचानक जाणवलेल्या या धक्क्यांमुळे काही काळ नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. राष्ट्रीय भूकंपशास्त्र केंद्राच्या नोंदीनुसार, 18 सप्टेंबर रोजी सायंकाळी 7 वाजून 10 मिनिटांच्या सुमारास भूकंपाची नोंद झाली. या भूकंपाची तीव्रता 3.3 रिश्टर स्केल इतकी होती. भूकंपाचे केंद्र जमिनीखाली सुमारे 4 किलोमीटर खोलीवर असल्याचे नोंदवण्यात आले आहे. हे ठिकाण नाशिकपासून अंदाजे 53 किलोमीटर अंतरावर असून शिंदे आणि रोकडपाडा परिसराच्या जवळ असल्याचे सांगण्यात आले. भूकंपाची तीव्रता कमी असल्याने सुदैवाने कोणतीही जीवित किंवा वित्तहानी झाल्याचे समोर आलेले नाही. प्रशासनाकडून परिस्थितीवर लक्ष ठेवण्यात येत आहे. दरम्यान, नागरिकांनी घाबरून न जाता सतर्क राहावे आणि सोशल मीडिया किंवा इतर माध्यमातून पसरवल्या जाणाऱ्या अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## शिक्षकांनी शिकवायचे की ऑनलाइन आदेशच पाळत बसायचे? शासकीय व्हॉट्सअॅप ग्रुपमधून बाहेर पडत प्रशासनाचे लक्ष वेधले

तभा वृत्तसेवा

**कन्नड :**दि.१९ सप्टेंबर - विद्यार्थ्यांच्या हातात पुस्तक देऊन त्यांचे भविष्य घडविण्याची जबाबदारी शिक्षकांवर आहे. मात्र, शिक्षकांचाच वेळ ऑनलाइन माहिती भरणे, प्रशासकीय आदेशांचे पालन करणे आणि विविध अशैक्षणिक कामांमध्ये खर्च होत असेल, तर विद्यार्थ्यांना शिकवायचे कधी? हा प्रश्न आता कन्नड तालुक्यातील शिक्षकांच्या निषेधातून पुढे आला आहे.



दि.१९ रोजी अशैक्षणिक कामांचा वाढता बोजा, ऑनलाइन माहिती मागविण्याची सक्ती आणि व्हॉट्सअॅपच्या माध्यमातून दिल्या जाणाऱ्या प्रशासकीय आदेशांविरोधात कन्नड तालुक्यातील शिक्षकांनी सामूहिक भूमिका घेत शासकीय व प्रशासकीय व्हॉट्सअॅप ग्रुपमधून बाहेर पडत निषेध नोंदविला.

शिक्षकांचे मुख्य काम अध्यापनाचे असताना त्यांच्यावर विविध अशैक्षणिक जबाबदाऱ्या टाकल्या जात असल्याची नाराजी या कृतीतून व्यक्त झाली. सततच्या ऑनलाइन कामांमुळे अध्यापनासाठीचा वेळ कमी होत असल्याचा मुद्दाही या आंदोलनाच्या केंद्रस्थानी आहे.

शिक्षकांच्या या भूमिकेमुळे शिक्षण व्यवस्थेतील प्राधान्यक्रमाचा प्रश्न पुन्हा चर्चेत आला आहे. शिक्षकांकडून अपेक्षित असलेले काम आणि त्यांच्यावर सोपविण्यात येणाऱ्या अतिरिक्त जबाबदाऱ्या यांचा समतोल साधण्याची गरज व्यक्त होत आहे. शिक्षकांना शिकविण्यासाठी वेळ मिळणार नसेल, तर विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेची अपेक्षा तरी कशी पूर्ण होणार? शिक्षकांच्या निषेधानंतर आता प्रशासन या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहणार का, याकडे कन्नड तालुक्याचे लक्ष लागले आहे. “शिक्षक हा विद्यार्थ्यांचे भविष्य घडविणारा घटक आहे. मात्र, आज शिक्षकांचा बहुतांश वेळ अध्यापनाऐवजी विविध अशैक्षणिक कामे आणि ऑनलाइन माहिती भरण्यात खर्च होत आहे. शिक्षकांना शिकविण्यासाठी वेळच मिळणार नसेल, तर विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता कशी वाढणार? आमचा विरोध कामाला नाही, तर अध्यापनावर परिणाम करणाऱ्या अनावश्यक कामांच्या बोजाला आहे. प्रशासनाने शिक्षकांच्या या प्रश्नाची गांभीर्याने दखल घेऊन ठोस निर्णय घ्यावा.”

# लिंबागणेश च्या मयुरेश्वराचे थाटात विसर्जन!




लिंबागणेश – सुप्रसिद्ध श्रीक्षेत्र भालचंद्र गणपती तीर्थक्षेत्र म्हणून ओळख असलेल्या बीड तालुक्यातील लिंबागणेश गावाची तब्बल २२५ वर्षांची 'एक गाव–एक गणपती'ची परंपरा यंदाही कायम राहिली. सरकार वाड्यात प्रतिष्ठापित करण्यात आलेल्या मयुरेश्वर गणेशाची शनिवारी (दि.१९) दुपारी एक वाजता मुख्य आरती झाल्यानंतर छत्री, चौरी, अब्दागिरी, चामर, ध्वज व दंड अशा राजेशाही लवाजम्यासह पालखीतून विसर्जन मिरवणूक काढण्यात आली.

सरकार वाड्यातून मिरवणूक बाहेर पडताच बँड पथक, टाळ-मृदंगाचा गजर आणि भजनी मंडळींच्या अभंग-गजराने वातावरण भक्तिमय झाले. ढोल-ताशांच्या निनादात लेझीम पथकातील तरुणांनी विविध कसरती सादर करत उपस्थितांची दाद मिळवली. 'मोरया हो मोरया', 'जय गजानन मोरया'च्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. मिरवणुकीत पंचक्रोशीतील १२ गावांमधील लेझीम पथकांनी सहभाग घेतला. रात्री नऊ वाजता श्री भालचंद्र गणपती मंदिरातील चंद्रपुष्करणी तीर्थावर महाआरती झाल्यानंतर मयुरेश्वराचे विधिवत विसर्जन करण्यात आले.

मयुरेश्वराच्या विसर्जन मिरवणुकीतील एक आगळीवेगळी परंपरा आजही लिंबागणेशमध्ये जपली जाते. पालखीसमोर धोतराच्या पायघड्या अंथरून मयुरेश्वराचे स्वागत करण्याचा मान परीट समाज बांधवांना आहे. या परंपरेतून गावातील सामाजिक ऐक्य आणि परस्पर सन्मानाची भावना अधोरेखित होते. गावातील मारोती मंदिराला प्रदक्षिणा घातल्यानंतर मयुरेश्वराची मूर्ती कैकाडवाड्यात नेण्यात येते. तेथे सजवलेल्या बैलगाडीत मूर्ती विराजमान करून पंचक्रोशीतील भाविकांना दर्शनासाठी ठेवण्यात येते. सजवलेल्या बैलगाडीचा मान कैकाडी समाज बांधवांकडे परंपरेने चालत आला आहे.

गणेशचतुर्थीच्या दिवशी षोडशोपचार पूजा करून सरकार वाड्यात मयुरेश्वर गणेशाची प्रतिष्ठापना केली जाते. मयुरेश्वराची गोजिरी मूर्ती वंशपरंपरेने मूर्तिकार उमेश कानिटकर तयार करतात. नागपंचमीच्या दुसऱ्या दिवसापासून मूर्तिकामाला सुरुवात होऊन श्रावण वद्य त्रयोदशीला मूर्ती पूर्ण केली जाते. पोळ्याच्या दुसऱ्या दिवसापासून मूर्तीच्या रंगकामाला सुरुवात होते. मयुरेश्वराच्या मूर्तीसाठी लागणारे चिखलाचे गोळे पुरविण्याचा परंपरागत मान मुळुक येथील महादेव आहेरकर यांच्याकडे आहे. लिंबागणेश गावाने गेल्या २२५ वर्षांपासून 'एक गाव–एक गणपती'ही परंपरा जपली आहे. गावात अन्यत्र सार्वजनिक गणपतीची प्रतिष्ठापना केली जात नाही, हे या गावचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. तसेच गौरीसोबतच गणेशाचे विसर्जन करण्याची परंपरा असल्याने लिंबागणेशमधील गणेशोत्सव पाच दिवसांचा असतो. गणेश विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर नेकनूर पोलीस ठाण्याचे प्रभारी पोलीस निरीक्षक मंगेश साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक नितीन कांकरवाल, पद्माकर आहेर, सचिन धायगुडे, शंकर गलधर तसेच लिंबागणेश पोलीस चौकीचे सहाय्यक फौजदार राठोड, पोलीस हवालदार मुंडे, तांबे यांच्यासह नेकनूर पोलीस ठाण्याचे अंमलदार बाला ढाकणे, पोलीस हवालदार विशाल क्षीरसागर, अविनाश घुंगरट, परझणे, शेख यांच्यासह पोलीस कर्मचारी व होमगार्ड यांचा बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# भरधाव टिप्परने बोलेरोला उडवले; पाच जखमी,एकाची प्रकृती चिंताजनक

## बीड बायपासवर भीषण अपघात;देवदर्शनासाठी निघालेल्या कुटुंबावर काळाचा घाला









**बीड (प्रतिनिधी) :** बीड शहराजवळील महालक्ष्मी चौक ते संभाजी राजे चौक बायपास मार्गावरील पांगरबावडी ब्रिज जवळ शनिवारी (दि. १९) सकाळी सुमारे ९ वाजता टिप्पर आणि बोलेरोची भीषण धडक झाली. या अपघातात बोलेरोमधील पाच जण जखमी झाले असून, त्यापैकी नंदा बडे यांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती आहे.

पाथर्डी तालुक्यातील कोरडगाव येथील कुटुंबीय बोलेरोने अक्कलकोट येथे देवदर्शनासाठी जात असताना हा अपघात झाला.

बोलोरो गाडी ही बीड बायपास रोड वरील पांगर बावडी ब्रिज जवळ आली असता अचानक टिप्परने वळण घेऊन बोलेरो गाडीला धडक दिली. बोलेरो गाडीतील प्रवासी यामध्ये शिवकन्या बडे, नंदा बडे, राणी बडे, अभिषेक बडे आणि गायत्री कचरे यांचा समावेश असल्याची माहिती मिळाली आहे. नंदा बडे या अपघातात बेशुद्ध झाल्या असून त्यांच्यावर बीड शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

अपघाताची माहिती मिळताच घाडगे नामक रुग्णवाहिका चालकाने तत्काळ घटनास्थळी धाव घेतली आणि जखमींना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले. बीड शहरात प्रवेश करणाऱ्या प्रमुख मार्गांवर, बीड शहरात टिप्पर( हायवा )वाहने भरधाव धावत असल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. काही वाहनांवर वाहन क्रमांक स्पष्ट नसल्याच्या तक्रारीही नागरिकांकडून होत आहेत. या पार्श्वभूमीवर शहर व परिसरातील टिप्पर-हायवांची तपासणी करून नियमबाह्य वाहनांवर कारवाई करण्याची मागणी होत आहे. या वाहनांवर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी असलेल्या यंत्रणांकडून दुर्लक्ष होत आहे का, असा सवाल या अपघातानंतर उपस्थित होत आहे.

# तरुणांनो हातात दगड नव्हे, पुस्तक घ्या; मनात द्वेष नव्हे, विचार ठेवा

## सुंदरराव सोळंके व्याख्यानमालेच्या तिसऱ्या पुष्पात प्रसिद्ध गीतकार प्रशांत मोरे यांचे तरुणांना आवाहन



**माजलगाव :** तरुणाई ही केवळ वयाची अवस्था नसून विचारांची ऊर्जा आहे. परिस्थिती कितीही अस्वस्थ करणारी असली तरी तरुणांनी दिशाहीन होता कामा नये. तरुणांनो हातात दगड नव्हे, पुस्तक घ्या मनात द्वेष नव्हे, विचार ठेवा स्वप्न पाहा, ज्ञान मिळवा, संघर्ष करा, अपयशातून शिका आणि आपल्या कर्तृत्वातून समाजाला दिशा द्या, असे आवाहन प्रसिद्ध गीतकार व व्याख्याते प्रा. प्रशांत मोरे यांनी केले.

सुंदरराव सोळंके महाविद्यालयात आयोजित सुंदरराव सोळंके व्याख्यानमालेच्या तिसऱ्या पुष्पात ' वर्तमान परिप्रेक्ष्यात आजची तरुणाई" विषयावर प्रसिद्ध गीतकार प्रा प्रशांत मोरे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विजय सोळंके होते.यावेळी ॲड. बी. आर. डक, अण्णासाहेब वगरे, बाळासाहेब शिंदे, भीमराव टाकणखार, प्राचार्य डॉ. अभय सोळुंके, कवी प्रभाकर साळेगावकर, उपप्राचार्य डॉ. एन. के. मुळे, उपप्राचार्य प्रकाश गवते, उपप्राचार्य पवन शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलतांना प्रा.प्रशांत मोरे म्हणाले की,आजची परिस्थिती आव्हानात्मक असली तरी त्याला दोष देत बसण्यापेक्षा ती बदलण्याचे धाडस तरुणांनी केले पाहिजे. ज्ञान, विचार, विवेक आणि सकारात्मक दृष्टिकोन यांच्या माध्यमातून तरुणांनी स्वतःचे तसेच समाजाचे भविष्य घडवावे असा प्रेरणादायी संदेश त्यांनी दिला त्याचबरोबर यावेळी मोरे यांनी बहारदार कविता सादर केल्या. यावेळी ॲड. बी. आर. डक यांनी आजच्या तरूणाई व सद्यस्थिती याविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. अभय सोळुंके यांनी केले.

# जाती पातीत न अडकता एक संघ समाज व्यवस्था निर्माण करणे हाच उद्देश असला पाहिजे - तहसीलदार



माजलगाव - माजलगाव तालुक्यातील पात्रुड येथील हेमाडपंथी गणेश सार्वजनिक गणेश मंडळाच्या ठिकाणी ग्रामस्थांची शांतता कमिटीची बैठक घेण्यात आली याप्रसंगी तहसीलदार संतोष रुईकर यांनी आपली मत व्यक्त केली.

याप्रसंगी बोलताना म्हणाले की, गणेश उत्सव साजरा करण्या पाठीमागचा उद्देश पाहता हिंदू समाजातील जात-पात उच्चाटन करून समूह भावनेतून सामाजिक एकोपा जोपासून, सामूहिक एकता व शारीरिक मानसिक निरोगी जीवन जगणे हाच उद्देश आहे. त्याचबरोबर सामूहिक गणेश मंडळांनी समाज उपयोगी वेगवेगळे कार्यक्रम घेऊन समाजाला नवी दिशा व प्रेरणा देण्याचे काम केले पाहिजे. त्यात आरोग्य शिक्षण याचबरोबर निसर्गाचा समतोल राखण्यासाठी वृक्ष लागवड करणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचेही त्यांनी नमूद केल, सध्याच निसर्ग कोपला असल्याने शेतकरी संकटात सापडला आहे भविष्य काळातही अशी परिस्थिती निर्माण होऊ नये म्हणून प्रत्येक शेतकऱ्यांनी व ग्रामस्थांनी आपल्या परिसरात जास्तीत जास्त वृक्ष लागवड करावी अशे त्यांनी याप्रसंगी आव्हान केले. पात्रुड हे गाव मोठे असल्याने सर्व जातीची लोक सार्वजनिक कार्यक्रमाला उपस्थित राहतात याचा आनंद वाटतो. येणारा गणेशोत्सव ही अशाच आनंदात शांततेत साजरा करावा असेही ते म्हणाले याप्रसंगी गावचे सरपंच लतीफ मोमीन, उपसरपंच घनश्याम भुतडा, डॉ. वसीम मनसबदार, माजी सरपंच एकनाथ मस्के, ग्रामसेवक भागवत भुजबळ, भीमराव काळे, अशोक आगरकर, बाबासाहेब चाळक, बाबुराव आव्हाड, माऊली नाटकर, बाळासाहेब बनकर, महारुद्र जंगले, बिबीशन मगर, नवनाथ चाळक, अमोल झगडे, माऊली काळे, परमेश्वर काळे, विलास मोरे, बाळासाहेब धुमाळ, दिपक शिंदे, यासह सर्व गणेश मंडळाचे अध्यक्ष व ग्रामस्थ उपस्थित होते

# मोदी लर्निंग सेंटरमध्ये 78 व्या मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त विद्यार्थ्यांसाठी देशभक्तिपर उपक्रमांचे आयोजन



**अंबाजोगाई :** येथील श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित न्यू व्हिजन पब्लिक स्कूल, मोदी लर्निंग सेंटर येथे ७८ वा मराठवाडा मुक्ती संग्राम दिन देशभक्तीपूर्ण आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांसाठी विविध देशभक्तिपर उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

७८ व्या मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त ध्वजारोहण डी.फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.संतोष तरके यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांसाठी विविध देशभक्तिपर उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. इयत्ता ५ वी ते ७ वीच्या विद्यार्थ्यांचे पथसंचलन शिस्तबद्ध पद्धतीने झाले, तर इयत्ता ८ वीच्या विद्यार्थ्यांनी लेझीम नृत्याचे उत्स्फूर्त सादरीकरण करून उपस्थितांची दाद मिळवली. मराठवाड्याच्या स्वातंत्र्यलढ्यात मोलाचे योगदान देणाऱ्या स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ, अनंत भालेराव यांसह अनेक स्वातंत्र्यसैनिकांच्या भूमिका इयत्ता तिसरीच्या विद्यार्थ्यांनी प्रभावीपणे साकारल्या. या सादरीकरणातून विद्यार्थ्यांनी एका अर्थाने मराठवाडा मुक्ती संग्रामाचा इतिहासच जिवंत केला. शाळेच्या संगीत समूहाने सादर केलेल्या देशभक्तिपर गीतांनी कार्यक्रमात उत्साह आणि राष्ट्रप्रेमाचे वातावरण निर्माण केले. यावेळी इयत्ता दुसरीचा विद्यार्थी राघव चाटे याने मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त प्रभावी भाषण करून उपस्थितांची वाहवा मिळवली. तसेच इयत्ता ९ वीची विद्यार्थिनी संस्कृती घाडगे हिने आपल्या भाषणातून मराठवाडा मुक्ती संग्रामाच्या इतिहासाला उजाळा देत विद्यार्थ्यांमध्ये स्वातंत्र्यलढ्याची जाणीव जागृत केली. कार्यक्रमात प्रमुख अतिथी डॉ. संतोष तरके तसेच शाळेचे प्राचार्य डॉ.पांडुरंग पाटील यांनी विद्यार्थ्यांना समायोचित मार्गदर्शन केले. स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागातून मिळालेले स्वातंत्र्य, मराठवाड्याच्या मुक्ती संग्रामाचा इतिहास आणि नव्या पिढीने या इतिहासातून प्रेरणा घेण्याची गरज याविषयीचे मौलिक विचार त्यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमास श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक सचिव राजकिशोर मोदी, व्यवस्थापकीय संचालक संकेत मोदी यांनी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या सर्व विद्यार्थी, पालक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना शुभेच्छा दिल्या.

# दत्ता कांबळे यांची काँग्रेस अनुसूचित जाती विभागाने जिल्हाध्यक्ष होण्याची 'हॅट्ट्रीक'



**माजलगाव:** प्रतिनिधी

फुले, शाहू, आंबेडकरी विचारांशी बांधीलकी जपणारे पुरोगामी चळवळीतील युवा नेतृत्त्व दत्ता कांबळे यांची महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस अनुसूचित जाती विभागाच्या बीड जिल्हाध्यक्षपदी तिसऱ्यांदा फेर निवड करण्यात आली आहे. .

आंबेडकरी चळवळीचे युवा नेतृत्व दत्ता भाऊ कांबळे यांची सलग तिसऱ्यांदा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस अनुसुचित जाती विभागाच्या बीड जिल्हाध्यक्षपदी फेर निवड करण्यात आली आहे. एक अभ्यासू नेता म्हणून त्यांची झालेली सलग तीन वेळा फेर निवड त्यांच्या कार्याची खरी पावती आहे. दत्ता कांबळे यांच्या निवडीमुळे काँग्रेसची विचारधारा तळागाळापर्यंत पोहोचविण्यास निश्चित मदत होईल. काँग्रेस पक्षासाठी कांबळे यांचे मोठे योगदान राहिले आहे. गत विधानसभा निवडणुकीत परळीचे निरीक्षक व जागतिक बौध्द धम्म पदयात्रा जालनाचे जिल्हयाचे निरीक्षक, तसेच उस्मानाबाद वाशी निरीक्षक म्हणूनही त्यांनी प्रभावी काम केले आहे. कांबळे यांच्या फेर निवडीबद्दल त्यांच्यावर आभिनंदनाचा वर्षाव होत आहे. दरम्यान सदरील निवडीबद्दल नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष दत्ता भाऊ कांबळे यांनी समाज माध्यमातून अखिल भारतीय काँग्रेस अनु. जाती विभागाचे राष्ट्रीय अध्यक्ष राजेंद्र गौतम पालजी, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळजी, अखिल भारतीय काँग्रेसच्या नेत्या खासदार सौ. रजनी ताई पाटील, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस अनु. जाती विभागाचे प्रदेशाध्यक्ष अनिरुद्ध वनकर, माजी मंत्री अशोकराव पाटील, युवक काँग्रेस प्रदेश सरचिटणीस आदित्य पाटील,जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांचे आभार व्यक्त केले आहेत.

# पि.टी.आर. न मिळालेल्या अतिक्रमण धारकांनी कागदपत्रांची पूर्तता करावीं - नगराध्यक्ष सौ.गिताभाभी पवार



गेवराई -शासन निर्णयानुसार निवसी अतिक्रमण काय्यम करण्याची प्रक्रिया गेली तिन चार वर्षापासुन नगरपालिकेच्या वतीने सुरू आहे तर आज पर्यंत संजयनगर मध्ये 550 अतिक्रमण धारक कुटुंबाना पि.टी.आर. वाटप करण्यात आले आहे तर साठेनगर, संघमित्र नगर, संतोषनगर मध्ये 380 अतिक्रमण धारक कुटुंबाना पि.टी.आर. वाटप करण्यात आले आहे तर यादीत नाव आहे पण पि.टी.आर . मिळाला नाही अशा अतिक्रमण धारकांसाठी दि.21 व22 सप्टेंबर सोमवार, मंगळवार रोजी दोन दिवसाचा कॅप आयोजित करण्यात आला आहे तरी ज्यांचे नाव यादीत आहे पण पि.टी.आर. मिळाला नाही अशा अतिक्रमण धारकांसाठी न.प. ने कॅप आयोजित करण्यात आला आहे तरी राहीलेल्या लोकांनी खालील कागदपत्रे घेऊन नगरपालिकेच्या कर्मचारी अधिकारी यांच्याकडे

**खालील आवश्यक कागदपत्रे :** 2005 च्या यादीतील अनुक्रमांक - दारीद्रे खालील न.प. प्रमाणपत्र - महीला बचतगटाचे जुने बॅंक पासबुक -2011 च्या पुर्वीचे लाईटबील - 2011 पुर्वीची नळ कनेक्शनची जुनी पावती असे आवश्यक कागदपत्रे घेऊन संजयनगर येथील उत्तर बाजुतील अतिक्रमण धारकांसाठी सोमेश्वर मंदिर संजयनगर हे ठिकाण आहे तर दक्षिण बाजु व भटक्या विमुक्त भागातील नागरिकांसाठी भुमी अभिलेख कार्यालय समोर संज्जु बागवान यांच्या दुकाना जवळ ठिकाण निश्चित केले आहे

# चित्रकला स्पर्धेत कु. आरव अनिल गिरी यांचा तृतीय क्रमांक




**बीड :** "महाराष्ट्राच्या प्रगतीमध्ये रेल्वेचे योगदान" या विषयावर आयोजित चित्रकला स्पर्धेत सहभागी होत कु. आरव अनिल गिरी यांनी उल्लेखनीय कामगिरी करत तृतीय क्रमांक पटकावला. त्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

या उल्लेखनीय कामगिरीबद्दल मा. उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांच्या हस्ते कु. आरव अनिल गिरी यांना प्रमाणपत्र प्रदान करून गौरविण्यात आले. या सन्मानामुळे आरवच्या कलेला आणि त्याच्या मेहनतीला प्रोत्साहन मिळाले आहे.

आरवने मिळवलेल्या या यशामुळे गिरी परिवाराच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला असून, त्याच्या यशाचे कुटुंबीय, मित्रपरिवार आणि शुभेच्छुकांकडून कौतुक होत आहे.

लहान वयातच चित्रकलेच्या माध्यमातून आपली प्रतिभा सिद्ध करणाऱ्या आरवच्या या यशाबद्दल त्याचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात येत असून, त्याच्या पुढील शैक्षणिक व कलात्मक वाटचालीसाठी सर्वांकडून शुभेच्छा व्यक्त होत आहेत.

# निजामविरोधी लढ्यात आर्यसमाजाचे मोठे योगदान; नव्या पिढीने मराठवाडा मुक्तिसंग्रामाचा इतिहास जाणून घ्यावा - प्रवीण सरदेशमुख

**अंबाजोगाई :** निजामाच्या जुलमी राजवटीविरूद्ध मराठवाड्यात झालेल्या संघर्षात आर्य समाजाने अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. १९१५ पासून १९४८ पर्यंत विविध माध्यमांतून निजामविरोधी जनजागृती आणि संघर्ष उभा करण्यात आर्य समाजाचा मोठा वाटा होता. या मुक्तिसंग्रामाचा इतिहास नव्या पिढीने जाणून घेणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या केंद्रीय कार्यकारिणीचे सदस्य प्रवीण सरदेशमुख यांनी केले.

इतिहास विभागाने आयोजित केलेल्या मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्थानिक व्यवस्था मंडळाचे अध्यक्ष डॉ.अतुलराव देशपांडे, केंद्रीय कार्यकारणी सदस्य तथा महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष राम कुलकर्णी, महाविद्यालय विकास समिती सदस्य भीमसेन शिंदे, सीबीसीचे अध्यक्ष डॉ.गोपाळ चौसाळकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दीपक फुलारी आदींची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना श्री.सरदेशमुख म्हणाले की, निजामाच्या राजवटीत जनतेवर विविध प्रकारचे निर्बंध होते. या परिस्थितीत आर्य समाजाने महिला परिषद, शैक्षणिक परिषद यांसारखे उपक्रम संपूर्ण मराठवाड्यात राबवून सामाजिक व राष्ट्रीय चेतना जागृत केली. त्याचबरोबर लेखणीच्या माध्यमातून ही आंदोलन उभे केले. विविध वर्तमानपत्रे आणि लेखांच्या माध्यमातून जनतेमध्ये स्वातंत्र्याची भावना निर्माण करण्याचे काम झाले. मराठवाडा यांसारख्या वर्तमानपत्रांनी जनजागृती मध्ये योगदान दिले. निजाम विरोधी लढ्यात हिंदू महासभा आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघानेही आपापल्या पातळीवर कार्य केले. वामनराव नाईक यांनी हिंदू महासभेच्या माध्यमातून चळवळ उभी केली, तर स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या विचारांनी मराठवाड्यातील संघर्षाला प्रेरणा मिळाली, असे श्री.देशमुख यांनी सांगितले. १९३८ मध्ये हैदराबाद स्टेट काँग्रेसची स्थापना झाल्यानंतर निजामाने तिच्यावर बंदी घातली. स्वामी रामानंद तीर्थ हे या चळवळीशी जोडले गेले आणि राष्ट्रीय काँग्रेसने ही निजाम विरोधात आंदोलने व सत्याग्रह केले. आर्य समाज आणि हैद्राबाद स्टेट काँग्रेसच्या माध्यमातून झालेल्या सत्याग्रहांनी




निजामशाहीविरोधातील जनआंदोलनाला व्यापक स्वरूप दिले. मराठवाड्यातील शैक्षणिक संस्थांनीही राष्ट्रजागृतीचे महत्त्वपूर्ण कार्य केले. हिप्परगा येथील राष्ट्रीय शाळा त्याचे उल्लेखनीय उदाहरण आहे. या शाळेत स्वामी रामानंद तीर्थ यांनी शिक्षक म्हणून काम केले होते. बाबासाहेब परांजपे यांच्यासह अनेक राष्ट्रभक्त व्यक्तींनी शिक्षणाच्या माध्यमातून राष्ट्रीय विचारांची पेरणी केली. पुढे अंबाजोगाईतील योगेश्वरी शिक्षण संस्थेसह मराठवाड्यातील अनेक शिक्षण संस्थांनी राष्ट्रचेतना जागविण्याचे काम केले. १९४७ मध्ये भारत स्वतंत्र झाला. मात्र हैद्राबाद संस्थान निजामाच्या ताब्यातच राहिले. रझाकारांच्या माध्यमातून जनतेवर अत्याचार झाले. कासीम रिझवीच्या नेतृत्वाखालील रझाकारांनी मराठवाड्यात दहशत निर्माण केली. मंदिरांची तोडफोड, हत्या आणि अत्याचाराच्या अनेक घटना घडल्या. धारूर परिसरातील काशिनाथ पवार यांची पोळ्याच्या दिवशी झालेली हत्या ही त्या काळातील अत्याचारांची आठवण करून देणारी घटना असल्याचे देशमुख यांनी नमूद केले. हैदराबाद संस्थान भारतात विलीन करण्यासाठी तत्कालीन केंद्रीय गृहमंत्री लोहपुरूष सरदार वल्लभभाई पटेल यांनी मुत्सद्देगिरी आणि निर्णायक भूमिका बजावली. अखेर १३ सप्टेंबर १९४८ रोजी भारतीय सैन्याची ऑपरेशन पोलो अंतर्गत लष्करी कारवाई सुरू झाली. जनरल जे.एन.चौधरी यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई झाली आणि अखेर १७ सप्टेंबर १९४८ रोजी हैद्राबाद संस्थान भारतीय संघराज्यात विलीन झाले. मराठवाडा मुक्तिसंग्राम हा केवळ एका संघटनेचा किंवा एका व्यक्तीचा इतिहास नसून विविध संघटना, कार्यकर्ते, सत्याग्रही, पत्रकार, शिक्षक आणि सामान्य जनतेच्या संघर्षातून साकारलेला स्वातंत्र्य लढा आहे. या संघर्षातील विविध प्रवाहांचा वस्तुनिष्ठ इतिहास नव्या पिढीपर्यंत पोहोचविणे ही आपली जबाबदारी आहे, असेही प्रवीण सरदेशमुख यांनी सांगितले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोप करताना डॉ.अतुलराव देशपांडे यांनी मराठवाडा मुक्ती दिन संग्रामाच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या तसेच महाविद्यालयात विविध स्पर्धेमध्ये पारितोषिक प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले तसेच त्यांनी ऑपरेशन पोलो आणि पोलीस ॲक्शन या संदर्भामध्ये निजाम राजवटी मध्ये स्वातंत्र्य सैनिकांनी केलेल्या कार्याविषयी माहिती दिली. तसेच स्वातंत्र्यसैनिकाच्या भावना कवितेद्वारे मांडल्या. यावेळी इतिहास वैचारिक लेख निबंध स्पर्धेमध्ये मिळविलेल्या पारितोषिकांचे वितरण मान्यवर तर्फे करण्यात आले. तसेच टेबल टेनिस स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक प्राप्त झालेल्या विद्यार्थिनींचा तसेच महाराष्ट्र शासनाचा संस्कृत कार्यकर्ता पुरस्कार डॉ.दिगंबर मुडेगावकर यांचा देखील यथोचित सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दीपक फुलारी यांनी केले. तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.कालिदास चिटणीस यांनी करून उपस्थितांचे आभार डॉ.मनीषा रोकडे यांनी मानले. या कार्यक्रमाला सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता गौरीशंकर स्वामी, उपअभियंता गोविंद मुंडे यांची आवर्जून उपस्थित होती.

# मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त गुणवंत विद्यार्थ्यांचा सपोनि दिनकर गोरे यांच्या हस्ते गौरव



तभा.वृत्तसेवा
सोयगाव,दि.१९ सप्टेंबर

जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा सोयगाव येथे मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये भाषण स्पर्धा तसेच ‘वाहतूक नियम पाळा’ या विषयावर चित्रकला स्पर्धा घेण्यात आली.या स्पर्धेत सहभागी होऊन उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सहाय्यक पोलीस निरीक्षक दिनकर गोरे यांच्या हस्ते ट्रॉफी, प्रमाणपत्र व पेन देऊन गौरव करण्यात आला.

यामध्ये वेदांत शरद पवार याचाही विशेष सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक करताना दिनकर गोरे यांनी शिक्षण,मेहनत आणि सातत्य यांचे महत्त्व सांगून विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. त्यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये नवा उत्साह निर्माण झाला. विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी दिलेल्या मार्गदर्शनाबद्दल शाळेच्या वतीने सपोनि.दिनकर गोरे यांचे मनःपूर्वक आभार व कौतुक करण्यात आले.

यावेळी उपस्थित मान्यवर केंद्रप्रमुख फिरोज तडवी, मुख्याध्यापक हरिदास काटोले,शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष भगवान सोनवणे,किरण पाटील,मंगला बोरसे मॅडम, सविता पाटील,रामचंद्र महाकाळ,गणेश बाविस्कर

अंकुश काळे,प्रतिभा कोळी,सुरेखा चौधरी,कला शिक्षक विवेक महाजन,क्रीडा शिक्षक आणि देसाई,कार्यानुभव शिक्षक तानाजी चव्हाण व पालक वर्ग उपस्थित होता.

## 1,000 हून अधिक टचपॉइंट्सचे लक्ष्य

**छत्रपती संभाजीनगर :** एआय प्लस स्मार्टफोनने भारतातील विक्रीपश्चात सेवा अधिक सक्षम करण्यासाठी 1,000 हून अधिक सर्व्हिस टचपॉइंट्सपर्यंत नेटवर्क विस्तारण्याची योजना जाहीर केली आहे. विद्यमान 800 हून अधिक केंद्रांमध्ये 200 हून अधिक नवीन केंद्रांची भर पडणार आहे. दिल्लीमध्ये दिवाळीत कंपनीचे पहिले एक्सक्लुझिव्ह सर्व्हिस सेंटर सुरू होणार आहे. यासोबतच एआय प्लस असिस्टन्स ॲप सादर करण्यात आले असून, त्याद्वारे सर्व्हिस बुकिंग, तिकिट ट्रॅकिंग, वॉरंटी माहिती, जवळचे सर्व्हिस सेंटर आणि समस्यानिवारण सुविधा उपलब्ध होतील. सीईओ माधव सेठ यांनी हा विस्तार ग्राहकांना अधिक सुलभ, पारदर्शक आणि विश्वासार्ह सेवा देण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल असल्याचे सांगितले.

## ग्राहकांसाठी यूपीआय पेमेंट मोफत

**छत्रपती संभाजीनगर :** यूपीआयच्या माध्यमातून होणाऱ्या डिजिटल पेमेंटबाबत ग्राहक आणि व्यापाऱ्यांमध्ये एमडीआरबाबत अनेक प्रश्न असतात. ग्राहकांसाठी यूपीआय पेमेंट मोफतच राहणार असून, निवडक पात्र व्यापारी व्यवहारांवर मर्चंट डिस्काउंट रेट (एमडीआर) लागू करण्यात आला आहे. एमडीआर म्हणजे ग्राहकांकडून कार्ड किंवा डिजिटल पेमेंट स्वीकारताना व्यापाऱ्याला द्यावी लागणारी फी. मात्र, यूपीआयद्वारे पेमेंट करणाऱ्या ग्राहकांकडून कोणतीही एमडीआर फी आकारली जाणार नाही.

## भारताच्या पवन ऊर्जा क्षेत्राने 58 गिगावॅटचा टप्पा ओलांडला

**चेन्नई :** भारताच्या पवन ऊर्जा क्षेत्राने 31 ऑगस्ट 2026 पर्यंत 58.52 गिगावॅट स्थापित क्षमतेचा टप्पा गाठला आहे. आर्थिक वर्ष 2025-26 मध्ये विक्रमी 6.05 गिगावॅट क्षमता जोडण्यात आली. विंडर्जी इंडिया 2026 मध्ये 2030 पर्यंत 100 गिगावॅटचे लक्ष्य, देशांतर्गत उत्पादन, निर्यात, ऑफशोअर पवन ऊर्जा आणि रिपॉवरिंगवर भर दिला जाणार आहे. देशातील टर्बाइन उत्पादन क्षमता आता वार्षिक 24 गिगावॅट झाली असून, पवन उपकरणांची निर्यात ₹12,000 कोटींवर पोहोचली आहे. गुजरात आणि तामिळनाडूमधील प्रत्येकी 500 मेगावॅटच्या ऑफशोअर प्रकल्पांनाही चालना मिळत आहे.

## आर. माधवन यांच्यासोबत ‘नथिंग स्मॉल अबाऊट अस’ मोहीम

**मुंबई:** उज्जीवन स्मॉल फायनान्स बँकेने अभिनेता व पद्मश्री पुरस्कारप्राप्त आर. माधवन यांना ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून नियुक्त करत ‘नथिंग स्मॉल अबाऊट अस’ ही नवीन जाहिरात मोहीम सुरू केली आहे. 26 राज्ये व केंद्रशासित प्रदेशांमधील 800 हून अधिक शाखांद्वारे बँक 1 कोटीपेक्षा अधिक ग्राहकांना सेवा देते. बँकेच्या बचत, ठेवी, कर्ज, बिझनेस बँकिंग, फॉरेक्स, एनआरआय सेवा आणि संपत्ती व्यवस्थापनासह विविध सेवांची व्यापक श्रेणी या मोहिमेत अधोरेखित करण्यात आली आहे. ‘स्मॉल’ या नावामुळे निर्माण होणाऱ्या मर्यादित बँकिंग सेवांच्या धारणेत बदल घडवून आणणे हा मोहिमेचा उद्देश आहे.

## ‘भूतम् भयम्’ 25 सप्टेंबरपासून मराठी झी5वर

**मुंबई:** : नेहमीच्या हॉरर चित्रपटांपेक्षा वेगळ्या अलौकिक साहसाचा अनुभव घेण्यासाठी सज्ज व्हा. ‘भूतम् भयम्’चा प्रीमियर 25 सप्टेंबर 2026 रोजी केवळ मराठी झी5वर होणार आहे. या चित्रपटातून रामचंद्र गावकर दिग्दर्शनात पदार्पण करत आहेत. भय, विनोद, रहस्य आणि साहस यांचा अनोखा मिलाफ या चित्रपटात पाहायला मिळणार आहे. कोणतीही वस्तू सोन्यात बदलण्याची शक्ती असलेले एक प्राचीन नाणे या हटके कल्पनेभोवती चित्रपटाची कथा फिरते.झी स्टुडिओज मराठी प्रस्तुत आणि कायरा कुमार क्रिएशन्सच्या बॅनरखाली निर्मिती करण्यात आलेल्या ‘भूतम् भयम्’मध्ये छाया कदम, पुष्कराज चिरपुटकर, करण सोनावणे, नील साळेकर, सौरभ घाडगे आणि शुभम जाधव यांच्यासह नव्या पिढीतील अनेक गुणी कलाकारांच्या भूमिका आहेत.

## भारताच्या हरित ऊर्जा संक्रमणाला बळ

मुंबई- भारताच्या स्वच्छ ऊर्जा संक्रमणाने आता निर्णायक टप्प्यात प्रवेश केला आहे. अक्षय ऊर्जा निर्मितीचा विस्तार करणे अत्यावश्यक असले, तरी वीजनिर्मिती मुबलक असलेल्या प्रदेशांमधून ही वीज ज्या ठिकाणी तिची सर्वाधिक गरज आहे, त्या केंद्रांपर्यंत कार्यक्षमतेने पोहोचवणे हे खरे आव्हान आहे. त्यामुळे मजबूत, सक्षम आणि भविष्यासाठी सज्ज असलेले वीज पारेषण जाळे हे भारताच्या हरित ऊर्जा महत्त्वाकांक्षेचा कणा ठरणार आहे. हे जाळे अक्षय ऊर्जेपासून निर्माण होणारी वीज घरे, उद्योग, व्यवसाय, रुग्णालये आणि इतर महत्त्वाच्या पायाभूत सुविधांपर्यंत पोहोचविण्याचे काम करेल. भारत स्वच्छ ऊर्जा संक्रमणाला वेग देत असून, २०३० पर्यंत ५०० गिगावॅट बिगर-जीवाश्म इंधनाधारित वीज निर्मिती क्षमतेचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. जुलै २०२६ पर्यंत देशाने ३००.५ गिगावॅट पेक्षा अधिक क्षमता गाठली आहे. अक्षय ऊर्जा निर्मितीचा विस्तार होत असताना, ही स्वच्छ ऊर्जा विविध प्रदेशांपर्यंत पोहोचविण्यासाठी सक्षम आणि मजबूत पारेषण पायाभूत सुविधा अत्यंत महत्त्वाच्या ठरणार आहे.

# कन्नड ग्रामीण रुग्णालयाची क्ष-किरण सेवा अखेर पूर्ववत

तभा वृत्तसेवा

**कन्नड :** दि.१९ सप्टेंबर - ग्रामीण रुग्णालयातील क्ष-किरण विभाग बंद असल्याने रुग्णांची होणारी गैरसोय अखेर दूर झाली आहे. २९ जुलै पासून बंद असलेली क्ष-किरण सेवा आवश्यक सी.आर. कॅसेट उपलब्ध झाल्यानंतर अवघ्या पाच दिवसांत पूर्ववत सुरू करण्यात आली. यासोबतच वैद्यकीय अधिकारी व विशेषज्ञांच्या नियमित सेवा उपलब्ध करून देणे, अधिकारी-कर्मचाऱ्यांनी मुख्यालयी राहणे आणि शस्त्रक्रियागृह सुरू करण्याच्या दृष्टीनेही रुग्णालय प्रशासनाकडून कार्यवाही सुरू असल्याची माहिती देण्यात आली.

आरोग्यसेवा आयुक्तालयाचे राज्य नोडल अधिकारी तथा जिल्हा चिकित्सक, जळगाव डॉ. स्वप्नील सांगळे आणि कन्नड-सोयगाव मतदारसंघाच्या आमदार संजना जाधव यांनी १२ सप्टेंबर रोजी ग्रामीण रुग्णालयाला भेट देऊन आरोग्यसेवांचा आढावा घेतला होता. यावेळी क्ष-किरण विभाग बंद असणे, वैद्यकीय अधिकारी व विशेषज्ञांची उपलब्धता आणि अधिकारी-कर्मचाऱ्यांनी मुख्यालयी राहण्याच्या मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली.



क्ष-किरण सेवा सुरू करण्यासाठी रुग्णालय प्रशासनाने वरिष्ठ कार्यालयाशी पत्रव्यवहार केला होता. बैठकीदरम्यान डॉ. सांगळे यांच्याकडे आवश्यक सी.आर. कॅसेट उपलब्ध करून देण्याची विनंती करण्यात आली. त्यांच्या सहकार्याने जिल्हा रुग्णालय, जळगाव येथून कॅसेट उपलब्ध करून देण्यात आली. ती आणण्यासाठी वैद्यकीय अधीक्षक डॉ. दत्ता देगावकर यांनी क्ष-किरण वैज्ञानिक अधिकारी राजधर मोहिते आणि वाहनचालक विद्यासागर काशीद यांना जळगाव येथे पाठविले. आवश्यक साधनसामग्री मिळाल्यानंतर क्ष-किरण सेवा पुन्हा सुरू करण्यात आली.रुग्णालयातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मुख्यालयी वास्तव्यास राहणे आवश्यक असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. जे अधिकारी व कर्मचारी मुख्यालयी राहणार नाहीत, त्यांच्या सप्टेंबर २०२६ च्या वेतनातून नियमानुसार घरभाडे भत्ता कपात करण्याची कार्यवाही करण्यात येणार असल्याचेही सांगण्यात आले.

# नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष बनकर यांचा सत्कार; संघटन मजबूत करण्याचा विश्वास



तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** भारतीय जनता पक्षाच्या छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पूर्व जिल्ह्याच्या जिल्हाध्यक्षपदी सुरेश बनकर यांची नियुक्ती करण्यात आली. भाजपचे प्रदेश महामंत्री सुनील राणे यांनी प्रदेशाध्यक्षांच्या वतीने बनकर यांना नियुक्तीपत्र प्रदान करून त्यांच्या नियुक्तीची घोषणा केली.

नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष सुरेश बनकर यांचा यावेळी पक्षाच्या पदाधिकाऱ्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. भाजप शहराध्यक्ष किशोर शितोळे यांनी बनकर यांचे अभिनंदन करून पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.

बनकर यांच्या नेतृत्वाखाली ग्रामीण पूर्व जिल्ह्यात पक्षाची संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत होईल. तसेच पक्षाच्या विविध उपक्रमांना आणि संघटनात्मक कार्याला नवी दिशा मिळेल, असा विश्वास यावेळी पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

# धर्मवीर संभाजी कर्मचारी पतसंस्थेची 30 वी वार्षिक सभा संपन्न

तभा वृत्तसेवा

**कन्नड :**दि.१९ सप्टेंबर - धर्मवीर संभाजी कर्मचारी पतसंस्थेची ३० वी वार्षिक सर्वसाधारण सभा अध्यक्षा ताराबाई कृष्णराव जाधव यांच्या अध्यक्षतेखाली आणि जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव सागर जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. या सभेत संस्थेच्या आर्थिक प्रगतीचा आढावा घेण्यात आला. संस्थेला ५ लाख ८९ हजार ६५३ रुपयांचा नफा झाला असून, सभासदांना ६.९० टक्के लाभांश वाटप करण्यास मंजुरी देण्यात आली.



सभेच्या प्रारंभी सभासदांच्या दिवंगत माता-पित्यांना तसेच स्व. बाबुराव परशुराम निकम आणि ठाणसिंग राठोड यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. नुकताच ‘मराठवाडा रत्न’ पुरस्काराने सन्मानित झालेले जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव सागर जाधव यांचा पतसंस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला. तसेच सेवानिवृत्त सभासद युवराज मेढे यांचा सपत्नीक सेवा गौरव करून सन्मान करण्यात आला. सभेचे प्रास्ताविक संस्थेचे संचालक सचिव प्रदीप सनंसे यांनी केले. यावेळी संस्थेच्या आर्थिक व्यवहारांचा आढावा घेऊन आदर्श उपविधीस तसेच सुधारित ठेवींना मंजुरी देण्यात आली. सभासदांना ६.९० टक्के लाभांश वाटप करण्याच्या निर्णयालाही सभेने मान्यता दिली.

मार्गदर्शन करताना सागर जाधव यांनी सभासदांनी पतसंस्थेत जास्तीत जास्त ठेवी ठेवून संस्थेला स्वयंपूर्ण बनविण्यासाठी योगदान द्यावे, असे आवाहन केले. अध्यक्षीय समारोपात ताराबाई जाधव यांनी सभासदांचे आभार मानले. सभासदांच्या हिताचे निर्णय घेण्यासाठी संस्था नेहमीच कटिबद्ध राहील, अशी ग्वाही त्यांनी दिली.

यावेळी सभासदांच्या गुणवंत पाल्यांचा स्मृतिचिन्ह व बक्षीस देऊन गौरव करण्यात आला. अथर्व जाधव, अभिनव राठोड, प्रणव जाधव, उन्नती परदेशी, सायली दाबके, शिवम निकम, प्रणाली सनंसे आणि जानवी मेढे या गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.

सभेस मुख्याध्यापक मारुती तायडे, अनिल एडके, युवराज मेढे, प्रकाश जिरेमाळी, टीला राठोड, आजिनाथ जाधव, रवींद्र पाटील, देवेंद्र राजपूत, चंद्रकांत दापके, सचिन भामरे, जगन्नाथ जाधव, गणेश डव्हारे, मोहिनी शिंपी, पंढरीनाथ उसरे यांच्यासह संचालक मंडळ आणि सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गंगापूर शहरात नृसिंह गणेश मंडळाची भव्य दिव्य गणेशमूर्ती



तभा वृत्तसेवा

गंगापूर दि.१९ सालाबादप्रमाणे गणेशोत्सवा निमित्ताने शहरातील नृसिंह गणेश मंडळाने भव्य दिव्य गणेशमूर्तीची स्थापना केली असून गणेशाच्या दर्शनासाठी भाविक भक्त मोठ्या संख्येने येत आहेत.

नृसिंह गणेश मित्र मंडळ, नृसिंह कॉलनी गंगापूर गणेशोत्सव कार्यकारीणी अध्यक्ष गणेश अंबिलवादे , संकेत कदम, साई कदम, मोहित कुलकर्णी, अथर्व भालेराव, करण धामणे, निखिल जावळे, कृष्णा टेमकर, गजानन कुलकर्णी, जयेश तारडे, समियन मालपाणी,दत्ता कळसकर, रुद्र जोशी , सार्थक मालपाणी , ओम जावळे , मल्हार मुळे, नंदन बजाज ओंकार बिडकर आदी कार्यकर्ते सहभागी आहेत.

# पीएम श्री शाळांमधील उपक्रमांची केंद्राच्या सहसचिवांकडून पाहणी

## शैक्षणिक गुणवत्ता, नाविन्यपूर्ण उपक्रम आणि सुविधांबाबत समाधान

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** भारत सरकारचे सहसचिव तथा पीएम श्री योजनेचे केंद्रीय नोडल अधिकारी शशांक मिश्रा, आयएएस (२००७ बॅच) यांनी जिल्ह्यातील पीएम श्री शाळांना भेट देऊन शैक्षणिक गुणवत्ता, भौतिक सुविधा आणि नाविन्यपूर्ण उपक्रमांची पाहणी केली. शाळांमध्ये राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले.

मिश्रा यांनी गंगापूर तालुक्यातील पीएम श्री जिल्हा परिषद शाळा, माळी वडगाव येथे भेट देऊन विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता, लेखन व वाचन कौशल्यांची पाहणी केली. तसेच शाळेतील परसबाग, वर्मी कंपोस्ट, ॲस्ट्रॉनॉमी लॅब आणि आयडियल सेंटरची माहिती घेतली. विद्यार्थ्यांची प्रगती, शाळेचा परिसर आणि नाविन्यपूर्ण उपक्रम पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले.



यानंतर त्यांनी पीएम श्री जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, सातारा येथे भेट देऊन डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम खगोल विज्ञान केंद्र, संगणकीय कक्ष, स्वच्छतागृह, डेनस फॉरेस्ट तसेच इतर उपक्रमांची पाहणी केली.

त्यानंतर जिल्ह्यातील सर्व गटशिक्षणाधिकारी आणि पीएम श्री शाळांच्या मुख्याध्यापकांची बैठक घेण्यात आली. यावेळी पीएम श्री उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी, शैक्षणिक गुणवत्ता वाढ, भौतिक सुविधांचा विकास आणि नाविन्यपूर्ण उपक्रम याबाबत मिश्रा यांनी मार्गदर्शन केले. जिल्ह्यातील शाळांमध्ये सुरू असलेल्या प्रयत्नांबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. उपस्थितांनी मांडलेल्या विविध सूचना आणि अडचणी केंद्र शासनाच्या स्तरावर पोहोचविण्याचे आश्वासनही त्यांनी दिले.

“आपल्या शाळांमध्ये होणारे चांगले व नाविन्यपूर्ण उपक्रम मला व्हॉट्सॲपद्वारे नियमितपणे शेअर करत राहा,” असे आवाहन मिश्रा यांनी मुख्याध्यापकांना केले.

त्यांची ही भेट शिक्षक, मुख्याध्यापक आणि शिक्षण विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी प्रेरणादायी ठरली. त्यांच्या मार्गदर्शनामुळे शाळांमध्ये गुणवत्ता, नाविन्यता आणि भौतिक विकासाला अधिक गती देण्यास प्रोत्साहन मिळाले. यावेळी शिक्षणाधिकारी संघरत्न सरोदे आणि सहाय्यक कार्यक्रमाधिकारी डॉ. सोज्वल जैन उपस्थित होते.

# श्रीमती मानकबाई पटेल यांना पेन्शन सुरु करण्याची मागणी



तभा वृत्तसेवा

**पैठण दि १९ :** येवल्याचे मनीलाल लालदास पटेल व श्रीराम मोगल शिंपी या दोघांनी बाल वयात भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील चलेजाव चळवळी सक्रिय भाग घेतला होता त्यामुळे त्यांना 41 दिवस तुरुंगवास भोगला होता बाल वयात स्वातंत्र्यलढ्यात सहभागी स्वातंत्र्य सैनिका बद्दल शासनाला अभिमान आहे त्यांच्यावर अन्याय होणार नाही याची शासन दक्षता घेते श्रीराम मोगल शिंपी यांना महाराष्ट्र शासनाने पेन्शन दिली परंतु मनीलाल पटेल यांना त्यांच्या हयातीत पेन्शन मिळाली नाही पटेल यांची पेन्शन सुरू करण्यासंदर्भातील स्वातंत्र्यलढ्यातील परिपूर्ण कागदपत्र संचिका मंत्रालयात आहे अनेक स्वातंत्र सैनिकांच्या निधनानंतर त्यांच्या पत्नीना 2 जून 2016 चा जीआर शितल करून पेन्शन सुरू केली आहे 17 सप्टेंबरला मराठवाडा मुक्ती दिनानिमित्ताने मुख्यमंत्री संभाजीनगर येथे आले असता त्यांना एका शिष्टमंडळाने भेटून मनीलाल पटेल यांच्या पत्नी वयोवृद्ध ,थकलेल्या आजाराने त्रस्त झालेल्या श्रीमती मानकबाई पटेल यांना स्वातंत्र सैनिक पेन्शन सुरू करावी अशी मागणी एका निवेदनाद्वारे केली आहे.

# आबिद हुसेन इक्बाल अहमद यांना पीएच.डी. प्रदान

**छत्रपती संभाजीनगर, दि.१९ :** महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या सामाजिक शास्त्रे आणि मानव्यविद्या शाखेतील इन्स्टिट्यूट ऑफ इंडियन अँड फॉरेन लँग्वेजेसच्या



उर्दू विभागाचे संशोधक आबिद हुसेन इक्बाल अहमद यांना ‘प्रो. जिया उर रहमान की शख्सियत और अदबी खिदमात : एक तनकीदी मुताला’ या विषयावरील संशोधनासाठी पीएच. डी. प्रदान करण्यात आली आहे. त्यांना उर्दू विभागाचे संशोधन मार्गदर्शक डॉ. साजिद आलम यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल संशोधक श्री. आबिद हुसेन इक्बाल अहमद यांचे एमजीएम विद्यापीठाचे कुलपती श्री. अंकुशराव कदम, कुलगुरू प्रा. डॉ. विलास सपकाळ, कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर, अधिष्ठाता डॉ. रेखा शेळके, संचालक डॉ. के. पी. सिंग व सर्व संबंधितांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# गंगापूरमध्ये पैठणी वस्त्र उद्योग उभारावा; बेरोजगार युवकांना रोजगाराची संधी द्यावी

## काझी सलीम अल्लाउद्दीन यांचे शासन-प्रशासन व लोकप्रतिनिधींना निवेदन

तभा वृत्तसेवा

**गंगापूर दि.१९ :** गंगापूर तालुक्यातील बेरोजगार युवक-युवतींना स्थानिक पातळीवर रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी गंगापूर येथे पैठणी वस्त्र उद्योग, प्रशिक्षण व रोजगार केंद्र उभारण्यात यावे, अशी मागणी काझी सलीम अल्लाउद्दीन यांनी शासन-प्रशासन तसेच आमदार, खासदार, पालकमंत्री आणि संबंधित लोकप्रतिनिधींकडे केली आहे.

महाराष्ट्राची प्रसिद्ध पैठणी वस्त्रपरंपरा ही रोजगार निर्मितीचे मोठे साधन ठरू शकते. गंगापूर तालुक्यातील युवक-युवतींना रोजगारासाठी इतर शहरांकडे स्थलांतर करावे लागू नये, यासाठी स्थानिक पातळीवर कौशल्याधारित उद्योग उभारणे गरजेचे असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.



गंगापूर येथे पैठणी विणकाम, हातमाग, यंत्रमाग, वस्त्र डिझाईनिंग, रंगकाम, जरदारी, काठ-पदर निर्मिती, गुणवत्ता नियंत्रण तसेच आधुनिक वस्त्रनिर्मितीचे प्रशिक्षण देणारे केंद्र सुरू करावे. प्रशिक्षणार्थींना आधुनिक यंत्रसामग्री, कच्चा माल, तांत्रिक मार्गदर्शन आणि प्रशिक्षण प्रमाणपत्र उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

तसेच प्रशिक्षण पूर्ण केलेल्या युवक-युवतींना बँक कर्ज, अनुदान, स्वयंरोजगार योजना आणि बाजारपेठेशी जोडण्यात यावे. महिला बचतगट, स्थानिक कारागीर, दिव्यांग व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना विशेष प्राधान्य देऊन त्यांच्यासाठी रोजगाराच्या संधी निर्माण कराव्यात, अशी मागणीही करण्यात आली आहे.

गंगापूरमध्ये तयार होणाऱ्या वस्त्रांना बाजारपेठ मिळण्यासाठी विक्री केंद्र, प्रदर्शन केंद्र तसेच ऑनलाइन मार्केटिंगची सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

या प्रकल्पासाठी गंगापूर परिसरातील योग्य शासकीय जागेची पाहणी करून प्रकल्पाचा सविस्तर अहवाल (DPR) तयार करावा आणि आवश्यक निधीची तरतूद करावी. जिल्हा उद्योग केंद्र, वस्त्रोद्योग विभाग, कौशल्य विकास विभाग, संबंधित शासकीय महामंडळे आणि बँकांच्या समन्वयातून हा प्रकल्प राबवावा, अशी मागणी काझी सलीम अल्लाउद्दीन यांनी केली आहे.

जाहीर प्रगटन

मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर

सिव्हिल एम.ए. क्र.६७१/२०२६

अर्जदार :- १) गयाबाई भ्र भानुदास निरपळ वय ७३ वर्षे धंदा शेती रा. गणेशवाडी ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर २) उषा बाबासाहेब गव्हाणे, वय ४४ वर्षे धंदा शेती, रा. भेंडे वु. ता. नेवासा जि. अहिल्यानगर ३) कांताबाई बाळासाहेब नरोडे, वय ४३ वर्षे धंदा शेती रा. गणेशवाडी जि. छत्रपती संभाजीनगर ता. गंगापुर ह.मु. झोडेगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ४) जानका सुरेश नरोडे, वय ४२ वर्षे धंदा शेती, रा. गणेशवाडी ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ह.मु. झोडेगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ५) रेणुका मनोज कसाने वय ३६ वर्षे धंदा शेती रा मांजरी ता गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ६) अनिता अशोक तिखे वय ३२ वर्षे धंदा शेती रा मांजरी ता गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ७) सरोजा गणेश कसाने वय ३० वर्षे धंदा शेती रा मांजरी ता गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ८) सोनाली संदिप डोंगरे वय२८वर्षे धंदा शेती रा जिकठाण ता गंगापुर जि छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार :-निरंक

प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ प्रमाणे हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ श्री. रविराज बी दारुंटे यांचे मार्फत अर्ज सादर केला की, अर्जदार क्र.२ ते ८ या आपसांत नात्याने सख्या बहिणी असुन अर्जदार क्र.१ ही अर्जदार क्र.२ ते ८ यांची आई आहे. अर्जदार क्र.१ चे पति व अर्जदार क्र.२ ते ८ यांचे वडील नामे भानुदास भिमराज निरपळ हे मौजे गणेशवाडी ता. गंगापुर येथील रहिवाशी होते, ते दिनांक १३/०४/२०२५ रोजी मौजे गणेशवाडी ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झालेले आहे. मयत भानुदास भिमराज निरपळ यांना अर्जदार क्र.१ ते ८ हेच कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतिरीक्त मयत भानुदास भिमराज निरपळ यांना इतर कोणीही कायदेशीर वारसदार नसल्याचे नमुद करुन मयताचे मृत्युपश्चात शासकीय-निमशासकीय व इतर कार्यालयीन कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने मा. न्यायालयात सदरचा अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्यांचा असलेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुद्तीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक १९/०९/२०२६ रोजी दिले. प्रकरणात पुढील तारीख दिनांक २३/१०/२०२६ रोजीची आहे.

वरीष्ठ / कनिष्ठ लिपीक. सहाय्यक अधिक्षक,

दिवाणी न्यायालय गंगापुर

# युवा कवी लक्ष्मण वाल्डे यांच्या कविता संग्रहाचे निवृत्ती काळे यांच्या हस्ते प्रकाशन

तभा वृत्तसेवा

**कन्नड :** दि.१९ सप्टेंबर - टेलर वर्गाचे श्रमजीवन, वेदना आणि संघर्ष कवितेतून मांडणाऱ्या युवा कवी लक्ष्मण वाल्डे यांच्या ‘टेलर’ या आगळ्यावेगळ्या कविता संग्रहाचे शनिवार, १९ सप्टेंबर रोजी लोकनेते सहकारमहर्षी बाळासाहेब पवार वाचनालय, कन्नड येथे उत्साहपूर्ण वातावरणात प्रकाशन झाले. ज्येष्ठ साहित्यिक निवृत्ती काळे (वैजापूरकर) तसेच कवीचे वडील गंगाधर वाल्डे व आई शांताबाई वाल्डे यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. अध्यक्षस्थानी छत्रपती शिवाजी कॉलेजचे प्राचार्य डॉ. विजय भोसले होते.



टेलर वर्गाचे दुःख, संघर्ष, श्रमजीवन आणि जगण्याचे वास्तव कवितेच्या माध्यमातून मांडण्याचा वेगळा साहित्यिक प्रयोग या संग्रहातून करण्यात आल्याचे वक्त्यांनी नमूद केले.

ज्येष्ठ लेखिका प्रतिभा अहिरे यांनी संग्रहावर सखोल भाष्य करत नवोदित कवींना काव्यलेखनाबाबत मार्गदर्शन केले. तहसीलदार दिलीपकुमार सोनवणे यांनी कवीच्या साहित्यिक प्रयोगाचे कौतुक केले. संत साहित्याचे अभ्यासक डॉ. रामचंद्र झाडे यांनीही संग्रहाला शुभेच्छा दिल्या.

संग्रहाची प्रस्तावना लिहिणारे ज्येष्ठ साहित्यिक निवृत्ती काळे यांनी मनोगतातून त्याच्या साहित्यिक वैशिष्ट्यांवर प्रकाश टाकला. डॉ. शिवाजी हुसे यांनी टेलर वर्गाच्या समस्या आणि संघर्षाचा व्यापक पट संग्रहातून उलगडल्याचे सांगितले. ॲड. कृष्णा पाटील जाधव यांनी संग्रहावर भाष्य करत ग्रामीण जीवनानुभवांवर आधारित कविता सादर केल्या.

जाहीर प्रगटन

मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर

सिव्हिल एम.ए. क्र.६७८/२०२६

अर्जदार :-१) कांतीलाल रामराव आगळे, वय ६० वर्षे धंदा शेती, रा. सिरसगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर २) निवृत्ती रामराव आगळे, वय ५२ वर्षे धंदा शेती, या. सिरसगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार :- निरंक

प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ प्रमाणे हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ श्री. रविराज बी दारुंटे यांचे मार्फत अर्ज सादर केला की, अर्जदार क्र.१ व २ हे आपसांत नात्याने सख्खे भाऊ असुन अर्जदार क्र.१ व २ यांचे वडील नामे रामराव दादा आगळे हे मौजे सिरसगाव ता. गंगापुर येथील रहिवाशी होते, ते दिनांक १४/०१/२०२५ रोजी मौजे गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथे वैद्यकीय उपचारादम्यान मयत झालेले आहे. तसेच अर्जदार क्र.१ व २ यांची आई नामे मंदाबाई रामराव आगळे या देखील दिनांक २१/११/२०२५ रोजी मयत झालेल्या आहे. मयत रामराव दादा आगळे व मयत मंदाबाई रामराव आगळे यांना अर्जदार क्र.१ व २ हेच कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतिरीक्त मयत रामराव दादा आगळे व मयत मंदाबाई रामराव आगळे यांना इतर कोणीही कायदेशीर वारसदार नसल्याचे नमुद करुन मयताचे मृत्युपश्चात शासकीय-निमशासकीय व इतर कार्यालयीन कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने मा. न्यायालयात सदरचा अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तूत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्यांचा असलेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुद्तीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक १९/०९/२०२६ रोजी दिले. प्रकरणात पुढील तारीख दिनांक २२/१०/२०२६ रोजीची आहे.

वरीष्ठ / कनिष्ठ लिपीक. सहाय्यक अधिक्षक,

दिवाणी न्यायालय गंगापुर

## अग्रलेख

# सेमीकंडक्टर युगातील क्रांतिकारी पाऊल

कोणे एके काळी संगणकाकडे संशयाने पाहण्याच्या मानसिकतेचा अनुभव भारताने घेतला. पुढे काळाने कूस पालटली आणि भारताच्या विकासाचे चक्र त्याच संगणकाने गतिमान केले. विमान वाहतुकीपासून घरच्या घरी काम करणाऱ्या लोकांपर्यंत साऱ्यांच्या मदतीला संगणक आला. कधी काळी आपण त्या जुन्या काळातील अगडबंब संगणकाचे इवलेसे मोबाईलमध्ये सामावलेले रूप घेऊन वावरू शकू, असे कुणालाही वाटले नव्हते. परंतु, तसे घडले. तंत्रज्ञानाच्या प्रगतीचे असेच असते. कधीकाळी भारतात मोबाईल फोन बनवणे हीच मोठी गोष्ट मानली जात होती. आज भारत त्या मोबाईलमध्ये आत असणाऱ्या सूक्ष्म चिपच्या निर्मितीच्या दिशेने निर्णायक पाऊल टाकत आहे. ही केवळ औद्योगिक प्रगती नसून, भारताच्या आर्थिक आणि तंत्रज्ञानाच्या प्रवासातील हा एक महत्त्वाचा वळणबिंदू आहे, हे आपण लक्षात घेतले पाहिजे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नवी दिल्लीतील सेमीकॉन इंडियाच्या पाचव्या आवृत्तीचे उद्घाटन जागतिक कंपन्यांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत केले आणि सेमीकंडक्टर युगात भारताने क्रांतिकारक पाऊल टाकले आहे. सेमीकंडक्टर दिसत नाही. त्याचा आकार अत्यंत लहान असतो. परंतु, सारे आधुनिक जग त्याच्यावर चालते. मोबाईल, मोटारगाडी, विमान, उपग्रह, वैद्यकीय उपकरणे, संरक्षण व्यवस्था, कृत्रिम बुद्धिमत्ता, डेटा सेंटर, दूरसंचार अशा आजच्या काळातील जवळपास प्रत्येक महत्त्वाच्या तंत्रज्ञानामागे सेमीकंडक्टर असतो. त्यामुळे ज्याच्या हातात चिपचे तंत्रज्ञान आणि उत्पादनक्षमता असेल, त्याच्या हातात भविष्यातील अर्थव्यवस्थेची महत्त्वाची किल्ली असेल. भारताने या क्षेत्रात उशिरा प्रवेश केला, हे वास्तव आहे. पण उशिरा प्रवेश करणे आणि उशिरा जागे होणे यात फरक असतो. गेल्या काही वर्षांत केंद्र सरकारने सेमीकंडक्टर क्षेत्राकडे ज्या गांभीर्याने पाहिले, त्याचे हे फलित आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सेमीकंडक्टर्सच्या निर्मितीसाठी सुरू झालेल्या सेमीकॉन इंडिया प्रोग्रामची सुरुवात मोठी होती. वर्ष-दोन वर्षांत त्याचा व्याप वाढला. त्यामागील उद्देश फक्त एखादा कारखाना उभारण्यापुरता मर्यादित नव्हता. चिप डिझाईनपासून फॅब्रिकेशन, असेंब्ली, टेस्टिंग आणि पॅकेजिंगपर्यंत संपूर्ण परिसंस्था भारतात उभी करणे हा त्यामागचा विचार होता. सेमीकंडक्टर उद्योग म्हणजे फक्त एक 'फॅक्टरी' नसते. त्यामागे संशोधन, डिझाईन, अत्याधुनिक यंत्रसामग्री, विशेष रसायने, औद्योगिक वायू, कुशल मनुष्यबळ, पॅकेजिंग, लॉजिस्टिक्स, गुणवत्ता नियंत्रण आणि जागतिक पुरवठा साखळी असते. मोदी सरकारने सुरुवातीपासून या व्यापक परिसंस्थेकडे लक्ष दिले आणि त्याची फळे दिसू लागली आहेत. भारतात सेमीकंडक्टर क्षेत्रातील अनेक प्रकल्पांना मंजुरी मिळाली असून, त्यांचे विश्व सतत विस्तारत आहे. हा उद्योग एका राज्यापुरता मर्यादित न राहता देशाच्या विविध भागांत पसरत आहे.

नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र सरकारने सेमीकंडक्टर्सचे महत्त्व आधीच ओळखले होते. हे ओळखून भारताने पावले उचलली. भारताला संरक्षण उपकरणे, दूरसंचार, अवकाश संशोधन, इलेक्ट्रिक वाहने, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डिजिटल अर्थव्यवस्था यासाठी मोठ्या प्रमाणावर चिप्स लागणार आहेत. अशा परिस्थितीत संपूर्ण अवलंबित्व धोकादायक ठरू शकते, हे तेव्हाच भारत सरकारच्या लक्षात आले होते. अनेक देशांनी अनेक दशकांचा काळ सेमीकंडक्टर्सच्या विकासासाठी दिला. त्या तुलनेत भारताचा प्रवेश उशिरा झाला हे खरे. परंतु, तरीही आपला देश मागे राहता कामा नये, ही भावना ठेवून जागतिक कंपन्यांशी भागीदारी करण्यासह जागतिक कंपन्यांचे तंत्रज्ञान, भारतीय भांडवल, भारतीय मनुष्यबळ आणि सरकारी प्रोत्साहन यांची सांगड घालण्याचा प्रयत्न केंद्र सरकारने केला.

सेमीकंडक्टरला मराठीत अर्धसंवाहक म्हणतात. अर्धसंवाहक म्हणजे असा पदार्थ, जो विशिष्ट घटकांवर किंवा परिस्थितीवर अवलंबून राहून वाहक (कंडक्टर) किंवा विसंवाहक (इन्शुलेटर) म्हणून कार्य करू शकतो. याच गुणधर्मामुळे तो संगणक आणि इतर आधुनिक इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा पाया मानला जातो. ज्या पदार्थातून वीज सहज वाहू शकते, ते पदार्थ म्हणजे वाहक. तांबे, ॲल्युमिनियम ही त्याची उदाहरणे. याउलट, विसंवाहक ज्या पदार्थातून वीज वाहू शकत नाही, त्यांना म्हणतात विसंवाहक. लाकूड, काच ही त्याची उदाहरणे. अर्धसंवाहक किंवा सेमीकंडक्टरचे अर्धसंवाहक विद्युत वाहकतेचे गुणधर्म वाहक आणि विसंवाहक यांच्या दरम्यानचे असतात. मनगटावर लावायच्या घड्याळापासून ते अत्याधुनिक संगणक-विमाने अशी सर्व उपकरणे सेमीकंडक्टरवरच अवलंबून असतात. सेमीकंडक्टरची निर्मिती अत्यंत क्लिष्ट आणि खर्चीक असते. त्यासाठी विशेष प्रकारच्या कारखान्यांची गरज असते व उभारणीसाठी फार मोठा खर्च येतो. छोट्या आणि अत्यंत वेगाने कार्य करणाऱ्या अत्याधुनिक सेमीकंडक्टर वेफर्सचे उत्पादन अख्ख्या जगात बोटावर मोजता येतील एवढेच कारखाने आहेत. तसे कारखाने भारतात सुरू होत आहेत, हे या सेमीकंडक्टरच्या युगाचे वैशिष्ट्य. दीर्घ काळापासून भारताची इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रातील मोठी समस्या अशी होती की आपण मोठ्या प्रमाणावर उत्पादने बनवत असलो तरी त्यातील महत्त्वाचे घटक परदेशातून येत असत. गेल्या दशकात इलेक्ट्रॉनिक्स उत्पादनात मोठी वाढ झाली आहे. आता सेमीकंडक्टरचे युग अवतरते आहे. त्याद्वारे मोबाईल तयार करणाऱ्या देशापासून मोबाईलमधील महत्त्वाचा घटक तयार करणाऱ्या देशाकडे जाणे म्हणजे मूल्यसाखळीत वर जाण्याचे मार्ग प्रशस्त होतील. मूल्यसाखळीत वर जाणे म्हणजे अधिक कौशल्य, अधिक संशोधन, अधिक उत्पादकता आणि अधिक आर्थिक मूल्यनिर्मिती. सेमीकंडक्टर क्षेत्रात भारताची मोठी ताकद आहे भारतीयांची बुद्धिमत्ता. भारतातील अभियंते जगातील तंत्रज्ञान कंपन्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर कार्यरत आहेत. आतापर्यंत या बुद्धिमत्तेचा मोठा भाग भारताबाहेर निर्माण होणाऱ्या उत्पादनांसाठी वापरला जात होता. आता देशातच चिप डिझाईन, प्रोटोटाईपिंग आणि उत्पादनासाठी संधी निर्माण होत आहेत. सेमीकंडक्टर निर्मितीत भारताचा प्रवेश हा 'मेक इन इंडिया'चा पुढचा अध्याय आहे. पहिला अध्याय होता भारतात उत्पादन करण्याचे आवाहन करण्याचा. पुढचा अध्याय आहे तो भारतात तंत्रज्ञान निर्माण करण्यासाठी झटण्याचा. त्यापुढचा अध्याय असेल जगासाठी तंत्रज्ञान तयार करण्याचा. मोदी सरकारने या दिशेने देखील सुरुवात केली आहे. सेमीकंडक्टर क्षेत्रात तैवान, दक्षिण कोरिया, अमेरिका, जपान आणि चीनसारख्या देशांनी दशकानुदशके गुंतवणूक केली. संशोधन केले. भारताला त्या साऱ्यांच्या स्पर्धेत टिकण्यासाठी सरकारी अनुदानासह सातत्यपूर्ण संशोधन, विद्यापीठे आणि उद्योग यांच्यातील संबंध, कुशल मनुष्यबळ, जलद पायाभूत सुविधा, विश्वसनीय वीज-पाणीपुरवठा आणि जागतिक दर्जाची उत्पादन यंत्रणा आवश्यक आहे. सरकारने संधींचे दार उघडून दिलेले आहे. आता उद्योग, विद्यापीठे, संशोधन संस्था आणि भारतीय प्रतिभेला त्यातून प्रवेश करून भारताचे भविष्य घडवावे लागेल. समजून घ्यायला हवे ते हे की, ही प्रक्रिया संक्रमणाची आहे. उपभोक्ता ते उत्पादक बनण्याच्या दिशेने होणारे हे संक्रमण आहे. सुटे भाग जोडणारा देश ते त्या भागांची निर्मिती क्षमता प्राप्त केलेला देश बनण्याच्या दृष्टीने सुरू झालेली ही वाटचाल आहे. आणि तंत्रज्ञान वापरणाऱ्या देशापासून तंत्रज्ञान विकसित करणारा देश म्हणून साऱ्या देशात मान मिळविण्याचा हा मुद्दा आहे. काही प्रसंग शांततेने घडतात, पण ते देशाच्या इतिहासाला निर्णायक वळण देत असतात. सेमीकंडक्टर मिशनच्या प्रवासाचा हा टप्पा तसाच आहे. त्यात भारताचे भविष्य दडलेले आहे. ■


## यंगिस्तान

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

# हनुमान अंश आणि नास्तिकवाद!

'हनुमान अंश' या चित्रपटाने आता जागतिक स्तरावर ३०० कोटींचा टप्पा पार केला आहे. याआधी प्रवीण तरडे यांच्या 'देऊळ बंद २' चित्रपटाने १०० कोटींची मजल गाठली होती. अलिकडच्या आध्यात्मिक चित्रपटांच्या चमत्कारिक प्रतिसादाची सुरुवात कदाचित 'लालो - कृष्ण सदा सहायते' या गुजराती चित्रपटाने केली असावी. ५० लाखांत तयार झालेल्या या चित्रपटाने सुमारे १२० कोटी रुपये कमावले. हनुमान अंश हा देखील सुमारे २ कोटींत तयार झालेला चित्रपट आहे. हा चित्रपट मी दोनदा पाहिला. या चित्रपटाचं वैशिष्ट्य असं की, कमी बजेटमध्ये सुंदर लेखन, अभिनय, दिग्दर्शन, सिनेमाटोग्राफी आणि संगीत सगळं काही उत्तम दर्जाचं असू शकतं. दुसरी गोष्ट भारतात विशेषतः हिंदी-मराठी चित्रपटांमध्ये खूप कमी बायोपिक असे आहेत, जे चांगले आहेत. म्हणजे बायोपिक बनवताना किती दाखवू नि किती नको अशी अवस्था चित्रपटकर्त्यांची होत असते आणि या इतक्या सगळ्या डेटाच्या नादी लागल्याने स्टोरी टेलिंग गंडते. पण हनुमान अंश हा बायोपिक म्हणूनही उत्तम आहे. यातलं संगीत उत्कृष्ट आहे. भजन तल्लीन करणारे आहेत. कलाकारांनी प्राण ओतून काम केलं असल्यामुळे अनेक प्रसंगांत तुमच्या डोळ्यांत पाणी तरळतं. तिसरी गोष्ट हा आध्यात्मिक आणि चमत्कारावर आधारित चित्रपट आहे. या चित्रपटात नीम करौरी बाबांनी केलेले चमत्कारही दाखवण्यात आले आहेत. नीम करौरी बाबांचा जन्म साधारण १९०० मधला आणि त्यांनी १९७३ ला देह त्यागला. म्हणजे हे चमत्कार अलिकडील आहेत.

सध्या पुण्यातल्या विद्यानंद बापटांमुळे नास्तिकवादाची पुन्हा एकदा चर्चा झालेली आहे. विद्यानंद बापट हे डीजे विरुद्ध बोलत असताना अवांतर बोलतात. त्यांचा उत्सव आणि पंढरपूरच्या वारीला देखील विरोध आहे. ते उत्सव आणि सणाची तुलना लष्कर-ए-तोयबासोबत करतात. लष्कर-ए-सण अशाप्रकारचं भाष्य त्यांनी केलं होतं. तसे ते खूप बडबडतात. कदाचित अनेक वर्षे त्यांचं कुणी ऐकून घेतलं नसावं त्यामुळे सवंग प्रसिद्धी लाभल्याने ते स्वतःला मोठे समाजसेवक वगैरे समजू लागले आहेत. असो. पण बापटांमुळे नास्तिकवादाचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेला आला आहे. ख्रिस्ती आणि इस्लाम अशा पंथांमध्ये नास्तिक असणं हे महापाप असतं. पण हिंदू धर्मात विविध उपासना पद्धती आणि विचार स्वातंत्र्य असल्याने आपल्याकडे 'हिंदू-नास्तिक' अशी संकल्पना आहे. 'ख्रिस्ती नास्तिक' असं बोललं तरी आपल्याला गंडल्यासारखं वाटतं. पण तुम्ही 'हिंदू-नास्तिक' म्हणू शकता. नास्तिकवादाची चर्चा झाली की पुरोगाम्यांना आणि हिंदुत्ववाद्यांना आठवतात ते सावरकर. बापटांमुळे देखील अनेकांना सावरकर आठवले आहेत. माझ्या मते तुम्ही नास्तिक (इथे देव मानत नाही, एवढाच अर्थ घेतलेला आहे) असणे किंवा आस्तिक असणे हा तुमचा वैयक्तिक मुद्दा आहे. सावरकर नास्तिक की आस्तिक हा मुद्दा गौण आहे. बापटांप्रमाणे किंवा इतर नास्तिकांप्रमाणे तुम्ही तुमचं बघून घ्या, आम्हाला त्रास देऊ नका अशी सावरकरांची नीती नव्हती. अनेक सुधारक आणि सावरकरांमध्ये हाच फरक होता की सावरकर सुधारणावादी असूनही हिंदुत्ववादी होते. उलट पुढे अनेक सुधारणावाद्यांना सावरकरांचं हिंदुत्व पटलेलं होतं. महत्त्वाची गोष्ट म्हणजे 'देवाला रिटायर करा' असली बडबड त्यांनी कधीच केली नव्हती. अस्पृश्यांना मंदिरात प्रवेश देण्यासाठी सावरकर धडपडले आहेत. सत्यनारायण बंद करा असेही सावरकर म्हणाले नाहीत, उलट सत्यनारायणाच्या पोथीत देशभक्तीचा आणखी एक अध्याय जोडा असं म्हणालेत. आज नास्तिकांना ज्या ढोल ताशा किंवा बॅण्डचा त्रास होतो. तो बॅण्डचा धंदा सावरकरांनी हिंदूंना सुरू करून दिलाय. सावरकरांनी सर्व हिंदूना मौंजीबंधनाचा अधिकार हवा म्हणून पुढाकार घेतला आहे. स्वतः मुंज लावली आणि धार्मिक पद्धतीने लग्नेही लावून दिलेली आहेत. हिंदूंच्या एकजुटीसाठी सावरकरांनी स्वतः ईश्वराची भजनं गायिली आहेत. त्याकाळी आज वाटणाऱ्या सामान्य बाबी भयंकर कठीण होत्या. म्हणूनच सावरकरांची भाषा काही ठिकाणी कठोर वाटत असली तरी ती त्या काळची गरज होती. आज सावरकर असते तर कदाचित अशा प्रकारची टीका केली नसती. मशिदी समोरून मिरवणूक गेली की दंगल उसळायची, तेव्हा सावरकरांनी स्वतः पुढाकार घेतला आहे. हिंदूंना प्रतिकार करायला सांगितला आहे. अंदमानात मुसलमान मुद्दामून जोरजोरात बांग देत तर सावरकरांनी तुमची बांग तर आमचा शंख असं म्हणत भजन करायला सुरुवात केली.




नास्तिक असणं म्हणजे आपण कोण बुद्धिवादी वगैरे आहोत अशा थाटात नास्तिकांनी वावरू नये. नास्तिक असणाऱ्या कम्युनिस्टांनी जगात हैदोस माजवला होता. आजही संधी मिळेल तेव्हा माजवतच असतात. आपले अनेक वैज्ञानिक, प्रसिद्ध डॉक्टर हे आस्तिक आहेत. तुम्ही नास्तिक आहात म्हणजे आस्तिकांच्या श्रद्धांवर टीका करू शकता आणि वर आपल्या सडक्या तोंडाने सावरकरांचे नाव घेऊ शकता असे समजू नका. स्वतःची तुलना सावरकरांसोबत करणं टाळा. आधी तेवढा अधिकार प्राप्त करा. साधं आणि सोपं उदाहरण म्हणजे बाळासाहेबांची ठाकरी भाषा आपण स्वीकारली. पण तशीच भाषा वापरणाऱ्या त्यांच्या वंशजांना जनतेने घरी बसवलं. थोडक्यात अधिकार प्राप्त करावा लागतो. तुमचा चमत्कार, अध्यात्म, धार्मिकता यावर विश्वास नसेल तर तो तुमचा वैयक्तिक विषय आहे. पण जर खिल्ली उडवणार असाल, तर तुमच्या नास्तिक-पंचीचे कपडे आम्हाला फाडावेच लागतील.

भारतीय प्रेक्षक अशा खुळ्यांच्या कानाखाली जाळ काढतंच असतात. हनुमान अंश, देऊळ बंद, लालो असे चित्रपट यशस्वी होणे म्हणजे जड-बुद्धिवाद्यांच्या कानाखाली सणसणीत चपराकच आहे. मात्र तरी देखील हिंदूंनी एक गोष्ट लक्षात ठेवावी की केवळ धार्मिक असून चालणार नाही. धार्मिक तर मिर्जा राजे जयसिंहही होते. पण औरंगजेबासाठी नोकरी करत होते. आपल्यासमोर धार्मिक हिंदू म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श आहे. एवढे लक्षात ठेवावे. ■

writerjayeshmestry@gmail.com

## मुंबई वार्तापत्र

**नागेश दाचेवार**

# हतबल नेत्याची राजकीय नौटंकी!

राज्यात ऐन पावसाळ्यात दुष्काळाचे सावट गडद होत असताना, बळीराजा हवालदिल झाला आहे. हातात आलेले पीक करपून गेले आहे आणि शेतकरी डोळ्यांत पाणी आणून आभाळाकडे डोळे लावून बसला आहे. अशा अत्यंत संवेदनशील आणि गंभीर परिस्थितीत राजकारणातील तथाकथित 'भीष्मपितामह' शरद पवार यांना अचानक शेतकऱ्यांचा पुळका आला आहे. निकषांची वाट न पाहता राज्यात तत्काळ दुष्काळ जाहीर करा, असे उपदेशामृत पाजणारे पत्र त्यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लिहिले आहे. पण हे पत्र म्हणजे शेतकऱ्यांप्रति असलेले खरे प्रेम नसून, सत्ता गेल्यानंतर अस्वस्थ झालेल्या एका हतबल नेत्याची शुद्ध राजकीय नौटंकी आहे.

शरद पवारांनी आजवर चालवलेल्या सत्तेच्या राजकारणाचा बुरखा आता पूर्णपणे फाटला आहे. ज्या शरद पवारांनी महाराष्ट्रावर तब्बल १५ वर्षे एकाधिकारशाहीने सत्ता गाजवली, जे शरद पवार केंद्रात १० वर्षे देशाचे कृषिमंत्री म्हणून बसले होते, ज्या पवारांच्या आशीर्वादाने राज्यात महाविकास आघाडीचे सरकार स्थापन झाले होते आणि ज्यांनी स्वतः उद्धव ठाकरेंना मुख्यमंत्र्यांच्या खुर्चीवर बसवले, त्यांना स्वतःच्या प्रदीर्घ कार्यकाळात शेतकऱ्यांसाठी ठोस काही करावेसे का वाटले नाही? जेव्हा हातामध्ये सत्तेची संपूर्ण सूत्रे होती, निर्णय घेण्याचे अधिकार होते आणि तिजोरीच्या चाव्या होत्या, तेव्हा पवारांना या देशातील अन् राज्यातील शेतकऱ्यांचा हा कळवळा का आला नाही? आज सत्ता हातातून गेल्यानंतर अचानक मुख्यमंत्र्यांना सल्ले देण्याचे शहाणपण सुचले आहे, हा केवळ बेगडीपणाचा कळस आहे.

महाराष्ट्रात काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे सरकार सलग १५ वर्षे सत्तेत होते. या १५ वर्षांच्या काळात राज्याचा आणि विशेषतः ग्रामीण महाराष्ट्राचा कारभार थेट शरद पवार आणि त्यांच्या राष्ट्रवादी पक्षाच्या हाती होता. जलसंपदा, कृषी, सहकार यांसारखी महत्त्वाची आणि थेट शेतकऱ्यांशी निगडित असणारी सर्व मंत्रालये पवारांच्या पक्षाकडेच होती. परंतु याच १५ वर्षांच्या काळात महाराष्ट्रात सर्वाधिक शेतकरी आत्महत्या झाल्या, हा इतिहास पुसता येईल का? हजारो कोटी रुपये सिंचनावर खर्च दाखवले गेले, पण प्रत्यक्ष शेतात पाणी पोहोचलेच नाही. सिंचन घोटाळ्याच्या चिखलात शेतकऱ्यांचे भविष्य बुडवले गेले. केंद्रात १० वर्षे कृषिमंत्री असताना पवारांना देशातील आणि राज्यातील शेतकऱ्यांचे प्रश्न कायमस्वरूपी सोडवता आले नाहीत आणि स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशी धूळ खात पडून राहिल्या. सत्तेत असताना ज्यांना शेतकऱ्यांना कर्जबाजारीपणातून बाहेर काढता आले नाही, ते आज सत्ता गेल्यावर 'कैवारी' असल्याचा आव आणत आहेत.

२०१९ मध्ये ज्या पद्धतीचे राजकीय नाट्य घडले आणि महाविकास आघाडीचे सरकार स्थापन झाले, त्याचे मुख्य सूत्रधार शरद पवारच होते. उद्धव ठाकरे यांना मुख्यमंत्रिपदाच्या खुर्चीवर बसवून त्यांनी सत्तेची गणिते जुळवली. उद्धव ठाकरे मुख्यमंत्रिपदावर बसण्यापूर्वी शेतकऱ्यांना सात-बारा कोरा करण्याची आणि संपूर्ण कर्जमुक्तीची मोठी मोठी आश्वासने देत होते. स्वतः पवारांनी या सरकारचे मार्गदर्शक म्हणून काम पाहिले. पण प्रत्यक्ष घडले काय? अडीच वर्षे उद्धव ठाकरेंनी मुख्यमंत्र्याची खुर्ची नुसतीच उबवली, मात्र राज्यातील शेतकऱ्यांना कर्जाच्या दलदलीतून बाहेर काढण्यासाठी कोणतेही ठोस पाऊल उचलले नाही. नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर अनुदान तेवढे जाहीर केले. ते देण्याचे औदार्य देखील दाखवले नाही. ठाकरेंनी केलेली घोषणा देखील राज्यात महायुतीचे सरकार आल्यानंतर महायुतीच्या सरकारने पूर्ण केली. अतिवृष्टी आणि अवकाळी पावसाने जेव्हा बळीराजा उद्ध्वस्त झाला, तेव्हा मविआ सरकारने एनडीआरएफच्या निकषांचेच बोट दाखवत मदतीचे हात आखडते घेतले होते. मग आज जेव्हा तेच पवार निकषांची वाट न पाहता दुष्काळ जाहीर करण्याचा सल्ला देतात, तेव्हा त्यांच्या या सल्ल्यामागील दुटप्पीपणा उघडा पडतो. अडीच वर्षे स्वतःचे सरकार असताना हेच 'उदारपण' कुठे गेले होते?

दुष्काळ किंवा आपत्ती जाहीर करण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारच्या विशिष्ट नियमावली असतात. राष्ट्रीय आपत्ती निवारण दल (एनडीआरएफ) आणि राज्य आपत्ती निवारण दल (एसडीआरएफ) यांच्या मार्गदर्शक तत्त्वानुसारच कोणतीही शासकीय मदत किंवा दुष्काळसदृश परिस्थिती अधिकृतपणे घोषित केली जाते. उपग्रह छायाचित्रे, पावसाची टक्केवारी, भूगर्भातील पाण्याची पातळी आणि पिकांचे झालेले प्रत्यक्ष नुकसान या शास्त्रीय निकषांच्या आधारेच दुष्काळ घोषित करावा लागतो. जे नेते देशाचे केंद्रीय कृषिमंत्री राहिले आहेत, ज्यांनी राज्याचे मुख्यमंत्री म्हणून काम पाहिले आहे, त्यांना हे कायदेशीर आणि प्रशासकीय निकष माहिती नाहीत, असे म्हणणे म्हणजे पवारांसारख्या ज्येष्ठ नेत्याच्या ज्ञानाची चेष्टा करण्यासारखे आहे. जर त्यांना हे निकष माहीत असूनही ते निकष बाजूला ठेवा असे सांगत असतील, तर हा निव्वळ राजकीय खोडसाळपणा आहे. आणि जर खरोखरच त्यांना हे माहीत नसेल, तर असा अज्ञानी नेता महाराष्ट्राला इतकी वर्षे लाभला होता, हे या राज्याचे दुर्दैवच म्हणावे लागेल. आज जेव्हा शेतकरी निसर्गाच्या लहरीपणामुळे हवालदिल झाला आहे, त्याच्या डोळ्यांत अश्रू आहेत, अशा वेळी त्याच्या परिस्थितीचे राजकीय भांडवल करणे हा अत्यंत नीच राजकीय प्रवृत्तीचा प्रकार आहे. मुख्यमंत्र्यांना पत्र लिहून ते तातडीने प्रसारमाध्यमांमध्ये प्रसिद्ध करायचे आणि आपणच कसे शेतकऱ्यांचे तारणहार आहोत, असा आभास निर्माण करायचा, हा पवारांचा जुनाच राजकीय पॅटर्न आहे. सत्ता हातातून गेल्यामुळे आणि पक्षातील फुटीमुळे राजकीय अस्तित्व धोक्यात आल्यावर पुन्हा एकदा शेतकऱ्यांच्या खांद्यावर बंदूक ठेवून गोळीबार करण्याचा हा लाचार प्रयत्न आहे.

महाराष्ट्रातील शेतकरी आता भोळा राहिलेला नाही. त्याला मावळ येथे शरद पवारांच्या गृहमंत्र्याने शेतकऱ्यांवर केलेल्या गोळीबारांची आठवण आहे. तो अजून ती जखम विसरलेला नाही. त्यावेळी मृत्यू झालेल्या शेतकऱ्यांच्या घरावर काय बेतली, हे अजून शेतकऱ्यांच्या विस्मरणात गेलेले नाही. शेतकऱ्यांवरच गोळीबार करून, पुन्हा त्यांच्यावरच शेकडो गुन्हे दाखल करून, वर्षोनवर्षे छळ केला, हा सगळा तुम्ही केलेला प्रताप पवार साहेब अद्याप या महाराष्ट्रातला शेतकरी विसरलेला नाही. तुम्ही सत्तेत असताना केलेली उपेक्षा आणि सत्ता गेल्यावर दाखवलेला बेगडी पुळका यातील फरक स्पष्टपणे शेतकऱ्याला समजतो.

१५ वर्षे राज्यात आणि १० वर्षे केंद्रात सत्ता उपभोगूनही ज्यांना शेतकऱ्यांना सुजलाम-सुफलाम करता आले नाही, ज्यांना शेतकरी आत्महत्या रोखता आल्या नाहीत, त्यांनी आता सध्याच्या सरकारला सल्ले देण्याची नैतिक पात्रता गमावली आहे. शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे, त्यांना नियमाच्या चौकटीत बसवून जास्तीत जास्त मदत देणे हे सरकारचे कर्तव्य आहेच आणि सरकार ते करेलही. परंतु, पवारांनी शेतकऱ्यांच्या दुःखावर आपल्या राजकारणाची पोळी भाजणे आता थांबवले पाहिजे. सत्तेच्या लाचारीसाठी शेतकऱ्याचा वापर करणाऱ्या आणि बेगडी प्रेमाचा आव आणणाऱ्या शरद पवारांचा खरा चेहरा आता महाराष्ट्राच्या जनतेसमोर पूर्णपणे उघडा पडला आहे. ■

९२७०३३३८८६

## वेध

**विजय कुळकर्णी**

# हा तर नागरिकांच्या जिवाशी खेळ!


दूध आणि त्यापासून तयार करण्यात येणारे दही, ताक, लोणी, तूप इत्यादी पदार्थ नाशवंत असल्याचे सर्वांना माहीत आहे. तरीही, थोडेसे पैसे कमविण्यासाठी सणासुदीच्या दिवसात दुकानदारांकडून मुदतबाह्य तुपाचा साठा केल्याचे अकोला एफडीएच्या कारवाईत उघड झाले आहे. यावरून नफेखोरीसाठी नागरिकांच्या जिवाशी खेळत असल्याचे दिसून आहे. तुपासारख्या पदार्थाचीही साठेबाजी करणे ही तर हद्दच झाली. दूध, दही, ताक, लोणी, तूप इत्यादी पदार्थ आपल्या रोजच्या आहारातील महत्त्वाचा घटक आहे. सकस आहार आपल्या भोजनात असला पाहिजे, असे सांगितले जाते. पण, सकस आहार म्हणून अशाप्रकारे मुदतबाह्य अन्न घटक आपल्या आहारात असतील तर, आपली प्रकृती सुधारण्याऐवजी बिघडणारच. अकोल्यातील कारवाईत एफडीएने दोन ठिकाणांहून थोडेथोडके नव्हे तर, तब्बल ५९३ किलो मुदतबाह्य तूप जप्त केले. याची किंमत ४ लाख १५ हजार रुपये आहे. विचार करा की हे तूप ज्या कोण्या नागरिकांच्या जेवणात चमचाभर देखील आले असते आणि त्यामुळे त्यांना विषबाधा झाली असती तर, किती हाहाकार झाला असता. बरं, ही कारवाई होण्यापूर्वी किती लोकांनी ते खरेदी करून घरी नेले आणि त्यापासून पदार्थ तयार करण्यासाठी किंवा रोजच्या जेवणात वापरले असेल तर, त्यांचे काय होईल, असा प्रश्न साहजिकच उपस्थित होतो.

जेव्हापासून अन्न व औषध विभागाच्या आयुक्तपदी तुकाराम मुंढे यांची नियुक्ती झाली तेव्हापासून त्यांनी राज्यात भेसळखोरांविरुद्ध कारवाईचा धडाका सुरू केला आहे. त्याचाच एक भाग म्हणून ही कारवाई करण्यात आली. या कारवाईत अकोला एमआयडीसी परिसरातून सोयाबिन तेलाचा साठा देखील जप्त करण्यात आला आहे. दररोज राज्यभरात कारवाईचा धडाका सुरू असताना अकोल्यातील व्यापारी किंवा दुकानदारांनी त्यापासून कोणताही धडा घेतला नसल्याचेच दिसून येते. दुसरे असे की, हे दुकानदार चिल्लर विक्री करणारे आहेत की, घाऊक व्यापारी आहेत, हे पाहणे देखील क्रमप्राप्त ठरते. कारण, चिल्लर विक्रेते असतील तर, यांच्याकडील तूप थेट ग्राहकांनी खरेदी केले असेल आणि घाऊक व्यापारी असतील तर, त्यांच्याकडून शहर, तालुका, जिल्हाच नव्हे तर, जिल्ह्याबाहेरील दुकानदारांनी माल घेऊन त्यांच्या गावातील ग्राहकांना विकला किंवा विकणार असतील. तेव्हा ग्राहकांनी सणासुदीच्या दिवसांत अशाप्रकारे खाद्यपदार्थ तयार करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या तेल, तूप इत्यादी पदार्थांची खात्री करून घेणे आवश्यक आहे. त्या पदार्थाच्या पाकीट किंवा डब्यावरील लेबलवर असलेली त्याची मुदत तपासून घेतली पाहिजे. आजपर्यंत तांदळात प्लॅस्टिकचे तांदूळ, डाळीत खडे, युरियापासून दूध तयार करण्याचे प्रकार उघडकीस आले आहेत. सणासुदीच्या दिवसात खव्याची मोठी मागणी असते. त्यामुळे विक्रेत्यांकडून खव्यात देखील भेसळ केली जाते, हे आपल्याला माहीत होते. पण, आता सणासुदीच्या दिवसात नफा कमविण्यासाठी तुपाचा देखील साठा केला जात आहे, ही अत्यंत गंभीर बाब आहे. त्याचा लहान मुलांच्या आरोग्यावर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. आपल्या बालकांना माता सकस आहार म्हणून तूप, मीठ, भात एकत्र करून एक घास काऊचा, एक घास चिऊचा, असे म्हणून कौतुकाने भरवितात. पण, त्या मातांना काय माहीत की, ते तूप आपल्या चिमुकल्याला भरविण्यायोग्य आहे की नाही. शाळेच्या परिसरात बंदी असूनही जंक फूड सर्रास विकले जात आहे. विद्यार्थ्यांना सकस आणि पोषणयुक्त आहार मिळावा म्हणून सेव्ह फूड फॉर एव्हरी चाईल्ड इन महाराष्ट्र, ही मोहीम राबविण्याचे आदेश अन्न व औषध प्रशासनाने दिले आहेत. त्यानुसार शाळेच्या ५० मीरटच्या आत जंक फूड विकण्यास बंदी आहे. याबाबत राज्यातील मुख्याध्यापकांची कार्यशाळा देखील घेण्यात आली. तरीही, शाळांच्या परिसरात जंक फूडची विक्री सुरूच असल्याचे दिसून येते. यावरून कायद्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यासाठी कठोर कारवाईच विक्रेत्यांना वठणीवर आणू शकते, असेच म्हणावे लागेल. पौष्टिक पदार्थ म्हणून तूप हा पारंपरिक पदार्थ आपल्या रोजच्या भोजनात आपण वापरतो. पण, आता अशाप्रकारे सर्व नियम धाब्यावर बसवून या पदार्थाची देखील विक्री होत असेल तर, याला काय म्हणावे. तेव्हा, नागरिकांनी सजग राहून बाजारात मिळणारे खाद्यपदार्थ व्यवस्थित तपासूनच खरेदी करा. अमुक कंपनीचा माल चांगला किंवा एखाद्या दुकानातील माल चांगला असतो, असा अंधविश्वास न ठेवता खाद्यपदार्थ खरेदी करा. सणासुदीत सकस आहार घ्या आणि आनंदात सण साजरे करा. ■

८८०६००६१४९

### डिजिटल क्रांतीला खीळ लावणारे यूपीआयवरील शुल्क!

देवाणघेवाणीच्या व्यवहारांमध्ये जुना काळ ते आतापर्यंतचा प्रवास बघितला तर अभूतपूर्व क्रांती झालेली आहे. जुन्या काळी वस्तूंच्या बदल्यात वस्तू देऊन घेऊन व्यवहार व्हायचा आणि आता कॅश कमी आणि क्यूआर कोडचा जास्त वापर होऊन लोक व्यवहार करायला लागले. जवळपास जगाचा पन्नास टक्के व्यवहार भारतातील लोक यूपीआयच्या माध्यमातून करतात. अशा प्रगतिपथावर असणाऱ्या भारताला निःशुल्क असलेले हे डिजिटल पेमेंटची सवय झाल्यानंतर त्यावर शुल्क लावून पुन्हा एकदा कॅश वापरण्याच्या मार्गावर जनतेला सरकारला न्यायचे आहे का? आधीच कामगार वर्ग इन्कम टॅक्स, जीएसटी, घर टॅक्स, टोल टॅक्स इत्यादी कितीतरी प्रकारचे टॅक्स देतो. त्यानंतरही पुन्हा निःशुल्क सेवेवर टॅक्स लावणे कितपत योग्य ठरेल? एकीकडे सरकार डिजिटल क्रांतीला प्रोत्साहन देते आणि दुसरीकडे आपल्याच या योजनांना खीळ लावते! इथे सामान्य जनतेवर टॅक्स लागणार नाही असं जरी म्हटलं तरी व्यापारी वर्ग ही सामान्य जनताच आहे. तो टॅक्स देणार आणि कुठेतरी सामान्य जनतेकडून ते वसूल करणार याचा सरकारने विचार करावा. शुल्क लावायचे असले तरी त्याची टक्केवारी कमी असावी. शिवाय जीवनावश्यक, दररोजच्या वापरातील वस्तू, शेतीविषयक व्यवहार, वैद्यकीय उपचाराचे व्यवहार, औषधी इत्यादी महत्त्वाच्या वस्तूंचे व्यवहार यातून वगळण्यात यावे. महागड्या चैनीच्या वस्तूंचे व्यवहार यावर टॅक्स लावू शकतो. एकीकडे सरकार लाडकी बहीणसारख्या योजना राबवून लोकांना पैसे वाटते आणि दुसरीकडे कर देणाऱ्या लोकांवर आणखी कर लादते. तेव्हा या यूपीआयवरील कराचा नक्कीच पुन्हा विचार व्हावा आणि जनतेला दिलासा देणारा निर्णय सरकारकडून व्हावा हीच अपेक्षा.




**डॉ. भारती अनिल हेडाऊ**/यवतमाळ

## वाचक पत्रे

### पालकांची भूमिका आणि संस्कारांचा अभाव

आज शिक्षणाचे बाजारीकरण होण्यामागे जेवढ्या खाजगी शाळा जबाबदार आहेत, तेवढीच पालकांची बदललेली जीवनशैली आणि विचारसरणीही जबाबदार आहे. हल्ली आई-वडील दोघेही नोकरी करत असल्यामुळे मुलांकडे लक्ष द्यायला वेळच मिळत नाही. मुलाचा अभ्यासक्रम काय आहे, त्याला काय येतं, काय येत नाही हेच त्यांना माहीत नसते. एकदा शिकवणी लावली की आपली जबाबदारी संपली असे पालकांना वाटते. मुलाला कमी गुण मिळाले तर स्वतःचे आत्मपरीक्षण न करता दोष थेट शिकवणीला, शाळेतल्या शिक्षकांना किंवा मुलाला दिला जातो.

सामाजिक प्रतिष्ठेच्या नावाखाली अनेक पालक मुलांना न झेपणाऱ्या इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये घालतात. बरेचदा नववी-दहावीतील मुलांनाही साधे इंग्रजी वाचता येत नाही, मराठी तर दूरच. तरीही दहा ठिकाणी क्लासेस लावले जातात, पण स्वतः एक तास अभ्यासाला बसवण्याचा कंटाळा केला जातो. परंतु आजची सगळ्यात गंभीर आणि चिंताजनक बाब म्हणजे शिक्षकांबद्दलचा आदर संपत चालला आहे. पूर्वी शिक्षकांनी मुलाला रागावले तरी घरी सांगायची भीती वाटायची आणि पालकही म्हणायचे की, ''माझ्या मुलानेच काहीतरी चुकलं असेल म्हणून गुरुजी रागावले असतील.'' पण आज परिस्थिती उलटी आहे. शाळेत शिक्षकांनी मुलाला साधं रागावलं, तरी त्याचं काय चुकलं असेल याचा विचार न करता पालक थेट शिक्षकांना फोन करून, शाळेत जाऊन नको त्या भाषेत त्यांचा अपमान करतात. ज्या ठिकाणी शिक्षकांचाच आदर आणि सन्मान राहिला नाही, तिथे मुले ज्ञान कसे घेणार? जे पालक स्वतःच शिक्षकांचा आदर करत नाहीत, ते आपल्या मुलांना आदराचे, नम्रतेचे संस्कार काय शिकवणार?

यावरून मुलांवर संस्कारांचा अभाव हेच लक्षात येते. पूर्वी सकाळ-संध्याकाळ देवाजवळ दिवा लावणे, स्तोत्र म्हणणे हे सर्व घरातच शिकवले जायचे. मोठ्यांचा, शिक्षकांचा आदर कसा करायचा, चांगल्या- वाईटाची जाणीव हे संस्कार घरातच होत असे. पण आता आई-वडिलांना वेळच नाही. आणि मुले घरी आल्यावर टीव्हीसमोर बसतात, काही मोबाईल घेऊन बसतात. पालकांचा शनिवार-रविवार घरची कामे आणि बाहेर फिरण्यातच जातो. आता तर दोन श्लोक शिकवण्यासाठी सुद्धा पैसे देऊन क्लास लावावा लागतो ही मोठी शोकांतिका आहे. म्हणून कितीही महागडे क्लासेस लावले तरी पालकांनी रोज थोडा वेळ मुलांसोबत बसणे, त्यांना समजून घेणे आणि सर्वात आधी शिक्षकांचा आदर करायला शिकवले पाहिजे. म्हणजेच संस्कार हेच खरे शिक्षण आहे. ■

**राधा प्रमोद पिंपळापुरे**/उमरेड

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस **tbedit2016@gmail.com** तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरित केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समूह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

## संक्षिप्त...

## भोगेश्वर विद्यालयातील कर्मचाऱ्याचा आत्मदहनाचा प्रयत्न

तभा वृत्तसेवा

वलांडी दि. १९ सप्टेंबर : तालुक्यातील दवणहिप्परगा येथील भोगेश्र्वर विद्यालयातील सेवकाचे थकीत वेतन काढण्यात येत नसल्याच्या कारणावरून सेवक मेघराज शेळके यांनी १७ सप्टेंबर रोजी आत्मदहनाचा प्रयत्न केला. मात्र, देवणी पोलिसांनी प्रसंगावधान राखत त्यांना रोखले. पोलिसांच्या मध्यस्थीने संस्थेच्या मुख्याध्यापक व सचिवांनी वेतन काढण्याचे आश्र्वासन दिल्यानंतर हा प्रकार थांबविण्यात आला.

मेघराज शेळके हे २०२२ पासून अनुकंपा तत्त्वावर भोगेश्र्वर विद्यालय, दवणहिप्परगा येथे सेवक पदावर कार्यरत आहेत. सन २०२२ ते २०२५ या कालावधीतील त्यांचे मानधन वेतन पथक, लातूर यांच्याकडून कायदेशीररीत्या काढण्यात आले. मात्र, नोव्हेंबर २०२५ पासून त्यांचे वेतन संस्था सचिव तथा मुख्याध्यापक सचिन चंद्रकांत संगमे यांच्याकडून काढण्यात आले नसल्याचा आरोप शेळके यांनी केला आहे.

वेतन मिळण्यासाठी अनेकदा अर्ज व विनंत्या करूनही प्रश्र्न सुटला नसल्याने शेलके यांच्यावर कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचा प्रश्र्न निर्माण झाला. याप्रकरणी त्यांनी शिक्षणाधिकारी, लातूर तसेच देवणी पोलिस ठाण्यात तक्रार अर्ज दिला होता. वेतन न मिळाल्यास १७ सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनी आत्मदहन करण्याचा इशाराही त्यांनी दिला होता.

पोलिसांच्या मध्यस्थीने आत्मदहनाचा प्रयत्न रोखला दिलेल्या मुदतीत वेतन न मिळाल्याने शेळके यांनी १७ सप्टेंबर रोजी आत्मदहनाचा प्रयत्न केला. यावेळी देवणी पोलिस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक पाटील व बीट अंमलदार केंद्रे यांनी हस्तक्षेप करून त्यांना आत्मदहनापासून परावृत्त केले. तसेच संस्था मुख्याध्यापक तथा सचिव यांच्याशी मध्यस्थी करून वेतन काढण्याचे आश्र्वासन दिले.

दरम्यान, दिलेल्या कालावधीत वेतन न काढल्यास पुन्हा कुटुंबासह आत्मदहन करणार असल्याचे लेखी निवेदन मेघराज शेळके यांनी देवणी पोलिस ठाणे व शिक्षणाधिकारी, लातूर यांना दिले आहे. या प्रकरणामुळे विद्यालयातील कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा प्रश्र्न ऐरणीवर आला आहे.

## उद्योजक धर्मराज चावरे यांचा सत्कार



तभा वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ दि. १९ सप्टेंबर : डिगोळ गावचे सुपुत्र तथा अहमदपूर शहरातील सुप्रसिद्ध नामवंत उद्योजक धर्मराज वैजनाथ चावरे यांना कृषी व्यावसायिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल १३ सप्टेंबर २०२६ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित शानदार सोहळ्यात 'मराठवाडा रत्न पुरस्कार २०२६' प्रदान करण्यात आला. सुप्रसिद्ध अभिनेत्री वर्षा उसगावकर यांच्या हस्ते त्यांना हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

हा पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल डिगोळ येथे धर्मराज चावरे यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांना शाल, पुष्पगुच्छ, फेटा व हार देऊन अभिनंदन करण्यात आले.

याप्रसंगी रयत क्रांती संघटनेचे मराठवाडा प्रदेशाध्यक्ष शिवाजी पेठे, बालाजी पाटील महाराज येरोळकर, पत्रकार शिवानंद भुसारे, गुंडेराव चौसष्टे, धनराज चावरे, अनंत पाटील, खंडेराव बोयणे, बसवराज चावरे, रामेश्र्वर चावरे यांच्यासह ग्रामस्थ व मान्यवर उपस्थित होते.

# औसा तालुक्यातील पिकांची पालकमंत्र्यांनी केली पाहणी



तभा वृत्तसेवा

औसा दि.१९ सप्टेंबर : लातूर जिल्ह्यात पावसाने ओढ दिल्याने खरीप हंगामातील पिकांना मोठा फटका बसला असून औसा तालुक्यातील बोरफळ व आशिव शिवारातील नुकसानग्रस्त पिकांची पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी आणि पिकांच्या नुकसानीची माहिती जाणून घेतली.व राज्य सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा असल्याचा विश्र्वास उपस्थितांना दिला.

बोरफळ येथील शेतकरी व्यंकट यादव यांच्या शेतात तसेच आशिव येथील शेतकरी अजय जगताप यांच्या शेतात जाऊन पालकमंत्री भोसले यांनी सोयाबीनसह अन्य खरीप पिकांची पाहणी केली. गेल्या दोन महिन्यांपासून पावसाने दडी मारल्यामुळे पिकांना आवश्यक पाणी मिळाले नाही.यामुळे सोयाबीन व इतर पिके जाग्यावर वाळून गेली आहेत. हातातोंडाशी आलेला खरीप हंगाम वाया गेल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे.निसर्गाच्या प्रतिकूल परिस्थितीमुळे शेतकरी अडचणीत आला असताना शासन त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. कोणत्याही परिस्थितीत शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडले जाणार नाही, अशी ग्वाही पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी यावेळी दिली.

शेतकऱ्यांच्या अडचणी प्रत्यक्ष शेतात जाऊन जाणून घेणे आणि नुकसानाची वस्तुस्थिती समजून घेणे आवश्यक असल्याचेही पालकमंत्र्यांनी सांगितले. यावेळी आमदार अभिमन्यू पवार, माजी आमदार दिनकरराव माने, जिल्हाधिकारी भारत बास्टेवाड, उपविभागीय अधिकारी अविनाश कोरडे, तहसीलदार घनश्याम अडसूळ, भाजपाचे संतोष मुक्ता, जिल्हा परिषद सदस्य सई गोरे, संगायो समितीचे अध्यक्ष सुभाष जाधव, प्रवीण कोपरकर, गिरीराज सोमाणी यांच्यासह परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गणेशोत्सवानिमित्त 'लोकसंवाद २०२६' कार्यक्रमात विविध योजनांविषयी मार्गदर्शन

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १९ सप्टेंबर : गणेशोत्सवाच्या माध्यमातून शासनाच्या विविध योजना, उपक्रम आणि धोरणात्मक निर्णयांची माहिती जनतेपर्यंत थेट पोहोचविण्यासाठी राज्य शासनाच्या माहिती व जनसंपर्क विभागामार्फत 'लोकसंवाद २०२६' हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या अंतर्गत निलंगा तालुक्यातील मसलगा येथे विविध योजनांची माहिती देण्यात आली. यावेळी मार्गदर्शन करताना जिल्हा खादी ग्रामोद्योग अधिकारी चिंतामणी गुट्टे यांनी युवक-युवतींना मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेची माहिती दिली, तसेच या योजनेतून स्वतःचा उद्योग, व्यवसाय सुरु करण्यासाठी पुढे येण्याचे आवाहन केले.

लातूर जिल्हा माहिती कार्यालयाच्या वतीने मसलगा येथील नारीशक्ती गणेश मंडळ येथे गुरुवारी आयोजित या कार्यक्रमाला या उपक्रमात कृषि विभाग, जिल्हा खादी ग्रामोद्योग विभागाच्या योजनांची माहिती देण्यात आली. मसलगा गावातील सर्व गणेश मंडळांना एकत्रित करून लोकसंवाद कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच गणेश शेळके होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा खादी ग्रामोद्योग अधिकारी चिंतामणी गुट्टे, उपकृषी अधिकारी सुनील घारोळे, प्रभारी जिल्हा माहिती अधिकारी तानाजी घोलप, पोलीस पाटील संतोष नरहरे, तंटामुक्ती अध्यक्ष संतोष तोरखडे, हरिदास साळुंके, संभाजी पाटील, राजकुमार सोनी यांची उपस्थिती होती.

ग्रामीण भागातील युवक-युवतींना स्वतःचा उद्योग, व्यवसाय सुरू करण्यासाठी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम अंतर्गत अर्थसहाय्य देत आहे. ५० लाख ते १ कोटी रुपयेपर्यंतच्या प्रकल्पासाठी १७ लाख ५० हजार पर्यंत अनुदान देण्यात येते. १ लाख ते १ कोटी पर्यंतच्या कोणत्याही प्रकल्पासाठी या योजनेचा लाभ घेता येतो, असे जिल्हा खादी ग्रामोद्योग अधिकारी चिंतामणी गुट्टे यांनी केले. यावेळी त्यांनी प्रधानमंत्री विश्र्वकर्मा योजना, मधाचे गाव या योजनांची माहिती दिली.

## पंडित सुंदरलाल समितीच्या शिफारशी लागू करा : एमआयएमची मागणी



तभा वृत्तसेवा

औसा दि.१९ सप्टेंबर : हैदराबाद संस्थान भारतात विलीन झाल्यानंतर १९४८ मध्ये झालेल्या पोलीस कारवाईदरम्यान झालेल्या कथित जीवित व मालमत्तेच्या नुकसानीची दखल घेऊन पंडित सुंदरलाल समितीच्या अहवालातील शिफारशींची अंमलबजावणी करावी, अशी मागणी एमआयएम औसा प्रमुख सय्यद मुजफ्फर अली इनामदार यांनी औसा तहसिलदार यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे.

१९४८ मधील पोलीस कारवाईच्या काळात मराठवाड्यासह हैदराबाद संस्थानातील विविध भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर जीवित व मालमत्तेचे नुकसान झाल्याचा दावा करण्यात आला आहे. अनेक कुटुंबे उद्ध्वस्त झाली, महिलांवर अत्याचार झाले, दुकाने व मालमत्ता लुटण्यात आल्या. तसेच जमिनी आणि मौल्यवान वस्तू बळकावण्यात आल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

या घटनांमुळे बाधित झालेल्या कुटुंबांचा शोध घेऊन त्यांच्या वारसांना आर्थिक नुकसानभरपाई द्यावी, तसेच दोषींनी बळकावलेल्या मालमत्तेबाबत कायद्यानुसार चौकशी करून पीडितांना मदत करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. पोलीस कारवाईदरम्यान मृत्यू झालेल्या व्यक्तींचे मृत्युप्रमाणपत्र उपलब्ध करून देण्यासाठी नगरपालिका व ग्रामपंचायतींना आवश्यक सूचना द्याव्यात, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे.

पीडित कुटुंबांना न्याय मिळणार कधी? असा सवाल या निवेदनात उपस्थित करून गेल्या १६ ते १७ वर्षांपासून मागणी करण्यात येत असल्याचा दावा एमआयएम औसाच्या वतीने करण्यात आला आहे. पंडित सुंदरलाल समितीच्या शिफारशी अहवालाचा विचार करून केंद्र सरकारने संबंधित मागण्यांवर तातडीने कार्यवाही करावी, अशी अपेक्षा निवेदनातून व्यक्त करण्यात आली आहे.

## ग्रामविकास अधिकारी किशोर सर्कलवाड यांना जिल्हास्तरीय आदर्श पुरस्कार



तभा वृत्तसेवा

अहमपूर दि. १९ सप्टेंबर : ग्रामविकासासाठी कर्तव्यनिष्ठेने कार्य करणारे रुद्धा, तालुका अहमदपूर येथे ग्रामविकास अधिकारी म्हणून कार्यरत असलेले किशोर सर्कलवाड यांना त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत जिल्हास्तरीय आदर्श ग्रामविकास अधिकारी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

हा मानाचा पुरस्कार पालकमंत्री तथा सार्वजनिक बांधकाम मंत्री मा. शिवेंद्रराजे भोसले यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या सन्मानामुळे रुद्धा गावाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला असून, संपूर्ण रुद्धा ग्रामस्थांमध्ये आनंदाचे आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

ग्रामविकास अधिकारी म्हणून कार्यरत असताना किशोर सर्कलवाड यांनी ग्रामपंचायत प्रशासन, विकासकामे, शासकीय योजनांची अंमलबजावणी आणि ग्रामस्थांशी समन्वय साधण्याच्या कार्यात दिलेले योगदान यामुळे त्यांना हा जिल्हास्तरीय सन्मान प्राप्त झाला आहे.

गावाचा विकास हा केवळ रस्ते, नाली, पाणी किंवा इमारतींपुरता मर्यादित नसून, शासनाच्या विविध योजना आणि सुविधा गावातील प्रत्येक पात्र नागरिकापर्यंत पोहोचविणे, ग्रामपंचायत प्रशासन अधिक सक्षम करणे आणि ग्रामस्थांचा विकास प्रक्रियेत सहभाग वाढविणे हेही तितकेच महत्त्वाचे असते. या सर्व बाबींमध्ये ग्रामविकास अधिकाऱ्याची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. एका अधिकाऱ्याचा सन्मान, संपूर्ण गावाचा गौरव एखाद्या गावात कार्यरत असलेल्या अधिकाऱ्याला जिल्हास्तरीय पुरस्कार मिळणे ही त्या गावासाठी निश्र्चितच अभिमानाची गोष्ट असते. हा पुरस्कार केवळ किशोर सर्कलवाड यांच्या कार्याचा गौरव नसून रुद्धा गावातील ग्रामपंचायत प्रशासन, पदाधिकारी आणि ग्रामस्थ यांच्या सहकार्याचाही सन्मान असल्याची भावना ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे.

## बाकलीच्या उपसरपंच पदी उमाकांत रावसाहेब पाटील यांची बिनविरोध निवड



तभा वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ दि. १९ सप्टेंबर : शिरूर अनंतपाळ तालुक्यातील बाकली येथील उमाकांत रावसाहेब पाटील यांची बाकली येथील ग्रामपंचायतच्या उपसरपंच पदी आज १६ सप्टेंबर रोजी सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली.

बाकली येथील ग्रामपंचायतच्या उपसरपंच पदी उमाकांत रावसाहेब पाटील यांची सर्व ग्रामपंचायत सदस्य सरपंच माजी उपसरपंच, निवडणूक निरीक्षक नवनाथ खंदाडे ग्रामपंचायत अधिकारी मलवाड यांच्यासह सर्व ग्रामस्थांच्या उपस्थितीमध्ये सर्वानुमते अतिशय खेळीमेळीच्या वातावरणामध्ये ही निवड बिनविरोधपणे पार पडली.

ग्रामपंचायत मध्ये असणाऱ्या नऊ सदस्या पैकी उपसरपंच पदासाठी उमाकांत रावसाहेब पाटील यांचा एकमेव अर्ज आल्याने या निवडीची प्रक्रिया वैद्य रीतीने अतिशय खेळीमेळीच्या वातावरणामध्ये निवडणूक निरीक्षकांच्या समोर कायदेशीर रित्या गणपूर्ती पूर्ण करून पार पडली.

त्यांच्या या निवडीबद्दल आमदार संभाजी पाटील निलंगेकर अरविंद पाटील निलंगेकर यांच्यासह सरपंच वैष्णवी हणमंत बालुरे माजी उपसरपंच पंकज रक्षाळे सर्व ग्रामपंचायत सदस्य तंटामुक्ती अध्यक्ष सोमनाथ चित्ते उपाध्यक्ष पांडुरंग काकनळे नानासाहेब शिंदे राहुल पाटील बालाजी पाटील शरद पाटील बब्रुवान रक्षाळे दत्ता प्रकाश पाटील यांच्यासह विविध ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे .

उमाकांत रावसाहेब पाटील नूतन उपसरपंच ग्रामपंचायत बाकली गावकऱ्यांनी दाखवलेल्या या विश्र्वासास विकासाच्या माध्यमातून जनतेचे प्रश्र्न सोडून या पदाला न्याय देण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न करून सर्व ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांसह बाकली गावाचा जास्तीत जास्त विकास करण्याचा आमचा प्रयत्न आहे अशी प्रतिक्रिया त्यांनी दैनिक सोलापूर तरुण भारत सोबत बोलताना दिली

## उदगीर -जळकोट मतदारसंघात दुष्काळ जाहीर करून एकरी ५० हाजार रुपीक विमा द्या : स्वप्निल जाधव



तभा वृत्तसेवा

जळकोट दि. १९ सप्टेंबर : गेल्या वर्षीपासून उदगीर - जळकोट विधानसभा मतदारसंघातील शेतकरी अडचणीत सापडला आहे. कधी आसमान इतर कधीच सुलतानी संकटांनी शेतकरी नागावला जात असताना सत्ताधारी सरकार मात्र केवळ घोषणाबाजी करत सुटले आहे. शेतकऱ्याच्या डोळ्यात पाणी असताना शेतकऱ्याच्या बांधावर जाऊन पिक पाहणी चे नाटक करणे चुकीचे आहे. हे सर्व थांबून शेतकऱ्यांना तात्काळ एकरी ५० हजार रुपये आर्थिक मदत द्यावी. अशी आग्रही मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उदगीर -जळकोट विधानसभा प्रमुख स्वप्निल अण्णा जाधव यांनी केली आहे.

लातूर जिल्ह्यात पावसाने मोठी ओढ दिल्याने खरीप पिके पूर्णपणे हातची गेली आहेत. जून ते ऑगस्ट अखेरपर्यंत तालुक्यात सरासरी सुमारे ७०० मिलिमीटर पर्जन्यमान अपेक्षित असताना यंदा केवळ १८८ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. पावसाने तब्बल ४० दिवसांची उघडीप दिल्याने सोयाबीन, तूर, मूग, उडीद व खरीप ज्वारी ही पिके मुळापासून वाळून गेली आहेत. त्यामुळे आता पाऊस झाला तरी या पिकांना पुन्हा उभारी मिळण्याची शक्यता नसल्याने जिल्हा्या दुष्काळ जाहीरकरून १०० टक्के विमा देण्याची मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उदगीर विधानसभा प्रमुख स्वप्नील अण्णा जाधव यांनी केली आहे.

पर्जन्यमानातील मोठी तूट आणि पिकांची झालेली अवस्था पाहता महसूल प्रशासनाने केवळ कार्यालयीन नोंदींवर अवलंबून न राहता प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन सद्यस्थितीची वस्तुनिष्ठ नोंद करावी, पीक कापणी प्रयोगाच्या कालावधीपर्यंत बहुतांश पिके पूर्णपणे कोलमडून गेली आहेत. त्यामुळे पारंपरिक पद्धतीने अंतिम आणेवारी काढल्यास शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होण्याची शक्यता असल्याचे त्यांनी म्हटले आहे.नजरी आणेवारी अंतिम आणेवारी मानून त्याला पर्जन्य त्रुटीची जोड द्यावी, तसेच शेतकऱ्यांना १०० टक्के पीकविमा आणि एनडीआरएफच्या निकषानुसार शासकीय मदत व सवलती देण्यात याव्यात, अशीही मागणी स्वप्निल अण्णा जाधव यांनी केली.

दुष्काळाचा परिणाम केवळ शेतीपुरता मर्यादित न राहता ग्रामीण अर्थव्यवस्थेवरही होत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांची शैक्षणिक फी माफ करणे, पीक कर्जावरील व्याजमाफी देणे, पाणीटंचाईग्रस्त गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे, शेतकरी आणि शेतमजुरांच्या हाताला काम मिळावे यासाठी रोजगार हमी योजनेंतर्गत आवश्यक कामे तातडीने मंजूर करून सुरू करावीत, तसेच पशुधनासाठी चाऱ्याची उपलब्धता करून देणे आवश्यक असल्याचे स्वप्निल अण्णा जाधव यांनी सांगितले. गरज भासल्यास चारा छावण्या सुरू कराव्यात, अशीही मागणी त्यांनी केली.

गेल्या वर्षी ओला दुष्काळ आणि यंदा कोरडा दुष्काळ अशा दुहेरी संकटात शेतकरी सापडला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना कर्जाच्या जोखडातून दिलासा देण्यासाठी दोन लाख रुपयांपर्यंतच्या चालू कर्जाबाबत शासनाने तातडीने कर्जमाफीचा निर्णय घ्यावा, अशी मागणीही स्वप्निल अण्णा जाधव यांनी केली आहे.

## गणेश मंडळाच्या वतीने सामाजिक उपक्रम

तभा वृत्तसेवा

वलांडी दि. १९ सप्टेंबर : देवणी तालुक्यातील बोंबळी खुर्द येथील गणेश मंडळांच्या वतीने शुक्रवारी (ता. १८) सामाजिक बांधिलकी जपत वृक्षारोपण, रक्तदान शिबीर घेत रक्तदात्यांना हेल्मेट देण्यात आले.

गणेशोत्सवाच्या निमित्ताने केवळ धार्मिक कार्यक्रमांपुरते मर्यादित न राहता सामाजिक बांधिलकी जपण्याचा संदेश देत बोबळी खुर्द (ता. देवणी) येथील जय हनुमान सार्वजनिक गणेश मंडळाच्या वतीने विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये वृक्षारोपण तसेच रक्तदान शिबिर घेऊन युवकांना समाजोपयोगी कार्याची प्रेरणा देण्यात आली. भालचंद्र ब्लड बँक व जय हनुमान सार्वजनिक गणेश मंडळाच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात युवकांसह नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत रक्तदान केले. विशेष म्हणजे रक्तदान करणाऱ्या प्रत्येक रक्तदात्यास एक हेल्मेट भेट देण्यात आले. रक्तदानासोबतच रस्ते सुरक्षेचा संदेश देण्याचा मंडळाचा हा उपक्रम उपस्थितांकडून कौतुकास्पद ठरला.

## समाज माध्यमात आलेली दुष्काळग्रस्त गावांची बनावट यादी तात्काळ हटवा : बाबासाहेब पाटील



तभा वृत्तसेवा

चाकूर दि. १९ सप्टेंबर : सोशल मीडियावर सध्या दुष्काळग्रस्त गावांची बनावट यादी सध्या फिरत असून त्यामुळे लातूर जिल्ह्यातील सर्वच तालुक्यातील शेतकऱ्यांत संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे,त्यामुळे शेतकऱ्यांना संभ्रमात टाकणाऱ्या या बनावट यादीचा शोध घेऊन ही यादी तात्काळ समाज माध्यमातून हटवण्याचे निर्देश महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांनी राज्याची कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी आयोजित केलेल्या बैठकीत ऑनलाइन सहभागी होत माहिती दिले.

छत्रपती संभाजीनगर महसूल विभागातील पीक परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी कृषिमंत्री ना. दत्तात्रय भरणे यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक पार पडली. या बैठकीला राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील हे ऑनलाइन व्हिडिओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून उपस्थित होते . या बैठकीत बोलताना सहकार मंत्री नामदार पाटील म्हणाले की, लातूर जिल्ह्यात खरीप हंगाम २०२६ मध्ये जूनपासून पर्जन्यमानात मोठी अनियमितता असून जुलै, ऑगस्ट व सप्टेंबर महिन्यात विविध कालावधीत दीर्घ पावसाने खंड पडलेला आहे. तालुकानिहाय अहवालानुसार लातूर, औसा, अहमदपूर, निलंगा, उदगीर, चाकूर, रेणापूर, देवणी, शिरूर अनंतपाळ व जळकोट या सर्व तालुक्यांमध्ये पिकांवर पाण्याच्या अभावामुळे दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे.पिके पुर्णतः वाळून गेली आहेत.पावसाच्या दीर्घ खंडामुळे खरीप पिके करपली आहेत यामुळे उत्पन्नात ७० ते ८० टक्के घट होणार आहे.

वस्तुस्थिती लक्षात घेता पीक विमा कंपन्यांना तातडीने सर्वेक्षण मोहीम राबवण्याचे निर्देश देण्यात आले असल्याचे सांगितले आहे. पीक नुकसानीचे पंचनामे व सर्वेक्षण जिल्ह्यातील एकाही महसूल मंडळाला वगळण्यात आले नाही, सर्व ६० महसूल मंडळांचा समावेश करून तातडीने पंचनामे करण्यात येणार आहेत. सोयाबीन तसेच इतर बाधित पिकांचे नुकसान वस्तुनिष्ठपणे नोंदवून, पात्र शेतकऱ्यांना योग्य व वेळेत नुकसानभरपाई मिळावी, यासाठी विमा कंपन्यांनी कोणतीही दिरंगाई करू नये. ज्या मंडळांमध्ये पर्जन्यमानातील खंड (वी ीशिश्रश्र) निकषानुसार आधीच स्पष्ट झाला आहे, तेथे तातडीने आगाऊ नुकसानभरपाईची (मिड-सीझन डव्हर्सिटी) प्रक्रिया सुरू करावी. जिल्हाधिकारी व कृषी विभागाने या सर्वेक्षणावर बारकाईने देखरेख ठेवावी, आणि याबाबतचा प्रगती अहवाल शासनास नियमितपणे सादर करावा, असे निर्देश सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांनी दिले.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## खासदार डॉ. काळगे, यांच्याकडून दुष्काळी परिस्थितीची पाहणी

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १९ सप्टेंबर : लातूर जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती दिवसेंदिवस अत्यंत गंभीर बनत चालली असून पावसाअभावी खरीप पिके करपून पूर्णपणे वाया गेली आहेत. या भीषण संकटाच्या पार्श्र्वभूमीवर, राज्याचे माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या सूचनेनुसार लातूरचे खासदार डॉ. शिवाजी काळगे आणि लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अभय साळुंके यांनी देवणी तालुक्यातील लासोना येथे थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन वाळलेल्या सोयाबीन पिकांची पाहणी केली. यावेळी दोन्ही नेत्यांनी संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या आणि शेतकऱ्यांना धीर दिला.

पाहणीदरम्यान स्थानिक शेतकरी शिवाजी भोरे यांच्या शेतातील सोयाबीनच्या नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. पेरणीनंतर तब्बल ५० ते ५५ दिवसांपेक्षा अधिक काळ पावसाचा खंड पडल्याने पिकांची वाढ खुंटली असून सोयाबीनच्या शेंगांमध्ये दाणे भरलेले नाहीत, झाडे पार करपून गेली आहेत. प्रति एकर सुमारे ३५ हजार रुपये खर्च करूनही हातात काहीच पडणार नाही अशी विदारक स्थिती निर्माण झाली असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. त्यातच मागील नुकसानीची मदत आणि विमा भरपाई अद्याप मिळाली नसताना आता नव्याने ओढवलेल्या दुष्काळामुळे शेतकरी आणि शेतमजूर आर्थिकदृष्ट्या पूर्णपणे उद्ध्वस्त झाला आहे, असा संतापही शेतकऱ्यांनी व्यक्त केला.



## विविध वृत्त.....

### कार्यभार घेतल्यापासून मुरूड ठाण्यांतर्गत अवैध दारूविक्रीचे ९५ गुन्हे दाखल : अंधारे

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १९ सप्टेंबर : मुरुड येथे ४ जून २०२६ रोजी कार्यभार स्वीकारल्यानंतर ऑगस्ट २०२६ अखेरपर्यंत अवैध दारूविक्रीप्रकरणी ९५ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच अवैध मटका व जुगारप्रकरणी १८ कारवाया करण्यात आल्या आहेत. मुरुडमधील अंधारे आडनाव असलेल्यांच्या विरोधातही कारवाई केली असून माझ्यावर केलेले आरोप चुकीचे आहेत, असे सहायक पोलिस निरिक्षक सुनील अंधारे यांनी प्रतिनिधीशी बोलताना सांगितले. मुरुड शहरात अंधारे आडनावाचे अनेक नागरिक वास्तव्यास आहेत. मात्र त्यापैकी एकही व्यक्ती माझी नातेवाईक नाही, असे अंधारे यांनी स्पष्ट केले. शिवसेनेच्या निवेदनाच्या माध्यमातून आपण मुरुड शहरात आल्यानंतर येथील अंधारे कुटुंबीय आपले पाहुणे असल्यामुळे त्यांच्या माध्यमातून अवैध धंदे सुरू असल्याचा आरोप चुकीचा आहे.

### लाहोटी इंग्लिश स्कूलमध्ये मुक्तिसंग्राम दिन साजरा

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १९ सप्टेंबर : येथील राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूलमध्ये ७८ वा मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

### तीनशे सायबर पुस्तकांचा विद्यार्थ्यांना वाटप; ऑर्चर्ड एज्युकेशनल अकॅडमीत सायबर सुरक्षा जनजागृती

तभा वृत्तसेवा

निलंगा दि. १९ सप्टेंबर : विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षा, डिजिटल सुरक्षितता आणि ऑनलाइन फसवणुकीबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने जीलहरीव एर्वीलरींळेपरश्र -लरवशॠ, छळश्ररपसर येथे विशेष सायबर सुरक्षा जनजागृती सत्राचे आयोजन करण्यात आले. अत्यंत सर्जनशील वातावरण असलेल्या या शाळेतील विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग, बुद्धिमत्ता आणि संवादात्मक प्रतिसादामुळे हे सत्र विशेष प्रभावी ठरले.

QUICK HEAL FOUNDATION आणि RAJRISHI SHAHU MAHAVIDYALAYA यांच्या माध्यमातून जाधव साहिल आणि कृष्णा पांढरे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत सायबर सुरक्षेच्या विविध महत्त्वपूर्ण विषयांवर माहिती दिली. ऑनलाइन फसवणूक, जढ्झ, पासवर्ड सुरक्षा, बनावट लिंक, सोशल मीडिया सुरक्षितता, डिजिटल पेमेंट, वैयक्तिक माहितीचे संरक्षण आणि सायबर गुन्ह्यांपासून बचाव याबाबत विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष उदाहरणांच्या माध्यमातून मार्गदर्शन करण्यात आले.

संपूर्ण सत्रादरम्यान विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत प्रश्र्न विचारले तसेच सायबर सुरक्षेबाबत आपली मते मांडली. विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग आणि सत्रानंतर मिळालेला सकारात्मक अभिप्राय यामुळे आयोजकांनीही समाधान व्यक्त केले.

या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना सुमारे ३०० सायबर सुरक्षा पुस्तिकांचे वाटप करण्यात आले. या पुस्तिकांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेची माहिती भविष्यातही सहज उपलब्ध व्हावी आणि ती आपल्या कुटुंबीयांपर्यंत पोहोचवता यावी, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश होता.

ऑर्चर्ड एज्युकेशनल अकॅडमीच्या शिक्षकांनी आणि विद्यार्थ्यांनी या उपक्रमाचे कौतुक केले. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद, शाळेचे सकारात्मक वातावरण आणि मिळालेला प्रभावी अभिप्राय यामुळे सायबर सुरक्षिततेचा संदेश अधिकाधिक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याच्या दिशेने हे सत्र एक यशस्वी पाऊल ठरले.

# सहकार मंत्र्यांसह लातूर जिल्हा मध्यवर्ती सह. बँकेचे ८ संचालक अपात्र






तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १९ सप्टेंबर : बँकिंग नियमन कायद्यानुसार, सहकारी बँकांच्या संचालक मंडळावर कोणताही सदस्य सलग १० वर्षांपेक्षा जास्त काळ राहू शकत नाही. या नव्या नियमानुसार दीर्घ काळापासून लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर संचालक म्हणून कार्यरत असलेल्या आठ संचालकांना रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने अपात्र ठरवण्याचा निर्णय घेतला आहे. आरबीआयने अपात्र ठरवलेल्याया संचालकांमध्ये राज्याचे विद्यमान सहकारमंत्रीबाबासाहेब पाटील यांचाहीसमावेश आहे. लातूर जिल्हा मध्यवर्ती सह. बँकेच्या पंचवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम आता कोणत्याही क्षणी घोषित होण्याची शक्यता आहे. तत्पूर्वीच या कारवाईने सहकार क्षेत्रात खळबळ उडाली आहे.लातूर जिल्हा मध्य. सह. बँकेचे माजी कर्मचारी सतीश शेषेराव जाधव यांनी या संचालकांच्या दीर्घ कार्यकाळाविरोधातविभागीय सहनिबंधकांकडेतक्रार केली होती. सहनिबंधकांकडूनतक्रारीचे व्यवस्थित निवारण न झाल्यानेत्यांनी दि. २५ मे २०२६ रोजी थेट आरबीआयकडे तक्रार केली होती.याप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) खंडपीठाने आरबीआयला या तक्रारीवर तातडीने कायद्यानुसार निर्णय घेण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार आरबीआयने ही धडक कारवाई केली आहे. अपात्र ठरविण्यात आलेल्या आठ संचालकांमध्ये सहकार मंत्री बाबासाहेब पाटील,

अशोकराव पाटील निलंगेकर,श्रीपतराव काकडे,स्वयंप्रभा पाटील,व्यंकटराव बिरादार,पृथ्वीराज शिरसाट,नागोराव आर. पाटील वप्रमोद जाधव यांचा समावेश आहे. रिझर्व्ह बँकेच्या या अपात्रतेच्या निर्णयाबद्दल राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांची प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी त्यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी तात्काळ प्रतिक्रिया देण्यास नकार देऊन योग्यवेळी प्रतिक्रिया देऊ असे सांगितले. रिझर्व्ह बँकेने सहकारी बँकांच्या संचालकांसाठी लागू केलेल्या सलग १० वर्षांच्या कार्यकाळाच्या

आणि ३ वर्षांच्या 'कूलिंग-ऑफ कालावधी'नियमाची कायदेशीर माहिती लागू केली आहे.२५ मे २०२६ रोजी प्रसिद्ध केलेल्या सुधारित मार्गदर्शक तत्त्वांनुसार सहकारी बँकांच्या संचालक मंडळाच्या रचनेत पारदर्शकता आणण्यासाठी हा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे.

बँकिंग नियमन कायदा, १९४९ मधील तरतुदींनुसार, कोणताही संचालक (अध्यक्ष आणि पूर्णवेळ संचालक वगळून) कोणत्याही सहकारी बँकेच्या संचालक मंडळावर सलग १० वर्षांपेक्षा जास्त काळ पदावर राहू शकत नाही.जर एखाद्या संचालकाने सलग १० वर्षे पूर्ण केली असतील, तर त्याला त्याच बँकेत पुन्हा संचालक म्हणून निवडून येण्यासाठी किंवा नामनिर्देशित होण्यासाठी किमान ३ वर्षांचा 'कूलिंग-ऑफ' (ब्रेक) कालावधी पूर्ण करणे बंधनकारक आहे.या ३ वर्षांच्या कूलिंग-ऑफ कालावधीत ती व्यक्ती संबंधित सहकारी बँकेत एक सामान्य सभासद किंवा ग्राहक या व्यतिरिक्त इतर कोणत्याही पदावर किंवा क्षमतेने काम करू शकत नाही. बँकेच्या कोणत्याही अंतर्गत व्यवहारात किंवा प्रशासनात त्यांचा हस्तक्षेप चालणार नाही.हा नियम 'बँक-स्पेसिफिक' (विशिष्ट बँकेपुरता) आहे. म्हणजेच, ३ वर्षांच्या कूलिंग-ऑफ काळात ती व्यक्ती इतर नियमांच्या अधीन राहून दुसऱ्या कोणत्याही सहकारी बँकेत संचालक म्हणून नियुक्त होण्यास पात्र असते.लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या विद्यमान संचालक मंडळाचा कार्यकाळ संपण्यास अगदी थोडासा अवधी असून कोणत्याही क्षणी आता निवडणूक कार्यक्रम घोषित होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. तत्पूर्वीच आरबीआयच्या या निर्णयाने अपात्र संचालकांसमवेतसर्वचसंचालकांना धक्का बसला आहे. त्यामुळे निवडणुकीसाठी पॅनल उभा करताना आता नेत्यांना नवीन चेहरे शोधावे लागणार आहेत. कोणत्याही परिस्थितीत आता या आठ संचालकांना किमान तीन वर्ष तरी जिल्हा बँकेचे दरवाजे बंद होणार आहेत. जिल्हा बँकेवर मागच्या अनेक वर्षांपासून सहकार महर्षी माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांचे वर्चस्व राहिले आहे. विरोधकांनी ही बँक ताब्यात घेण्याचे खूप प्रयत्न केले. मात्र, त्यात आजपर्यंतकोणालाही यश आले नाही. या निवडणुकीत भाजप नेते नेमकी कोणती भूमिका घेतात यावरही या निवडणुकीचेभवितव्य अवलंबून आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेचे विद्यमान आमदार बसवराज पाटील मुरूमकर याबाबतीत कोणता निर्णय घेतात याकडेही सगळ्यांचे लक्ष लागून आहे. अपात्र ठरविण्यात आलेले संचालक बाबासाहेब पाटील हे महायुती सरकारमधील एका घटक पक्षाचे नेते आहेत. त्यामुळे त्यांना जरी यावेळची निवडणूक लढवता येत नसली तरी ते आपला एखादा उमेदवार निश्र्चित देऊ शकतात. अशावेळी महायुती जर स्वतंत्र पॅनल ठेवणार असेल तर बाबासाहेब पाटील यांचा उमेदवार महायुतीच्या पॅनलकडून मैदानात उतरणार कीबँकेवर पूर्वीपासून सत्तास्थानी असलेल्या देशमुख प्रणित पॅनलकडूनउतरणार ? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## आपले आरोग्य – आपलीच जबाबदारी फाउंडेशन तर्फे डॉ. राजेश दरडे यांचा सन्मान



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १९ सप्टेंबर : महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेचे सदस्य म्हणून डॉ. राजेश दरडे यांची नियुक्ती झाल्याबद्दल आपले आरोग्य - आपलीच जबाबदारी फाउंडेशनच्या वतीने त्यांचा सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. लातूरचे खासदार डॉ. शिवाजी काळगे यांच्या हस्ते हा सन्मान करण्यात आला.

महाराष्ट्र शासनाच्या वैद्यकीय शिक्षण विभागाने १५ सप्टेंबर २०२६ रोजी प्रसिद्ध केलेल्या राजपत्रातील अधिसूचनेद्वारे डॉ. राजेश दरडे यांची महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेवर सदस्य म्हणून नियुक्ती जाहीर करण्यात आली आहे. त्यांच्या या नियुक्तीबद्दल लातूरच्या वैद्यकीय क्षेत्रातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

याच पार्श्र्वभूमीवर आपले आरोग्य - आपलीच जबाबदारी फाउंडेशन व सप्तफेरे मेट्रोमनी यांच्या वतीने आयोजित गणपती आरती कार्यक्रमात डॉ. राजेश दरडे यांचा विशेष सन्मान करण्यात आला. यावेळी खासदार डॉ. शिवाजी काळगे यांनी गणरायाची आरती करून डॉ. दरडे यांचे अभिनंदन केले.

यावेळी 'आपले आरोग्य - आपलीच जबाबदारी फाउंडेशन'च्या 'एक व्यक्ती - सहा संकल्प' या सामाजिक उपक्रमाचेही खासदार डॉ. शिवाजी काळगे यांनी विशेष कौतुक केले. 'उज्ज्वल भविष्य घडवूया' या संकल्पनेतून रसायनमुक्त शेती, व्यसनमुक्त जीवन, पर्यावरण संरक्षण, कापडी पिशवीचा वापर, दररोज एक तास व्यायाम आणि दरवर्षी पाच झाडांची लागवड हे सहा संकल्प समाजातील प्रत्येक व्यक्तीने स्वीकारावेत, असा संदेश फाउंडेशनच्या माध्यमातून दिला जात आहे. या उपक्रमातून आरोग्य, पर्यावरण आणि सामाजिक जबाबदारीबाबत जनजागृती करण्याच्या कार्याचे खासदारांनी कौतुक केले.

## संगीता महाजन यांना 'उत्कृष्ट प्राध्यापक पुरस्कार'

### दयानंद शिक्षण संस्थेतर्फे मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त गौरव



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १९ सप्टेंबर : दयानंद शिक्षण संस्था, लातूर यांच्या वतीने दयानंद विधी महाविद्यालयाच्या ग्रंथालयाला 'ग्रंथमंदिरम्'चे स्वरूप देत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वाटचालीत मोलाची भूमिका बजावणाऱ्या डॉ. संगीता अजय महाजन यांना *उत्कृष्ट प्राध्यापक पुरस्कार - २०२५-२६'* प्रदान करून सन्मानित करण्यात आले. १७ सप्टेंबर रोजी 'मराठवाडा मुक्तिसंग्राम दिना'निमित्त आयोजित हृदयस्पर्शी समारंभात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

संस्था अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी यांच्या हस्ते त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी संस्था सचिव रमेश बियाणी यांसह मान्यवरांची उपस्थिती होती. गेल्या तीन दशकांपासून ज्ञानसेवेत कार्यरत असलेल्या डॉ. महाजन यांनी ग्रंथालयाला केवळ पुस्तके उपलब्ध करून देणारे ठिकाण न ठेवता, विद्यार्थ्यांसाठी ज्ञान, शिस्त आणि मार्गदर्शनाचे केंद्र बनविण्यात योगदान दिले आहे. कामकाजातील शिस्त, समान न्यायाचा दृष्टिकोन आणि उत्तम प्रशासकीय नियोजन ही त्यांच्या कार्याची वैशिष्ट्ये आहेत. विशेषतः नवीन विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेदरम्यान आपुलकीने व पालकाच्या मायेने केलेले मार्गदर्शन अनेक विद्यार्थ्यांसाठी आधार ठरले आहे. कुटुंबातील जबाबदाऱ्या समर्थपणे सांभाळत व्यावसायिक क्षेत्रात निष्ठा, शिस्त आणि समर्पणाने केलेल्या त्यांच्या तीन दशकांच्या कर्तव्यनिष्ठ ज्ञानसेवेचा गौरव म्हणून या पुरस्काराकडे पाहिले जात आहे. या सन्मानाबद्दल डॉ. संगीता महाजन यांचे सहकारी, विद्यार्थी, मित्रपरिवार आणि हितचिंतकांसह सर्व स्तरांतून मनःपूर्वक अभिनंदन होत आहे.

## डॉ.संजय गवई यांचा सोलापूर विद्यापीठात सत्कार



तभा वृत्तसेवा

लातूर दि.१९ सप्टेंबर : महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालयातील समाजकार्य विभागातील डॉ.संजय गवई यांची महाराष्ट्र शासन, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्याद्वारे समाजकार्य अभ्यासक्रमाच्या विस्तारासाठी वार्षिक सम्यक योजना निर्मिती निकष समिती सदस्यपदी निवड झाल्याबद्दल त्यांचा पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर येथील संशोधन केंद्रीय प्रवेश समितीद्वारे सत्कार करण्यात आला.

यावेळी मानवलोक समाजकार्य महाविद्यालय, अंबाजोगाई येथील प्रोफेसर तथा संशोधन केंद्रीय संशोधन प्रवेश समितीचे अध्यक्ष डॉ.नजीर शेख, डिपार्टमेंट ऑफ सोशल वर्क, सेंट्रल यूनिवर्सिटी ऑफ कर्नाटक येथील डॉ.पवित्रा आलूर, सोलापूर विद्यापीठ समाजकार्य अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. संदीप जगदाळे, वालचंद समाजकार्य महाविद्यालय, सोलापूर येथील विभाग प्रमुख डॉ.विजया महाजन, संशोधक मार्गदर्शक डॉ.अभय जाधव, डॉ.जितेंद्र गांधी आणि संशोधक विद्यार्थी यांची उपस्थिती होती.

या समितीच्या दोन ऑन लाईन आणि दि.०९ व १० सप्टेंबर २०२६ रोजी महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास प्रबोधनी, पुणे येथील कॉन्फरन्स हॉलमध्ये महाराष्ट्रात समाजकार्य अभ्यासक्रमांच्या विस्तारासाठी वार्षिक सम्यक योजना तयार करण्यासाठी निकष ठरवण्याबाबत राज्यस्तरीय समितीची बैठक स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडचे कुलगुरू तथा समिती अध्यक्ष डॉ.मनोहर चासकर यांच्या अध्यक्षतेखाली आणि महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण विभागाचे संचालक डॉ.शैलेंद्र देवनाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली बैठका संपन्न झाल्या.

या बैठकीला कर्वे समाजसेवा संस्था, पुणे येथील संचालक तथा समिती सदस्य सचिव डॉ.महेश ठाकूर, सदस्य यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक येथील माजी कुलसचिव डॉ.दिलीप भरड, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथील वरिष्ठ कायदा अधिकारी डॉ.परविन सय्यद, फुले-आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क, गडचिरोली येथील प्रभारी संचालक डॉ.रुपेंद्र कुमार गौर आणि टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस, मुंबई येथील अधिष्ठाता डॉ. बिपिन जोजो यांची उपस्थिती होती.

या तीनही बैठकांमध्ये महाराष्ट्रातील शैक्षणिक वर्ष २०२७-२८ पासून समाजकार्य अभ्यासक्रमाच्या विस्तारासाठी वार्षिक सम्यक योजना निकष, विद्यमान महाविद्यालयांना बीएसडब्ल्यू/एमएसडब्ल्यू अभ्यासक्रमाच्या अतिरिक्त तुकडीस मान्यता देण्याकरिता प्रस्तावित सूक्ष्मदर्शी निकष अ, ब, क आणि ड यावर सविस्तर चर्चा होऊन यासंबंधीचा प्रस्ताव महाराष्ट्र राज्य शिक्षण संचालक, पुणे यांच्याकडे लवकरच सादर केला जाणार आहे. या बैठकीला सदस्य सचिव, सर्व सदस्य आणि संचालक कार्यालयातील अधिकारी उपस्थित होते. अशी माहिती समिती सदस्य डॉ.संजय गवई यांनी दिली.

# लातूरमधील पाणीटंचाई मानवनिर्मित; साखर कारखान्यांमुळे लातूरकरांचे जगणे मुश्कील : दयानंद पाटील

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १९ सप्टेंबर : लातूर जिल्हा आणि शहरात सध्या निर्माण झालेली तीव्र पाणीटंचाई ही केवळ नैसर्गिक नसून पूर्णपणे मानवनिर्मित आहे, असा थेट आरोप शिवा लिंगायत युवक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष दयानंद पाटील यांनी केला आहे. प्रशासनाकडून पाणी बचतीचे केवळ नाटक केले जात असून, टंचाईचे मुख्य कारण असलेल्या साखर कारखान्यांवर कारवाई करण्याचे धाडस अधिकारी दाखवत नसल्याने लातूरकरांमध्ये तीव्र संताप असून आगामी काळात याचा मोठा उद्रेक होण्याची शक्यता त्यांनी वर्तवली आहे.

कृषी तज्ज्ञ आणि 'साउथ एशिया नेटवर्क ऑन डॅम्स, रिव्हर्स अँड पिपल' सारख्या संस्थांच्या अभ्यासाचा हवाला देत दयानंद पाटील म्हणाले की, १ किलो साखर तयार करण्यासाठी सुमारे २,५०० लीटर पाण्याची आवश्यकता असते. लातूरसारख्या कायम दुष्काळी भागात हजारो हेक्टरवर उसाची लागवड केली जात असल्याने भूजल पातळी कमालीची खालावली आहे. १५-१५ दिवस पिण्याचे पाणी मिळत सद्यस्थितीत सामान्य नागरिकांना नसतानाही, राजकीय वरदहस्त असलेल्या कारखान्यांकडून धरणांच्या मृत साठ्यातून ) थेट जॅकवेलद्वारे पाणी उपसा सुरू असल्याचा आरोप पाटील यांनी केला आहे.

या जलसंकटावर कायमस्वरूपी मात करण्यासाठी शिवा लिंगायत युवक संघटनेने पुढील मागण्यांवर भर दिला आहे: उसासाठी ठिबक सिंचन पूर्णपणे बंधनकारक करावे, ज्यामुळे ५०% ते ६०% पाण्याची बचत होईल. तीव्र टंचाई असलेल्या क्षेत्रांमध्ये नवीन साखर कारखान्यांना मंजुरी देऊ नये. शेतकऱ्यांना उसाऐवजी कमी पाण्यात येणाऱ्या तेलबिया, कडधान्ये व फळबागा यांसारख्या पर्यायी पिकांकडे वळवण्यासाठी प्रोत्साहन द्यावे.लातूरकरांच्या हक्काचे पाणी साखर कारखान्यांना दिले जात असल्यामुळे जनतेमधील असंतोष शिगेला पोहोचला असून, प्रशासनाने तातडीने कठोर पावले न उचलल्यास नाईलाजाने शिवा लिंगायत युवक संघटनेतर्फे तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा दयानंद पाटील यांनी दिला आहे.



### प्रशासकीय कारवाई केवळ कागदावर?

जिल्हा प्रशासनाने पाण्याची अवैध उचल रोखण्यासाठी संयुक्त गस्त घालणे, खाजगी विहिरींचे संपादन करणे आणि टँकरद्वारे पाणीपुरवठा करणे यांसारख्या आपत्कालीन उपाययोजना सुरू केल्या आहेत. मात्र, मूळ समस्येला हात न लावता केवळ सामान्य जनतेवर निर्बंध लादले जात आहेत. सत्ता दिली याचा अर्थ असा नाही की आमचे जगणे मुश्कील करावे. तीव्र टंचाईच्या काळातही साखर कारखाने बंद करण्याचे आदेश काढण्याची ताकद सध्याच्या प्रशासकीय अधिकाऱ्यांमध्ये नाही, अशी घणाघाती टीका दयानंद पाटील यांनी केली.

CMYK

# धाराशिव जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## जय हनुमान मंडळाचा 'भूत बंगला' ठरतोय आकर्षण

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१९ सप्टेंबर -**

नळदुर्ग येथील शास्त्री चौक येथील जय हनुमान तरुण गणेश मंडळाच्या वतीने गणेशोत्सवानिमित्त यावर्षी 'भुत बंगला' हा आकर्षक व थरारक हालता देखावा सादर करण्यात आला आहे. देखाव्यातील विविध हालचाली, प्रकाशयोजना आणि ध्वनीप्रभावांमुळे हा देखावा नागरीकांचे विशेष आकर्षण ठरत आहे.

दरवर्षी गणेशोत्सवानिमित्त जय हनुमान तरुण गणेश मंडळाच्या वतीने विविध सामाजिक, धार्मिक व मनोरंजनात्मक देखावे सादर केले जातात. ही परंपरा कायम ठेवत यावर्षी 'भुत बंगला' हा देखावा साकारण्यात आला आहे. देखावा पाहण्यासाठी शहरातील भाविक, गणेशभक्त तसेच नागरीकांनी मोठी गर्दी केली होती.



या देखाव्याच्या आयोजनासाठी मंडळाचे अध्यक्ष गजानन हळदे, उपाध्यक्ष राहुल ठाकुर, किरण दुस्सा, कोषाध्यक्ष अजय कांबळे व नीरज गहीरवार, सचिव लखन कोकणे आणि सहसचिव आकाश कोकणे यांनी नियोजन केले.

हा देखावा साकारण्यासाठी आरक्ष काळे, ओम ठाकुर, अमित ठाकुर, समर्थ ठाकुर, जगु ठाकुर, आकाश घोडके, अरविंद कांबळे, अनिल वाघमारे, दादा जाधव, महादेव फरताळे, संजय फरताळे, महेश वाघमारे आदींनी परीश्रम घेतले.



### संक्षिप्त वृत्त...



## राष्ट्रीय शिक्षक पुरस्कारप्राप्त डॉ. किरण झरकर यांचा सत्कार

**धाराशिव, दि.१९ सप्टेंबर -**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते 'राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार' प्राप्त झाल्याबद्दल डॉ. किरण झरकर यांचा रुपामाता परिवाराच्या प्रधान कार्यालयात सत्कार करण्यात आला. रुपामाता परिवाराचे संस्थापक तथा भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य ॲड. व्यंकटराव गुंड पाटील यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम झाला. छत्रपती संभाजीनगर विभागातील आयटीआय क्षेत्राला मिळालेला हा पहिला राष्ट्रीय बहुमान असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. शैक्षणिक व कौशल्य विकास क्षेत्रातील योगदानाबद्दल डॉ. झरकर यांचे कौतुक करण्यात आले. त्यांनी कौशल्य विकासासाठी 'स्किलबुक' प्रणाली विकसित केली असून 'वंदे मातृशक्ती' या पुस्तकाचे लेखन केले आहे. सत्काराला उत्तर देताना डॉ. झरकर यांनी पुरस्कारासाठी रुपामाता परिवाराकडून मिळालेल्या पाठबळाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली

## प्रा. श्रीधर भवर यांची मराठवाडा अर्बन बँक्स असोसिएशनवर बिनविरोध निवड

**येरमाळा, दि.१९ सप्टेंबर -**

मराठवाडा अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स असोसिएशन, औरंगाबादच्या २०२६ ते २०३१ या कालावधीसाठीच्या



समिती सदस्यपदी कळंब येथील प्रियदर्शनी अर्बन को-ऑप. बँकेचे चेअरमन प्रा. श्रीधर (बाबा) भवर यांची बिनविरोध निवड झाली आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था निवडणूक नियमांनुसार राबविण्यात आलेल्या निवडणूक प्रक्रियेत अंतिम मुदतीपर्यंत आवश्यक संख्येपेक्षा अधिक उमेदवारी अर्ज प्राप्त न झाल्याने निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी भवर यांची बिनविरोध निवड जाहीर केली. प्रा. भवर हे प्रियदर्शनी अर्बन बँकेचे संस्थापकीय चेअरमन असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली बँकेला विविध पुरस्कार मिळाले आहेत. त्यांच्या निवडीबद्दल कळंब परिसरातील सहकार क्षेत्रातील पदाधिकारी, संचालक, सभासद व हितचिंतकांनी अभिनंदन केले.



## 'क्लीन समता, ग्रीन समता'च्या रक्तदान शिबिरात ९८ जणांचे रक्तदान

**धाराशिव, दि.१९ सप्टेंबर -**

मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन आणि श्री गणेशोत्सवाचे औचित्य साधून 'क्लीन समता, ग्रीन समता'च्या वतीने नगरसेवक नाना घाटगे यांच्या संकल्पनेतून रक्तदान शिबिर घेण्यात आले. शिबिराला नागरिक तसेच महाविद्यालयीन तरुण-तरुणींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी ९८ जणांनी रक्तदान केले, तर ७४ जणांची बीपी व शुगर तपासणी करण्यात आली. रेणुका ब्लड सेंटरच्या वतीने रक्तसंकलन करण्यात आले. तसेच एमपीएससीसह विविध स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना पुस्तके वितरित करण्यात आली.

### धाराशिवच्या पाचवीला पूजलेला दुष्काळ...

# पाऊस पडला तर अतिवृष्टी, नाही पडला तर दुष्काळ; शेतकऱ्याच्या जगण्याचा प्रत्येक हंगाम निसर्गाच्या लहरीवर!

**अनिल आगलावे**
**धाराशिव, दि.१९ सप्टेंबर -**

बालाघाटाच्या डोंगररांगांच्या कुशीत वसलेल्या धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्याचे आयुष्य आजही आभाळाकडे पाहत सुरू होते आणि आभाळाकडे पाहतच संपते. पाऊस पडला तर पीक वाचेल, पीक आले तर भाव मिळेल आणि भाव मिळाला तर कर्ज फेडता येईल, या आशेवर त्याची वर्षानुवर्षे शेती सुरू आहे. मात्र, या सगळ्या गणितात शेतकऱ्याच्या हातात उरतो तो केवळ खर्च, कर्ज आणि पुढच्या हंगामाची चिंता!



दुष्काळ हा धाराशिवच्या शेतकऱ्यासाठी आता केवळ एखाद्या वर्षातील नैसर्गिक आपत्ती राहिलेली नाही. तो त्याच्या शेतीच्या नियोजनाचा, आर्थिक गणिताचा आणि भवितव्याचा अविभाज्य भाग बनला आहे. कधी पाऊस कमी पडतो, कधी पेरणीनंतर पावसाचा खंड पडतो, तर कधी पीक काढणीला आलेले असताना अतिवृष्टी आणि अवकाळी पाऊस घात करतो. त्यामुळे शेतकऱ्याच्या हातात आलेला घास निसर्ग पुन्हा हिरावून घेतो.

धाराशिवचा शेतकरी दुष्काळापेक्षा खूपच मोठा असून येथील शेतकऱ्याने अनेक वर्षे दुष्काळ पाहिला आहे. पिके करपताना पाहिली आहेत. अतिवृष्टीने शेत वाहून जाताना पाहिले आहे. बाजारभाव पडताना पाहिला आहे. कर्जाचे ओझे वाढताना पाहिले आहे. तरीही तो पुढच्या हंगामाची तयारी करतो. कारण त्याच्याकडे माती आहे, श्रम आहे आणि पुन्हा उभे राहण्याची जिद्द आहे. धाराशिवच्या शेतकऱ्याला केवळ दुष्काळग्रस्त म्हणून पाहण्याची गरज नाही; त्याला पाण्याची शाश्वत व्यवस्था, उत्पादनाला योग्य बाजारभाव, शेतीला तंत्रज्ञान आणि उत्पन्नाला स्थैर्य देण्याची गरज आहे. दुष्काळ धाराशिवच्या पाचवीला पूजलेला असला, तरी तो शेतकऱ्याच्या नशिबात कायमचा लिहिलेला नाही. पावसाचा प्रत्येक थेंब अडवला, जमिनीत मुरवला आणि शेतीच्या उपयोगात आणला; उत्पादनाला बाजारपेठ मिळवून दिली आणि शेतीची जोखीम कमी केली, तर या जिल्ह्याचा शेतकरी दुष्काळाशी लढत राहणारा नव्हे, तर दुष्काळावर मात करणारा शेतकरी ठरू शकतो.




शेतकऱ्याची अडचण केवळ पावसापुरती मर्यादित नाही. निसर्गाने साथ दिली आणि पीक चांगले आले, तरी त्याला योग्य बाजारभाव मिळेल याची शाश्वती नसते. उत्पादनाचा खर्च शेतकऱ्याने करायचा, निसर्गाची जोखीम त्याने घ्यायची आणि बाजारभावाचा धोका देखील त्यानेच सहन करायचा, अशी परिस्थिती अनेकदा निर्माण होते. पीक बाजारात आणल्यानंतर भाव घसरला, तर वर्षभर केलेल्या मेहनतीचे आर्थिक गणित बिघडते. उत्पादन चांगले आले तर भाव पडतो आणि उत्पादन कमी झाले तर खर्च भरून निघत नाही. त्यामुळे शेतकरी शेती करतो, उत्पादन घेतो; पण त्याच्या हातात स्थिर उत्पन्न राहत नाही.

धाराशिवच्या ग्रामीण भागातील शेतकरी शेती सोडत नाही. कारण शेती हीच त्याची उपजीविका आहे. वर्ष संपते, हंगाम संपतो, कर्जाचा हिशेब केला जातो आणि पुन्हा पुढच्या हंगामासाठी त्याच शेतकऱ्याला नव्याने पैसे उभे करावे लागतात. कधी कर्ज फेडण्यासाठी पीक विकावे लागते, तर कधी घरखर्च, मुलांचे शिक्षण, आरोग्य आणि इतर गरजांसाठी शेतीवरच अवलंबून राहावे लागते. त्यामुळे शेतकऱ्याचे आयुष्य एका हंगामातून दुसऱ्या हंगामात पुढे सरकत असले, तरी आर्थिक स्थैर्य मात्र दूरच राहते. शेतकरी जगतोय; पण सधन होत नाही, हे धाराशिवच्या शेतीसमोरील सर्वात मोठे वास्तव आहे.

पिकासोबत शेतकऱ्याच्या उत्पन्नालाही आधार हवा असतो. फक्त पाणी उपलब्ध करून दिल्याने प्रश्न पूर्णपणे सुटणार नाही. कमी पाण्यात येणाऱ्या पिकांना प्रोत्साहन, आधुनिक शेती तंत्रज्ञान, पीक विविधीकरण, पशुपालन, दुग्धव्यवसाय आणि शेतीपूरक व्यवसायांची जोड शेतकऱ्याला द्यावी लागेल. त्याचबरोबर शेतमालाला योग्य बाजारपेठ, साठवणूक सुविधा, प्रक्रिया उद्योग आणि थेट विक्रीची व्यवस्था उपलब्ध झाली, तर शेतकऱ्याला उत्पादनातून अधिक मूल्य मिळू शकते.

शेतकरी केवळ कच्चा माल उत्पादक राहू नये, तर आपल्या उत्पादनातून अधिक उत्पन्न निर्माण करणारा उद्योजक बनावा, यासाठी ग्रामीण भागात पूरक व्यवस्था उभी करणे गरजेचे आहे. प्रश्न केवळ पाऊस पडण्याचा नाही; प्रश्न पडलेल्या पावसाचा प्रत्येक थेंब शेतकऱ्याच्या उत्पन्नात कसा रूपांतरित होणार, याचा आहे. धाराशिवला दुष्काळाची सवय झाली आहे; आता मात्र शेतकऱ्याला दुष्काळमुक्त भविष्याची गरज आहे.

### पेरणीपासून काढणीपर्यंत प्रत्येक पावलावर संकट..

शेतकरी पेरणीपूर्वीच खर्चाला सुरुवात करतो. बियाणे, खते, कीटकनाशके, मशागत, मजुरी, डिझेल, वीज आणि वाहतूक यासाठी पैसे उभे करावे लागतात. अनेकदा कर्ज काढून किंवा घरातील बचत खर्च करून तो पिकाची उभारणी करतो. पेरणी झाली की पावसाची चिंता सुरू होते. सुरुवातीला पाऊस झाला नाही तर पेरणी अडकते. पेरणी झाल्यानंतर पावसाने दडी मारली तर उगवलेले पीक धोक्यात येते. पिकाला पाणी मिळाले आणि ते जोमाने वाढले, तर काढणीच्या काळात अवकाळी किंवा अतिवृष्टीचा धोका डोक्यावर असतो. अशा परिस्थितीत शेतकऱ्याची शेती म्हणजे केवळ उत्पादन घेण्याचा व्यवसाय राहत नाही; ती दरवर्षी नव्याने जोखीम पत्करण्याची प्रक्रिया बनते.

### पाऊस पडला तर अतिवृष्टी, नाही पडला तर दुष्काळ..!

धाराशिवच्या शेतकऱ्याची हीच सर्वात मोठी शोकांतिका आहे. पावसाची प्रतीक्षा केली तर तो येत नाही आणि आला तर अनेकदा कमी कालावधीत मोठ्या प्रमाणावर बरसतो. त्यामुळे पिकाला आवश्यक असलेला संतुलित पाऊस मिळण्याऐवजी कधी पाण्याअभावी पीक करपते, तर कधी अतिवृष्टीमुळे शेतातील माती आणि उभे पीक वाहून जाते. पाऊस पडतो; मात्र तो शेतकऱ्याच्या उपयोगी किती पडतो, हा खरा प्रश्न आहे. पावसाचे पाणी जमिनीत मुरवणे, ते साठवणे आणि गरजेच्या वेळी शेतीसाठी उपलब्ध करून देणे यावर पुरेसे नियोजन झाले नाही, तर दरवर्षी दुष्काळाच्या संकटाला सामोरे जावे लागणार आहे. 'पाणी पडते, पण टिकत नाही; टिकले तर शेतीला पुरेसे मिळत नाही,' ही ग्रामीण भागातील वस्तुस्थिती बदलणे गरजेचे आहे.

### दुष्काळात मदत नव्हे, कायमस्वरूपी आधार हवा..!

दुष्काळ आला की टँकर, चारा, अनुदान, पंचनामे आणि मदतीच्या घोषणा सुरू होतात. ही मदत संकटाच्या काळात शेतकऱ्यासाठी आवश्यक आहे; मात्र ती कायमस्वरूपी उपाय ठरू शकत नाही. धाराशिवच्या शेतकऱ्याला दर दोन-तीन वर्षांनी दुष्काळी मदतीची गरज पडू नये, यासाठी पाण्याचे नियोजन करावे लागेल. शेततळी, बंधारे, जलसंधारण, नदी-नाला खोलीकरण, जलसाठ्यांचे पुनरुज्जीवन, सूक्ष्म सिंचन आणि उपलब्ध पाण्याचा काटेकोर वापर यावर सातत्याने काम करणे आवश्यक आहे. दुष्काळाच्या वेळी मदत देण्यापेक्षा दुष्काळाच्या काळात शेतकरी अडचणीत येऊ नये, अशी व्यवस्था निर्माण करणे अधिक महत्त्वाचे आहे.

## 'वाशी तालुका दुष्काळातून वगळला'चे मेसेज चुकीचे

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.१९ सप्टेंबर -**

मागील दोन महिन्यांपासून पावसाचा खंड पडल्याने वाशी तालुक्यात खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. पावसाअभावी पिके करपून गेल्याने आगामी काळात चारा व पाणीटंचाईचे संकट निर्माण होण्याची शक्यता आहे.

दरम्यान, 'संपूर्ण धाराशिव जिल्हा दुष्काळग्रस्त जाहीर झाला असून वाशी तालुका वगळण्यात आला आहे', अशा आशयाचे मेसेज सोशल मीडियावर प्रसारित होत असल्याने शेतकऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला होता. याबाबत तालुका कृषी अधिकारी गणेश सूर्यवंशी यांनी हे मेसेज चुकीचे असल्याचे स्पष्ट केले.

वाशी तालुक्यात पावसाअभावी झालेल्या पिकांच्या नुकसानीचा अहवाल शासनाकडे पाठविण्यात आला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी सोशल मीडियावरील अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन सूर्यवंशी यांनी केले आहे.

## तुळजापुरात सोमवारी शेतकरी आक्रोश मोर्चा

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१९ सप्टेंबर -**

पावसाने दीड ते दोन महिन्यांपासून दडी मारल्याने तुळजापूर तालुक्यासह धाराशिव जिल्ह्यात दुष्काळाचे गंभीर सावट निर्माण झाले आहे. पावसाअभावी सोयाबीन, तूर, उडीद, मका, मूग, भाजीपाला व फळबागांचे मोठे नुकसान झाले असून, शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी सोमवारी (दि. २१) तुळजापूर येथे शेतकरी आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे.

नुकसानग्रस्त पिकांचे पंचनामे तातडीने सुरू करावेत, कापणी प्रयोग न करता सरसकट हेक्टरी एक लाख रुपये मदत द्यावी, पीकविमा भरलेल्या तसेच न भरलेल्या शेतकऱ्यांना १०० टक्के पीकविमा संरक्षण द्यावे आणि जनावरांसाठी चारा व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी, या प्रमुख मागण्या करण्यात येणार आहेत.

मोर्चाला सकाळी ११ वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौकातून सुरुवात होऊन तहसील कार्यालयावर मोर्चा नेण्यात येणार आहे. शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन तुळजापूर तालुका काँग्रेस कमिटीने केले आहे.

## लोकमान्य विद्यालयात व्यसनमुक्तीचा जागर; विद्यार्थ्यांनी घेतली व्यसनमुक्तीची शपथ




**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१९ सप्टेंबर -**

मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधून आंदोरा येथील लोकमान्य विद्यालयात इयत्ता आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी व्यसनमुक्ती जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना तंबाखू, गुटखा, दारू तसेच अमली पदार्थांपासून दूर राहण्याची आणि निरोगी जीवनशैलीचा स्वीकार करण्याची शपथ देण्यात आली.

येडाई व्यसनमुक्ती केंद्राचे संचालक डॉ. संदीप तांबारे हे कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना व्यसनांचे दुष्परिणाम समजावून सांगत व्यसनांपासून दूर राहण्याचे आवाहन केले. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे शपथ घेत समाजात व्यसनमुक्तीचा संदेश पोहोचविण्याचा संकल्प केला.

कार्यक्रमाचे आयोजन स्वाती भातलवंडे यांनी केले. त्यांनी विद्यार्थ्यांना व्यसनांचे शारीरिक, मानसिक व सामाजिक दुष्परिणाम समजावून सांगितले. आजचा विद्यार्थीच उद्याचा जबाबदार नागरिक आहे. त्यामुळे व्यसनांपासून दूर राहून आपल्या उज्ज्वल भविष्यासाठी प्रयत्न करा, असा संदेश त्यांनी दिला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षकांनी सहकार्य केले. शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांनी कार्यक्रमात उत्साहाने सहभाग घेतला.

मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त आयोजित हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला. 'व्यसनमुक्त विद्यार्थी, निरोगी समाज आणि सक्षम राष्ट्र' हा संदेश या माध्यमातून देण्यात आला.

**येडाई व्यसनमुक्ती केंद्राचा प्रेरणादायी उपक्रम..**



## आ. रोहित पवार यांचा आज वाशी तालुका दौरा

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.१९ सप्टेंबर -**

पावसाने दीर्घ खंड दिल्याने वाशी तालुक्यात सोयाबीनसह खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार आज वाशी तालुका दौऱ्यावर आहेत.

दौऱ्यात ते जिल्हा परिषद गटातील विविध गावांना भेट देऊन नुकसानग्रस्त सोयाबीन पिकांची पाहणी करणार आहेत. तसेच शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी व नुकसानीची माहिती जाणून घेणार आहेत.

## रूपामाता विद्यालयाच्या गुणवंत क्रीडापटू व बुद्धिबळपटूंचा गौरव

**तालुकास्तरीय स्पर्धांत चमकदार कामगिरी; पाच विद्यार्थ्यांची जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१९ सप्टेंबर -**

पाडोळी (आ.) येथील रूपामाता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात मराठवाडा मुक्ती संग्राम दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या दिनाचे औचित्य साधून धाराशिव तालुकास्तरीय शालेय क्रीडा व बुद्धिबळ स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा रूपामाता उद्योग समूहाचे संस्थापक अध्यक्ष तथा संस्थेचे अध्यक्ष ॲड. व्यंकटराव विश्वनाथ गुंड यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.



तालुकास्तरीय शालेय मैदानी क्रीडा स्पर्धेत विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी विविध क्रीडा प्रकारांत प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवत यश संपादन केले. प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये श्रावणी राहुल राऊत, चैताली नानासाहेब चव्हाण आणि पृथ्वीराज रणजीत गुंड यांचा समावेश आहे. किरण बळीराम सगर, सगुना अंकुश टिपे, चैताली नानासाहेब चव्हाण आणि ओमकार उत्तरेश्वर सोनटक्के यांनी द्वितीय क्रमांक मिळवला. तसेच संध्या राहुल राठोड, तनुजा युवराज गुंड, प्रथमेश शरद गुंड, सुजाता सुनील चव्हाण, पुनम धनराज गाते, सुप्रिया अनिल चव्हाण, विद्या राहुल राठोड, मनीषा युवराज गुंड, सायली गोविंद पवार आणि किरण बळीराम सगर यांनी विविध क्रीडा प्रकारांत तृतीय क्रमांक मिळवला.

तालुकास्तरीय शालेय बुद्धिबळ स्पर्धेतही विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली. सायली भागवत सूर्यवंशी हिने प्रथम, सृष्टी विजयकुमार ढोरमारे हिने तृतीय, सुजाता सतीश शिंदे हिने चौथा, तर पुष्कराज प्रदीप गुंड व स्नेहा दत्ता पवार यांनी पाचवा क्रमांक मिळवला. या पाचही विद्यार्थ्यांची जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

कार्यक्रमात सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांना आगामी जिल्हास्तरीय स्पर्धांसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी मराठवाडा मुक्ती संग्रामातील स्वातंत्र्यसैनिकांच्या त्याग व संघर्षाचे स्मरण करण्यात आले. शिक्षणासोबतच क्रीडा क्षेत्रातही विद्यालयाचे नाव उज्ज्वल करणाऱ्या विद्यार्थ्यांचे उपस्थित मान्यवरांनी कौतुक केले.

कार्यक्रमास हभप. बाबुराव पुजारी, सेवानिवृत्त शिक्षक पांडुरंग फावडे, ॲड. शरद गुंड पाटील, गजानन पाटील, नानासाहेब चव्हाण, बळीराम सगर, कालिदास बोचरे, मुख्याध्यापक सुरेश मनसुळे, राजेंद्र सूर्यवंशी यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन शेख बी.एम. यांनी केले.

# नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत मिळवून देण्यासाठी शासन कटिबद्ध : कृषी मंत्री दत्तात्रय भरणे

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. १९ सप्टेंबर -**

मराठवाड्यासह राज्यात अल निनोच्या प्रभावामुळे पावसाचे प्रमाण कमी झाले असून, पावसात खंड पडल्याने शेती पिकांवर परिणाम झाला आहे. संकटग्रस्त शेतकऱ्यांना जास्तीत जास्त नुकसानभरपाई व मदत मिळवून देण्यासाठी शासन स्तरावर निश्चितपणे प्रयत्न करण्यात येतील. पीक विम्याचा लाभ अधिकाधिक शेतकऱ्यांना मिळण्यासाठी मुदतपूर्व पीक कापणी प्रयोग काळजीपूर्वक व अचूकपणे तातडीने पूर्ण करावेत. या प्रक्रियेत कोणत्याही त्रुटी राहणार नाहीत, याची दक्षता प्रशासनाने घ्यावी, असे निर्देश राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी आज आयोजित बैठकीत दिले.

नांदेड येथील जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन समितीच्या सभागृहात छत्रपती संभाजीनगर महसूल विभागातील आठही जिल्ह्यातील दुष्काळसदृश्य परिस्थितीचा आढावा कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी घेतला. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी ऊर्जा, पाणीपुरवठा व स्वच्छता राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर, खासदार रामराव वडकुते, खासदार प्रा. रविंद्र चव्हाण, खासदार संजय चव्हाण, खासदार नागेश पाटील आष्टीकर, आमदार सर्वश्री. हेमंत पाटील, अमरनाथ राजूरकर, सईद खान, कैलास पाटील, बाबूराव कदम कोहळीकर, भिमराव केराम, राजेश पाटील, राजू नवघरे, प्रताप पाटील चिखलीकर, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. इंद्र मणी, कृषी आयुक्त सुरज मांढरे, उपायुक्त रिता मैत्रेवार, वरिष्ठ अधिकारी बैठकीस उपस्थित होत्या. तर खासदार अशोकराव चव्हाण, खासदार



अजित गोपछडे, खासदार ओमराजे निंबाळकर, खासदार बजरंग सोनवणे, खासदार डॉ. कल्याण काळे यांच्यासह विविध विधानसभा मतदार संघातील आमदार दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

मराठवाड्यातील ७६ तालुक्यांमध्ये कमी पाऊस व पावसातील खंडामुळे पीक नुकसान, चारा टंचाई तसेच पिण्याच्या पाण्याची टंचाई सदृश्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने सतर्क राहून आवश्यक उपाययोजना कराव्यात. शेतकरी अडचणीत असल्याने त्यांच्याशी संवेदनशीलतेने वागावे, त्यांच्या अडचणी व म्हणणे समजून घ्यावे. शासन शेतकऱ्यांच्या सेवेसाठी असून, त्यांना आर्थिक पाठबळ देणे ही शासनाची जबाबदारी आहे, असे कृषी मंत्री भरणे यांनी सांगितले.

जिल्ह्यात पिण्याचे पाणी, चारा तसेच अखंडित वीजपुरवठ्याचे योग्य नियोजन करावे. संकटाच्या काळात शासन शेतकरी व ग्रामीण भागातील नागरिकांच्या पाठीशी ठामपणे उभे आहे. शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मदत मिळवून देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येतील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

राज्यात ५६ लाख शेतकऱ्यांना ४० हजार ३८५ कोटी रुपयांची कर्जमाफी देण्यात येणार असून, कर्जमाफी प्रक्रियेत येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी शेतकऱ्यांना आवश्यक सहकार्य करावे. कर्जमाफीची तिसरी यादी जाहीर झाली असून, उर्वरित शेतकऱ्यांच्या त्रुटींची पूर्तता होताच टप्प्याटप्प्याने कर्जमाफी देण्यात येईल. कर्जमाफी झालेल्या शेतकऱ्यांना नव्याने कर्ज उपलब्ध करून द्यावे तसेच कर्जमाफीची यादी संबंधित बँकांमध्ये प्रसिद्ध करावी, असे निर्देशही त्यांनी दिले.

दुष्काळी गावांच्या यादीबाबत खोटी माहिती व अफवा पसरविणाऱ्या बातम्यांवर शेतकऱ्यांनी विश्वास ठेवू नये. सॅटेलाईटच्या माध्यमातून विमा संरक्षणाबाबतची बाब तातडीने केंद्र शासनाच्या निदर्शनास आणून देण्यात येईल. चारा व पिण्याच्या पाण्याचे योग्य नियोजन करावे, असेही कृषी मंत्री भरणे यांनी सांगितले.

लोकप्रतिनिधींनी पीक नुकसान, चारा व पाणीटंचाई, जलजीवन मिशन, जलसंधारण, अखंडित वीजपुरवठा तसेच इतर विविध विषयांबाबत मांडलेल्या सूचनांची नोंद घेऊन त्यावर प्रभावी अंमलबजावणी प्रशासनाने करावी. शेतकऱ्यांना संकटातून बाहेर काढणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी असून, प्रशासनातील सर्व घटकांनी समन्वयाने काम करावे, असे निर्देश कृषी मंत्री भरणे यांनी दिले.

ऊर्जा राज्यमंत्री श्रीमती बोर्डीकर म्हणाल्या की, राज्यात सध्या विजेचा तुटवडा नाही. त्यामुळे कोणत्याही जिल्ह्यात लोडशेडींग होणार नाही याची दक्षता घेतली जाईल.

यावेळी नांदेडचे पालकमंत्री अतुल सावे, लातूरचे पालकमंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्यासह उपस्थित लोकप्रतिनिधींनी शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मदत मिळवून देण्यासाठी आपली मते मांडली.

बैठकीचे प्रास्ताविक कृषी आयुक्त सूरज मांढरे यांनी केले. यावेळी लातूर विभागाचे कृषी सहसंचालक, छत्रपती संभाजीनगर विभागाचे कृषी सहसंचालक तसेच संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी आपापल्या जिल्ह्यातील दुष्काळ सदृश्य परिस्थितीची माहिती सादर केली.

बैठकीस नांदेडचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, हिंगोलीचे जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, लातूरचे जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड, धाराशिवचे जिल्हाधिकारी कीर्तिकिरण पुजार, परभणीचे जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण, जालना जिल्ह्याचे अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, बीडचे जिल्हाधिकारी , छत्रपती संभाजीनगरचे अपर जिल्हाधिकारी संभाजी अडकिणे यांच्यासह सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

## निकष शिथिल करून शेतकऱ्यांना मदत द्या!: खा. अशोक चव्हाण

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. १९ सप्टेंबर -**

पावसाचा खंड आणि तुटीमुळे संपूर्ण मराठवाड्यात पिकांची अवस्था अत्यंत वाईट झाली आहे. यंदा पेरणीचे क्षेत्रही घटले आहे. सध्याच्या या गंभीर परिस्थितीची दखल घेत शासनाने नेहमीचे निकष शिथिल करून शेतकऱ्यांना तातडीने मदत द्यावी, अशी मागणी राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांनी केली आहे.

यंदाचे कमी पर्जन्यमान, त्यामुळे पिकांचे झालेले नुकसान आणि शेतकऱ्यांना करावयाच्या मदतीच्या उपाययोजना, या अनुषंगाने आज नांदेड येथे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या अध्यक्षतेखाली मराठवाडा विभागाची आढावा बैठक पार पडली; त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी खा. चव्हाण म्हणाले की, सोयाबीन, कापूस आणि मका या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. सोयाबीन पिवळे पडले असून वाढ खुंटल्यामुळे यंदा कापसाचे पीकही हाती येण्याची शक्यता दुरावली आहे. त्यामुळे शासनाने कुठल्याही तांत्रिक निकष आणि वेळापत्रकात न अडकता मदतीसाठी तातडीने पावले उचलण्याची आवश्यकता आहे.

या बैठकीत बोलताना त्यांनी पीक विमा कंपन्यांच्या मुजोरपणावर तीव्र संताप व्यक्त केला. जिल्हाधिकारी, कृषी विभाग आणि महसूल विभाग सहमत असतानाही विमा कंपन्यांनी शेतकऱ्यांचे दावे नाकारल्याचे प्रकार यापूर्वी घडले आहेत. प्रशासकीय स्तरावर झालेल्या निर्णयांच्या विरोधात विमा कंपन्यांनी अपील करणे संतापजनक आहे. वर्तमान परिस्थिती लक्षात घेता, विमा भरपाईसाठी निकष शिथिल करून शेतकऱ्यांना जास्तीत जास्त दिलासा कसा देता येईल, याचा विचार करण्याची आवश्यकता असल्याचेही खा. चव्हाण म्हणाले.

दुष्काळी परिस्थितीमुळे मजुरांच्या हाताला काम उपलब्ध न झाल्यास त्यांचे मोठ्या प्रमाणावर स्थलांतर होण्याची शक्यता आहे. हे स्थलांतर रोखण्यासाठी रोजगार हमी योजनेंतर्गत मजुरांना गावातच काम उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्याची सूचना त्यांनी मांडली. तूर्तास चारा उपलब्ध असला, तरी भविष्यात हा प्रश्न गंभीर होणार आहे. त्यामुळे चारा छावण्यांचे योग्य नियोजन करावे आणि यात कोणताही भ्रष्टाचार होऊ नये, यासाठी प्रशासनाने आधीच खबरदारी घ्यावी, असेही ते पुढे म्हणाले.

पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नाची तीव्रता कमी करण्यासाठी 'जलजीवन मिशन' आणि जलसंधारणाच्या कामांना तातडीने निधी उपलब्ध करून देण्याची मागणी त्यांनी केली. तसेच, ऊर्ध्व पैनगंगा प्रकल्पात उपलब्ध असलेल्या जलसाठ्यातून पाण्याचे किमान एक आवर्तन तरी सोडावे, जेणेकरून भोकर, हदगाव आणि नायगाव या तीन विधानसभा मतदारसंघांना पिण्याच्या पाण्यासाठी आणि तग धरुन राहिलेली पिके जगवण्यासाठी त्याचा उपयोग होईल, अशी मागणीही त्यांनी यावेळी मांडली.

## कापूस खरेदीच्या पूर्वतयारीसाठी २२ रोजी आदिलाबादेत बैठक

**किनवट** -आगामी खरीप कापूस पणन हंगाम २०२६-२७ मध्ये किमान आधारभूत किंमत अंतर्गत कापूस खरेदी प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी २२ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता आदिलाबाद जिल्हाधिकारी कार्यालयातील कॉन्फरन्स हॉलमध्ये आढावा बैठक आयोजित करण्यात आली आहे. किनवट-माहूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार भीमराव केराम यांनी कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांसाठी केलेल्या पाठपुराव्याला यश मिळाले असून, या बैठकीत किनवट-माहूर तालुक्यातील संबंधित अधिकारी व शेतकरी प्रतिनिधींनाही सहभागी करून घेण्यात आले आहे. बैठकीत कापूस खरेदी केंद्रांची पूर्वतयारी, जिनिंग मिलची व्यवस्था, वजन-मोजमाप, शेतकऱ्यांच्या अडचणी तसेच 'कॉटन कापूस किसान प', स्लॉट बुकिंग आणि कॉटन सॉफ्टवेअर याबाबत चर्चा होणार आहे. किनवट-माहूर परिसरातील कापूस उत्पादकांच्या प्रश्नांवरही यावेळी चर्चा होण्याची अपेक्षा आहे.

## तलाठी संघ देगलूरच्या अध्यक्षपदी डी. जी. रातोळीकर यांची बिनविरोध निवड

**नांदेड** -महाराष्ट्र राज्य तलाठी संघाच्या देगलूर तालुका शाखेच्या अध्यक्षपदी डी. जी. रातोळीकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली. संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या निवडीवेळी सर्वानुमते निर्णय घेत देगलूर तालुका तलाठी संघाची नवी कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. तलाठी संघाच्या सचिवपदी प्रकाश तोटेवाड, उपाध्यक्षपदी संग्राम शिंदे, कार्याध्यक्षपदी आनंद करडे, तर कोषाध्यक्षपदी रवी कापसे यांची निवड करण्यात आली. सहसचिवपदी महेश पदाजी आणि प्रसिद्धी प्रमुखपदी गंगाधर म्हेत्रे यांची नियुक्ती करण्यात आली. संघटनेच्या कामकाजाला अधिक व्यापक स्वरूप देण्यासाठी संघटक म्हणून संजय भांगे व क्षीरसागर बालाजी यांची निवड करण्यात आली. तसेच महिला प्रतिनिधी म्हणून सुचिता मारकवाड व वर्षा शितोळे यांची निवड करण्यात आली. प्रवक्तेपदी बळी कदम यांची, तर सल्लागारपदी भास्कर इप्पर व तानाजी डावरगावे यांची निवड करण्यात आली. नवनिर्वाचित अध्यक्ष डी. जी. रातोळीकर यांच्या नेतृत्वाखाली तलाठी संवर्गाच्या विविध प्रश्नांना प्रभावीपणे वाचा फोडण्यासोबतच संघटनेची एकजूट अधिक मजबूत करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

## तात्काळ दुष्काळ जाहीर करा ; कृषीमंत्र्यांकडे बेटमोगरेकरांची मागणी

**नांदेड** -नांदेड जिल्हा दौऱ्यावर राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे आले असता. त्यांची भेट घेऊन मा.जि.प.अध्यक्ष दिलीप पाटील बेटमोगरेकर यांनी मुखेड-कंधार तालुक्यामध्ये तात्काळ दुष्काळ जाहीर करा अशी निवेदन देऊन मागणी केली.दुष्काळ जाहीर करण्याच्या मागणीचे निवेदन नांदेडचे खासदार रवींद्र चव्हाण व नांदेडचे जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांना देण्यात आले,यावेळी शेतकरी नेते शिवशंकर पाटील कलंबरकर उपस्थित होते. पावसाने दीड महिन्यापेक्षा अधिकचा खंड दिल्यामूळे हाताशी येणारी पीक आज वाळायला लागली आहेत.त्यामुळे शेतकरी आज प्रचंड अडचणीत सापडला आहे. म्हणून दुष्काळ यादीमध्ये मुखेड-कंधार तालुके समाविष्ट करा अशी शेकडो शेतकऱ्यांच्या उपस्थितीत चार दिवसापूर्वी उपजिल्हाधिकारी व मुखेड-कंधार तहसीलदार यांच्याकडे मागणी केला होती.तात्काळ दुष्काळ जाहीर केला नाही तर हजारो शेतकऱ्यांसह मुखेड तहसील कार्यालयावर मोर्चा काढू असा इशारा निवेदनात देण्यात आला आहे.

## राज्यस्तरीय सैनिक फेडरेशन मेळावा

**मुदखेड**-मराठवाड्यातील आजी-माजी सैनिक, शहीद जवानांच्या कुटुंबीयांसह वीर नारी, वीर माता-पिता, सेवारत सैनिक आणि सैनिक विधवा यांच्या विविध समस्या व अडचणी जाणून घेण्यासाठी सैनिक फेडरेशनच्या वतीने नांदेड येथे राज्यस्तरीय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. सैनिक फेडरेशनचे संस्थापक अध्यक्ष, माजी खासदार तथा निवृत्त ब्रिगेडियर सुधीर सावंत यांच्या नेतृत्वाखाली हा मेळावा रविवार, दि. २० सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी २ वाजता कुसुम सभागृह, नांदेड येथे होणार आहे.

**टीसी हरवली आहे**

माझी सोनाली गंगाराम दौंतुलवाड या नावाची इयत्ता बारावी सायन्स ची (टी.सी.) ट्रान्सफर सर्टिफिकेट देगलूर ते नांदेड बस प्रवासादरम्यान हरवली आहे. ज्यांना कोणास सापडल्यास त्यांनी खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

**संपर्क पत्ता :** सोनाली गंगाराम दौंतुलवाड
रा.बापू नागर, देगलूर ,
जिल्हा नांदेड
मोबाईल नंबर : ९८५०४ ४३५६८

## हडको परीसरात युवकाचा खून; सहा जणांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड, दि. १९ सप्टेंबर -**

हडको येथील पाण्याचे टाकी परिसरात १९ वर्षीय संघरत्न उर्फ डोरेमॉन माधवराव वाघमारे यांचा निर्घृण खून झाला असून मयत तरुण गुन्हेगारी पार्श्वभूमीचा होता आणि तो नेमकाच जामीनावर सुटून बाहेर आला होता. त्याच्या खून गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या व गुन्हेगारी वर्चस्वातून झाला असावा अशी माहिती पोलिसांकडून समजते. सदरील घटना १८ सप्टेंबरच्या मध्यरात्री घडली.



सिडको - हडको परिसरातील शाहू नगर वाघाळा येथील रहिवासी संघरत्न उर्फ डोरोम्यान माधवराव वाघमारेचा गुन्हेगारी प्रवृत्तीच्या तरुणांचा १८ सप्टेंबर रोजी मध्ये रात्री हाडको येथील पाण्याची टाकी परिसरात त्याचा निर्घूण खून झाला. ही घटना समजतात पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली या प्रकरणी पोलिसांनी तात्काळ हालचाली करत दोन संशयिताना ताब्यात घेतले असुन सहा जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार १८ सप्टेंबर रोजी मध्ये रात्री ११ते१२ वाजताच्या सुमारास मारेकर्यांनी संघरत्न उर्फ डोरोमॉनला धारदार शस्त्राने वार करून त्यास गंभीर जखमी करून बेशुद्ध अवस्थेत पडला होता. संघरत्न हा गुन्हेगारी प्रवृत्तीचा असल्याने पूर्व वैम्यनस्यातून किंवा गुन्हेगारी वर्चस्वातून त्याचा खून झाला असावा अशी शक्यता वर्तवली जाते. सदरील

घटनेची माहिती मिळतात त्याला तातडीने उपचारासाठी विष्णुपुरी येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र तपासणीनंतर त्यास डॉक्टरांनी मयत घोषित केले. सदरील घटनेतील ताब्यात असलेल्या दोन संशयीतांची कसून चौकशी पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली करत आहेत. पुढील तपास ग्रामीण ठाण्याचे पोलीस करत आहेत.

## केळी उत्पादक शेतकऱ्यांना फळपिक विमा मंजूर; हेक्टरी ७४ हजार ६७८ रुपये खात्यात जमा

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड, दि. १९ सप्टेंबर -**

पुनर्रचित हवामान आधारित फळ पिक विमा योजनेअंतर्गत रब्बी हंगामासाठी केळी उत्पादक शेतकऱ्यांना हेक्टरी ७४ हजार ६७८ रुपये विमा रक्कम मंजूर करण्यात आली असून बँक खात्यात वर्ग करण्यात आली आहे. कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक तथा युवा उद्योजक निलेश देशमुख बारडकर यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने सातत्याने पाठपुरावा करून जिल्हाधिकारी यांनी दखल घेतल्याने विमा मंजूर झाला असून दुष्काळात केळी उत्पादक शेतकऱ्यांना विम्याचा आधार दिलासा देणारा ठरला आहे.

यावर्षी हवामानाची प्रतिकूल परिस्थिती दुष्काळ,सुदृश्य स्थिती, वाढता उत्पादन खर्च यामुळे केळी उत्पादक शेतकरी आर्थिक विवंचनेत सापडला होता . आर्थिक संकटातील शेतकऱ्यांसाठी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक निलेश देशमुख प्रगतशील शेतकरी बालाजी पवार (पार्डीकर ), रंगराव पवार,खालेद फारुख शेख यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने जिल्हाधिकार्यात सातत्याने पत्र व्यवहार करून विमा मंजूर करण्यात यावा यासाठी सातत्याने पाठपुरावा केला. या प्रयत्नामुळे केळी पिक विम्याचा प्रश्न मार्गी लागला आहे. मुदखेड तालुक्यातील बारड, मुदखेड, मुगट महसूल मंडळातील केळी उत्पादक शेतकऱ्यांचा पिक विमा मंजूर करण्यात आला आहे .



सन २०२५-२६ यावर्षीच्या फल पिक विमा योजनेअंतर्गत रब्बी हंगामासाठी हेक्टरी ७४ हजार ६७८ रुपयांचा पिक विमा मंजूर झाला आहे. केळी पिक विमा मोबदल्यात शेतकऱ्यांच्या बँक खात्यात रक्कम जमा करण्यात आली आहे. यावर्षी कोरडा दुष्काळ सदस्य परिस्थिती असल्याने केळी उत्पादक शेतकरी आर्थिक विवंचनेत सापडला होता. आर्थिक अडचणीच्या काळात केळी पिक विमा मंजुरी मुळे निश्चितच दिलासा मिळाला असून समाधान व्यक्त केले जात आहे.

## आदमपूरात मराठवाडा मुक्तिसंग्राम वर्धापनदिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**आदमपूर, दि. १९ सप्टेंबर -**

बिलोली तालुक्यातील ग्राम आदमपूर येथील जि.प. वरिष्ठ प्राथमिक शाळा,महाळप्पा पटने विद्यालय,हर्ष इंग्लिश स्कूल,पशुवैद्यकीय दवाखाना आणि ग्राम पंचायत कार्यालय आदि ठिकाणी ७८ व्या मराठवाडा मुक्तिसंग्राम वर्धापनदिनानिमित्त ध्वजारोहणाचा कार्यक्रम संपन्न झाला.

सर्वप्रथम हुतात्मा वीरांचे प्रतिमापूजन करून श्रीफळ वाढवून सामुहिक अभिवादन करण्यात आले.तद्नंतर गाव परिसरातून घोषणा देत प्रभात फेरी काढण्यात आली.

यावेळी जि.प. वरिष्ठ शाळेचे



मुख्याध्यापक शेषेराव पांचाळ,पशुवैद्यकीय अधिकारी संकेत पुपलवाड, राहूल भद्रे,विठ्ठल अंगरोड,शालेय समिती अध्यक्ष बाळू डोंपे,उपाध्यक्ष राजेंद्र कोल्हे,हर्ष स्कूल चे बालाजी डुब्बेवार, उपसरपंच प्रतिनिधी शंकरराव मालीपाटील, पत्रकार गंगाधर पंगलवार,पत्रकार महमदरफी मदार, पत्रकार जाफर आदमपूरकर,जि.प.माजी सदस्य प्रतिनिधी चंद्रकांत देवारे,सरपंच प्रतिनिधी कपिल भुसावळे, राम हालबुर्गे,माणिकराव पाटील,सलीम शेख,राजेश पाटील,सिद्धार्थ कांबळे,स्वाती अडबलवार,अर्चना जळपतराव,कल्पना जाधव, महाळप्पा पटने विद्यालय मुख्याध्यापक चंद्रशेखर लगडे,रामराव तुकडे,प्रल्हाद हांद्रे,जैनोद्दीन शेख, बालाजी मुंके,चंद्रशेखर पाटील, दिलीप इबिते,हाणमंत भुसावळे,पत्रकार संजय हालबुर्गे,सुरेश भुरे,अहमदसाब पठाण, गजानन शिनगारे,नयना कुलकर्णी,स्वाती पांढरे, सरस्वतीबाई भुरे,निर्मला पंगलवार,शमीम शेख,भेदेकर सर,गायकवाड व विद्यार्थी,प्रतिष्ठित नागरिक,गावकरी आदि उपस्थित होते.

## बाऱ्हाळी परिसरात पारंपरिक पद्धतीने गौरीपूजन

**तभा वृत्तसेवा**
**बाऱ्हाळी, दि. १९ सप्टेंबर -**

गणेशोत्सवाच्या उत्साहातच बाऱ्हाळी परिसरात गुरुवारी गौरीचे मोठ्या भक्तिभावाने आगमन झाले. महिलांनी पारंपरिक पद्धतीने गौरीचे स्वागत करून घरांची आकर्षक सजावट केली. गौरीच्या आगमनामुळे परिसरातील घराघरांत मंगलमय आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.



गौरी आगमनाच्या पार्श्वभूमीवर महिला घरांची साफसफाई, सजावटीचे साहित्य, पुजेसाठी लागणारे साहित्य यामध्ये व्यस्त होते. मात्र शुक्रवारी सकाळपासूनच घरांची स्वच्छता करून आकर्षक रांगोळ्या काढल्या. गौरीसाठी विविध प्रकारच्या फुलांची सजावट, आरास तसेच विविध प्रकारे नैवेद्याची तयारी खूपच मेहनतीने करण्यात आली. गौरीपूजनानिमित्त पारंपरिक पद्धतीने गौरीची विधिवत स्थापना करण्यात आली. यावेळी महिला व कुटुंबीयांनी एकत्र येत धार्मिक वातावरणात पूजा-अर्चा केली. गौरीच्या आरती नंतर मित्र व आप्तेष्टांना स्नेहभोजन देण्यात आले. अनेक घरांमध्ये गौरीसमोर विविध वस्तूंची आकर्षक मांडणी गौरीपूजनाचा मुख्य सोहळा भक्तिभावाने पार पडला आहे.

## देगलूरात मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त 'दृष्टी'साठी भीमशक्तीची सामाजिक मशाल!

**तभा वृत्तसेवा**
**देगलूर, दि. १९ सप्टेंबर -**

मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधून भीमशक्ती सामाजिक संघटना, देगलूर आणि उदयगिरी लायन्स नेत्र रुग्णालय, उदगीर यांच्या संयुक्त विद्यमाने देगलूर येथे मोफत नेत्र तपासणी व अल्पदरात मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले. सामाजिक बांधिलकीतून राबविण्यात आलेल्या या उपक्रमात १४८ रुग्णांची नेत्र तपासणी करण्यात आली असून, त्यापैकी ३८ रुग्णांची मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी निवड करण्यात आली. शहरासह तालुक्यातील नागरिकांनी शिबिराला चांगला प्रतिसाद दिला.

या मोफत नेत्र तपासणी व अल्पदरात मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराच्या अध्यक्षस्थानी देगलूर नगरपरिषदेचे नगराध्यक्ष प्रतिनिधी बालाजी टेकाळे होते. यावेळी माजी नगराध्यक्ष मोगलाजी शिरसेठवार,



उपनगराध्यक्ष ड. अंकुश देसाई देगावकर, माजी नगराध्यक्ष तथा ज्येष्ठ पत्रकार विवेक केरुरकर, नगरपरिषदेचे गटनेते मीरामयोद्दीन शेख सालार, माजी उपनगराध्यक्ष बालाजी रोयलावार, नगरसेवक नगरसेवक नंदकिशोर शाखावार, नगरसेवक तथा माजी उपनगराध्यक्ष अविनाश निलमवार, नगरसेवक प्रतिनिधी सुनील येशमवार व सुमीत कांबळे, शिवसेना (ठाकरे गट) जिल्हा उपप्रमुख महेश पाटील, भीमशक्ती सामाजिक संघटनेचे नांदेड जिल्हाध्यक्ष तथा नगरसेवक शत्रुघ्न वाघमारे, डॉ. आनंद नरंगलकर, मल्हार रक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष दीपक पाटील बेंबरेकर, माजी पंचायत समितीचे सदस्य रमेश शिवणीकर, संजय महाराज किरजवळेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

या शिबिरात उदयगिरी लायन्स नेत्र रुग्णालय, उदगीर येथील डॉ. गणेश मुंडे व डॉ. शंकर केंद्रे यांनी रुग्णांची नेत्र तपासणी केली. तपासणीदरम्यान मोतीबिंदूची समस्या आढळलेल्या ३८ रुग्णांची पुढील मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी निवड करण्यात आली.

भीमशक्ती सामाजिक संघटनेच्या माध्यमातून विविध सामाजिक व जनहिताचे उपक्रम राबविले जात असून, सर्वसामान्य आणि गरजू नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित प्रश्नांवर प्रत्यक्ष काम करण्याचा प्रयत्न या शिबिरातून करण्यात आला. समाजातील गरजू घटकांपर्यंत सेवा पोहोचविणे आणि सामाजिक बांधिलकी जपणे, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक भीमशक्ती सामाजिक संघटनेचे जिल्हाध्यक्ष शत्रुघ्न वाघमारे यांनी केले. संघटनेच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विविध सामाजिक उपक्रमांची माहिती त्यांनी उपस्थितांना दिली. तर अध्यक्षीय मार्गदर्शन करताना नगराध्यक्ष बालाजी टेकाळे यांनी भीमशक्ती सामाजिक संघटनेच्या सामाजिक कार्याचे कौतुक केले.

यावेळी मोगलाजी शिरसेटवार, महेश पाटील, मीरामयोद्दीन शेख सालार आणि विवेक केरुरकर आदी मान्यवरांनीही उपक्रमाचे कौतुक केले. शत्रुघ्न वाघमारे व त्यांच्या संपूर्ण टीमला मान्यवरांनी शुभेच्छा दिले.

कार्यक्रमादरम्यान उपस्थित मान्यवरांचा भीमशक्ती सामाजिक संघटनेच्या देगलूर शाखेच्या वतीने सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किशोर आडेकर, (तालुकाध्यक्ष, भीमशक्ती सामाजिक संघटना देगलूर ) यांनी केले. आभार संग्राम बडगे यांनी मानले. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी भीमराव भूतनरे (तालुका उपाध्यक्ष भिमशक्ती), राष्ट्रपाल वाघमारे, संग्राम बडगे, पंढरी कांबळे ( लिपीक प्राथमिक आरोग्य केंद्र, देगलूर), संजीव सोनकांबळे, राहुल बोने केदरकुटेकर यांच्यासह भीमशक्ती सामाजिक संघटनेचे पदाधिकारी, युवक आघाडीचे कार्यकर्ते व सदस्यांनी परिश्रम घेतले.